# ५२ वा

# वार्षिक अहवाल

## २०२३-२४




वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ
परभणी - ४३१ ४०२ (महाराष्ट्र)

# ५२ वा

# वार्षिक अहवाल

## २०२३-२४

कृषि मूलं हि जीवनम्

**वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ**

**परभणी - ४३१ ४०२ (महाराष्ट्र)**

# ५२ वा
# वार्षिक अहवाल
## २०२३–२४


**वार्षिक अहवाल संपादकीय मंडळ**

डॉ. खिजर बेग : संचालक संशोधन
डॉ. मदन पेंडके : संशोधन संपादक
डॉ. गजेंद्र जगताप : उपसंचालक संशोधन (पिके)
डॉ. गजेंद्र लोंढे : उपसंचालक संशोधन (पशु विज्ञान)
डॉ. हरिहर कौसडीकर : उपसंचालक संशोधन (कृषि अर्थशास्त्र)

---

**प्रकाशक**

श्री. संतोष वेणीकर
कुलसचिव
वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी–४३१ ४०२

---

**मुद्रक**

ओंकार ग्राफीक्स
परभणी



**प्रा.डॉ. इन्द्र मणि**
कुलगुरु
वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ
परभणी

# मनोगत

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीचा ५२ वा वार्षिक अहवाल सादर करतांना मला आनंद होत आहे. सन २०२३-२४ या वर्षात विद्यापीठाने शिक्षण, संशोधन आणि विस्तार क्षेत्रात केलेल्या प्रमुख योगदानाचा उल्लेख यात केलेला आहे.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ नवनवीन तंत्रज्ञानांची निर्मिती व त्याचा प्रसार सर्व शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचे तसेच त्यांचे उत्पन्न व जीवनमान उंचावण्याचे ध्येय समोर ठेवून काम करत आहे. मराठवाडा विभागातील हवामान, शेतकऱ्यांची गरज तसेच हवामान बदलानुरुप परिस्थितीशी सुसंगत धान्यपिकांचे व फळपिकांचे विविध उच्च गुणधर्म प्रत व गुणवत्ता असलेले वाण विद्यापीठाने तयार केलेले आहेत. विद्यापीठाने जलसंवर्धन व जलपुनर्भरण कार्यात नवनवीन संशोधन करुन योगदान दिले आहे. तसेच विविध सुधारीत यंत्रे विकसित करुन शेतीतील मजूरखर्च व समस्या कमी करत आहेत. प्रमुख पिकांची उत्पादकता वाढवण्यासाठी संपुर्ण यांत्रिकीकरणाकरिता प्रयत्न केला जाणार आहे. आजपर्यंत १५०० शेतकरी, तंत्रज्ञ आणि ग्रामीण युवकांना प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणार्थींना 'आत्मनिर्भार भारत मिशन' अंतर्गत त्यांचे स्वत:चे उद्योग/सेवा केंद्र सुरू करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात येत आहे.

विद्यापीठ विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील आहे व नाविण्यपूर्ण विचारांची शिकवण देत आहे. वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठातील शिक्षणाची पुर्नजोडणी आणि मुल्यमापन हे वेगवेगळया आंतरराष्ट्रीय संस्थांसोबत सामंजस्य करारातून केले जात आहे. कृषी क्षेत्रात काटेकोर आणि अचूक पद्धतीने विविध कामे करण्याकरिता ड्रोनचा वापर वाढणार असुन विविध पिकात किड-रोग व्यवस्थापन, अन्नद्रव्य व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन, शेतातील माहिती संकलन यासाठी ड्रोनचा वापर करण्याचे प्रयत्न केले जात आहेत.

विद्यापीठाची कृषी विस्तार शिक्षण व्यवस्था या विद्यापीठाचे तंत्रज्ञान शेतकरी बंधूंपर्यंत पोहोचवण्याकरीता सक्षम आहे. विविध प्रात्यक्षिके शेतकऱ्यांच्या शेतावर आयोजित केलेली आहेत. विद्यापीठाने १८ मे, १७ सप्टेंबर तसेच ३ जानेवारीला शेतकरी मेळावे आयोजित केले. याप्रसंगी मोठा प्रमाणात शेतकऱ्यांना बियाणे उपलब्ध करुन देण्यात आले आहे. या मेळाव्यात मोठा प्रमाणात शेतकरी सहभागी होते. त्यांना विविध पीक पद्धतीबद्दल सखोल मार्गदर्शन करण्यात आले. डिजीटल माध्यमांचा वापर करुन मराठवाडातीलच नव्हे तर संपुर्ण राज्यातील शेतकऱ्यांपर्यंत कृषि तंत्रज्ञान पोहचविले आहे. विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन आधुनिक कृषि तंत्रज्ञानाची माहिती दिली. विद्यापीठातील विस्तार केंद्रांनी डिजीटल माध्यमांचा वापर करुन विविध उपक्रमांचे आयोजन केले. मला सांगायला विशेष आनंद होतो आहे की, विद्यापीठाला भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या राष्ट्रीय कृषि शिक्षण अधिस्विकृती समितीव्दारे प्रतिष्ठेचे 'ए' ग्रेड मानांकन २०२३ ते २०२८ या पाच वर्षांच्या कालवधीसाठी प्राप्त झाले आहे.

मी राज्यशासन, केंद्रशासन, राज्य नियोजन आयोग, भारतीय कृषी अनुसंधान परिषद, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांचा संशोधनासाठी निधी प्राप्त करुन दिल्याबद्दल आभारी आहे. माझ्या विद्यापीठातील शास्त्रज्ञ, अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या दिवसरात्र परिश्रमामुळेच हे विद्यापीठ इतकी प्रगती करत आहे.

मी, डॉ. खिजर बेग, संचालक संशोधन, डॉ.मदन पेंडके, संशोधन संपादक व डॉ. राकेश अहिरे, संचालक विस्तार शिक्षण व त्यांच्या सहका-यांचे अभिनंदन करतो की, त्यांचेमुळे हा वार्षिक अहवाल सुयोग्य रुपात तयार झाला आहे. मला विश्वास आहे की विद्यापीठाच्या अनेक लाभार्थींना या वार्षिक अहवालाचा नक्कीच फायदा होईल.

**(इन्द्र मणि)**
**कुलगुरु**



**मा.श्री. आचार्य देवव्रत**
मा. कुलपती तथा राज्यपाल, महाराष्ट्र राज्य



**मा.ना.श्री. देवेंद्र फडणवीस**
मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



**मा.ना.श्री. एकनाथ शिंदे**
मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



**मा.ना.श्री. अजित पवार**
मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



**मा.ना.श्री. दत्तात्रय भरणे**
मा. कृषि मंत्री, महाराष्ट्र राज्य



**मा.ना.ॲड. आशिष जयस्वाल**
मा. कृषि राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



**प्रा. (डॉ.) इन्द्र मणि**
मा.कुलगुरु, वनामकृवि, परभणी

# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ
## कार्यकारी परिषद २०२३-२४

| अ.क्र. | नाव | पत्ता | पद |
|---|---|---|---|
| १ | डॉ. इन्द्र मणि | कुलगुरु, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,परभणी | अध्यक्ष |
| २ | मा.आ.श्री सतीश भानुदासराव चव्हाण | विधान परिषद सदस्य, प्लॉट नं. १०, सुप्रिया, ज्योती नगर, नवीन उस्मानपुरा, छ. संभाजीनगर | सदस्य |
| ३ | मा.आ.श्री. रमेशराव कराड | विधान परिषद सदस्य, मु. पो. रामेश्वर (रुई) ता.जि. लातूर | सदस्य |
| ४ | मा.आ.डॉ. राहुल वेदप्रकाश पाटील | विधान सभा सदस्य, तोरणा, घर क्र. १३८, शिवाजी नगर, परभणी | सदस्य |
| ५ | मा.आ.श्री. अभिमन्यू पवार | विधानसभा सदस्य, नरसिंह नगर, कोराळी रोड, कासारसिरसी, तहसील-निलंगा, जि.लातूर | सदस्य |
| ६ | मा.आ. श्री. सुरेशराव वरपुडकर | नक्षत्र, विष्णुनगर, वसमत रोड, परभणी | सदस्य |
| ७ | मा.श्री. विठ्ठल म्हतारजी सकपाळ | प्रगतशील शेतकरी, रा .शिक्षक कॉलनी सिल्लोड, जि छ.संभाजीनगर | सदस्य |
| ८ | मा.श्री. सुरज उत्तम जगताप | प्रगतशील शेतकरी, रा.सासवड, जि.पुणे | सदस्य |
| ९ | मा.श्री. प्रविण बाळासाहेब देशमुख | प्रगतशील शेतकरी, ८४ आशीर्वाद, रामकृष्ण नगर, वसमत रोड, परभणी | सदस्य |
| १० | मा.श्री. दिलीप अवचितराव देशमुख | प्रगतशील शेतकरी,८, सहयाद्री नगर, पुंडलिक नगर रोड, गारखेडा, छ. संभाजीनगर | सदस्य |
| ११ | मा.डॉ. आदिती सुभाषचंद्र सारडा | प्रगतशील शेतकरी,रा.करीमपुरा, शुक्रवार पेठ, जि.बीड | सदस्य |
| १२ | मा.श्री. भागवत अजबराव देवसकर | प्रगतशील शेतकरी, कृषि उद्योजक, ३०२, श्री निवास छत्रपती अर्पाटमेंन्ट, जिजामाता विद्यालयजवळ, हॉटेल चंद्रलोक पाठीमागे, हिंगोली रोड, श्रीराम नगर, नांदेड-४३१६०२ | सदस्य |
| १३ | डॉ. राजीव ए. मराठे | संचालक, भाकृअप-राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र, एनएच - ६५, सोलापुर पुणे महामार्ग, केगाव, सोलापुर | सदस्य |
| १४ | डॉ. व्हि.एम. मायंदे | फॉर्मर झोनल को ऑर्डिनेटर, आयसीएआर, बी-५०४, मॉन्ट वर्ट, बियारिटस-२ बानेर-पाशान लिंक रोड, पाशान पुणे | सदस्य |
| १५ | आयुक्त, कृषि | कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-५ | सदस्य |
| १६ | प्रादेशिक पशुं सवर्धन सहआयुक्त | खडकेश्वर, छ. संभाजीनगर | सदस्य |
| १७ | मा. संचालक फलोत्पादन | फलोत्पादन संचालनालय, नरवीर तानाजी वाडी, शिवाजी नगर, पुणे-५ | सदस्य |
| १८ | मा. मुख्यवनसंरक्षक | प्रादेशिक वनवृत्त, उस्मानपुरा, छ. संभाजीनगर | सदस्य |
| १९ | प्रादेशिक उपआयुक्त | मत्स्यव्यवसाय, जालना रोड, छ. संभाजीनगर | सदस्य |
| २० | प्रादेशिक दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी | जालना रोड, छ. संभाजीनगर | सदस्य |
| २१ | डॉ. भगवान आसेवार | अधिष्ठाता (कृषि), वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी | सदस्य |
| २२ | डॉ. जगदिश जहागीरदार | संचालक संशोधन वसंतराव नाईक मराठवाडा कृषि | सदस्य |
| २३ | श्री. प्र.धो. निर्मल | नियंत्रक, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी | निमंत्रित सदस्य |
| २४ | श्री. संतोष वेणीकर | कुलसचिव, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी | कुलसचिव तथा सदस्य सचिव |

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | विभाग | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | १ |
| २ | शिक्षण | ३ |
| ३ | विद्यापीठ ग्रंथालय | २७ |
| ४ | विद्यार्थी कल्याण | ३० |
| ५ | संशोधन | ३३ |
| ६ | संशोधन उपलब्धी | ३७ |
| ७ | बीजोत्पादन कार्यक्रम | ४६ |
| ८ | फळझाडाच्या कलमा व रोपांची विक्री | ४७ |
| ९ | उत्पादन तपासणी प्रयोगांची माहिती | ४९ |
| १० | प्रशिक्षण व कार्यशाळांचे आयोजन | ४९ |
| ११ | विद्यापीठ शास्त्रज्ञांचा चर्चासत्रात सहभाग | ६१ |
| १२ | पुरस्कारप्राप्त शास्त्रज्ञ | ६४ |
| १३ | सामंजस्य करार | ६९ |
| १४ | विस्तार शिक्षण संचालनालय | ७२ |
| १५ | विद्यापीठ प्रशासन | ८० |
| १६ | विद्यापीठ वित्त व्यवस्था | ९७ |
| १७ | विद्यापीठ अभियंता | १०२ |

# प्रस्तावना

मराठवाडा विभागाच्या कृषि शिक्षण, संशोधन आणि विस्तार विषयक गरजांच्या पूर्ततेसाठी महाराष्ट्र शासनाने १८ मे, १९७२ रोजी परभणी येथे मराठवाडा कृषि विद्यापीठाची स्थापना केली. मराठवाडा विभागातील आठही जिल्ह्यांतील शेतकऱ्यांच्या व शेतीच्या सर्वांगीण विकासासाठी विद्यापीठ कटीबध्द आहे. महाराष्ट्रातील चार कृषि विद्यापीठांपैकी वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी हे एक आहे. मराठवाडा विभागातील औरंगाबाद व नांदेड जिल्ह्यातील काही भाग औद्योगीकरणात असून उर्वरित संपूर्ण भाग हा कृषि क्षेत्राखाली आहे. मराठवाडा विभागातील कृषि क्षेत्रांच्या आणि शेतक-यांच्या गरजा लक्षात घेऊन हे विद्यापीठ नवनवीन कृषि संशोधन करत आहे.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कार्यक्षेत्र मराठवाडयातील आठ जिल्हयांमध्ये असून प्रत्येक जिल्हयामध्ये आवश्यकतेनुसार संशोधन केंद्रे व महाविद्यालये कार्यरत आहेत. या विभागाचे भौगोलिक क्षेत्र ६४.३ लाख हेक्टर असून पेरणीखालील ४९.४ पैकी ३.३९ लाख हेक्टर क्षेत्र दुबार पीक पध्दतीखाली येते. विभागातील सरासरी सिंचन क्षेत्र १५ टक्के असून ८५ टक्के क्षेत्र कोरडवाहू आहे. हा विभाग बहुतांशी हमखास पर्जन्यमानाच्या प्रकारात येत असला तरी पश्चिमेकडील औरंगाबाद, बीड, उस्मानाबादचा काही भाग हा कमी पर्जन्यमानाचा आहे तर पूर्वेकडील नांदेडचा काही भाग मध्यम भारी पावसाच्या प्रकारात येतो. मराठवाडा विभागातील जवळश्र जवळ १२.१ लक्ष हेक्टर क्षेत्र खोल काळश्नया मातीच्या प्रकारात मोडते. शिवाय ३२.५ लक्ष हेक्टर क्षेत्र मध्यम काळश्नया तर १२.४ लक्ष हेक्टर क्षेत्र हलक्या व कमी खोलीच्या जमिनीच्या प्रकारात मोडते. सुपीकतेच्या दृष्टीने सर्वसाधारणपणे विभागातील जमिनी नत्र व स्फुरदाच्या बाबतीत कमतरता दर्शवित असून केवळ पालाशच्या बाबतीत या जमिनी चांगल्या आहेत.

मराठवाडा विभागात औरंगाबाद, जालना, लातूर, परभणी, उस्मानाबाद, नांदेड, हिंगोली व बीड अश्या आठ जिल्ह्यांचा समावेश आहे. मराठवाडा विभाग १७°३५ ते २०°४० अक्षांश व ७४°४० ते ७८°१६ रेखांश या भागात आहे. मराठवाडा विभागाचे क्षेत्रफळ ६४.५ दशलक्ष हेक्टर असुन ५७ लाख हेक्टर कृषि क्षेत्राखाली आहे. मराठवाडा विभागाच्या प्रत्येक जिल्ह्यात हवामान वेगवेगळे आहे.मराठवाडा विभागाचे वार्षीक पर्जन्यमान ५०० ते ११०० मिमी आहे. त्यापैकी ६० टक्के भाग हमखास पावसाच्या प्रदेशात येतो तर प्रत्येकी ४० टक्के भाग हा अवर्षण प्रवण तसेच जास्त पर्जन्यमान क्षेत्रात येतो. मराठवाडा विभागातील शेती ही मुख्यत्वेकरुन पावसावर आधारीत आहे. या विभागातील लोकांचे जीवन हे मुख्यत: शेतीवर अवलंबून आहे. मराठवाडा विभागातील बहुतांश जमीन ही मध्यम ते खोल काळी आहे.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ अंतर्गत कृषि, कृषि अभियांत्रिकी, अन्नतंत्र, सामाजिक विज्ञान (गृह विज्ञान), उद्यानविद्या, कृषि पणन व व्यवस्थापन, कृषि जैवतंत्रज्ञान विद्याशाखेत पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रम राबविले जातात. कृषि महाविद्यालय, परभणी, बदनापूर, अंबाजोगाई, लातूर व उस्मानाबाद येथे असुन कृषि अभियांत्रिकी, अन्नतंत्र महाविद्यालय, उद्यानविद्यामहाविद्यालय आणि सामाजिक विज्ञान महाविद्यालय परभणी येथे आहेत. कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, लातूर येथे तर कृषि पणन व व्यवस्थापन महाविद्यालय, चाकूर येथे आहेत. वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठातंर्गत ४३ खाजगी विनाअनुदानित महाविद्यालये मराठवाडा विभागात कार्यरत आहेत. विद्यापीठातील विद्यार्थ्यांना अनुभव आधारीत प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने काढणी पश्चात तंत्रज्ञान, दुग्धव्यवसाय, फलोत्पादन, मृदविज्ञान तसेच कडधान्य व तेलबिया प्रक्रिया केंद्रे स्थापन करण्यात आले आहे. या विद्यापीठातंर्गत चार कृषि विज्ञान केंद्र, तुळजापूर, औरंगाबाद, बदनापूर तसेच गेवराई येथे कार्यरत आहेत. त्याद्वारे शेतकऱ्यांना प्रत्यक्ष कृषि तंत्रज्ञानविषयी माहिती दिली जाते.या विद्यापीठातर्गत ९ कृषि विद्यालये तसेच २४ खाजगी विनाअनुदानित कृषि तंत्र विद्यालये कार्यरत आहेत तसेच २८ कृषि तंत्रनिकेतन खाजगी विनाअनुदानीत स्वरुपात कार्यरत आहेत.

मराठवाडा विभागात मुख्यत्वे ज्वारी, बाजरी, मका, तूर, मूग, उडीद, सोयाबीन, सुर्यफूल, भुईमूग, कापूस ही पिके खरीपात तर गहू, करडई, रबी ज्वारी, सूर्यफूल, हरभरा ही पिके रबी हंगामात घेतली जातात. ज्या ठिकाणी पाण्याची सोय आहे त्या ठिकाणी ऊस,

केळी, हळद, आले, फळबाग आणि भाजीपाला यांची लागवड केली जाते. या विभागातील शेतीच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठी कृषि विद्यापीठाव्दारे गेल्या ५२ वर्षांपासून संशोधनाचे कार्य चालू आहे. हे संशोधनाचे कार्य विविध संशोधन केंद्रांमार्फत करण्यात येते. संशोधनाचे कार्य सतत प्रगतीपथावर असून मागील ५२ वर्षात १५६ संकरीत आणि सरळ वाण विद्यापीठाने प्रसारित केलेले आहेत. तसेच ५६ कृषि यंत्रे/अवजारे प्रसारित केलेली आहेत. प्रत्येक पिकाची प्रती हेक्टर उत्पादकता वाढविण्यासाठी एकुण १०८९

पीक उत्पादन तंत्रे विकसित करण्यात आलेली आहेत. तंत्रज्ञानात प्रामुख्याने जमीन, पाणी, तण, खते, जैविक खते, रोग व कीड नियंत्रण, साठवणूक, विक्री, बीजोत्पादन, मूल्यवर्धीत व्यापार इत्यादींच्या बाबतीत येणा-या अडचणी व त्यावर मात करण्यासाठीचे संशोधन कार्य करण्यात आले आहे.

विद्यापीठाच्या अधिपत्याखाली एकुण १७ संशोधन केंद्रे, १२ महाविद्यालये आणि ०७ कृषि विज्ञान केंद्रांचा समावेश होतो. संशोधनाचे विविध प्रकल्प हे निरनिराळया संशोधन केंद्रांवर राबविण्यात येतात. सद्यस्थितीमध्ये भारतीय कृषि संशोधन परिषद (७५ ऽ) आणि राज्य शासन (२५ ऽ) अखिल भारतीय समन्वयित एकुण २३ संशोधन प्रकल्प विद्यापीठात कार्यान्वीत आहेत. याशिवाय भारतीय कृषि संशोधन परिषदेकडुन १०० टक्के अनुदान मिळणारे ५ संशोधन प्रकल्प व केंद्र पुरस्कृत १०० टक्के अनुदानीत १ संशोधन प्रकल्प राबविले जात आहेत. तसेच राष्ट्रीय कृषि विकास योजना (०२), राष्ट्रीय फलोत्पादन अभियान यांच्या सहकार्याने कार्यान्वीत आंतरराष्ट्रीय परस्पर सहकार्याद्वारे (०४) राष्ट्रीय हवामान बदलावर आधारित कृषि संशोधन प्रकल्प (०४) असुन अशा विविध संस्थाकडुन वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठास संशोधनास अर्थसहाय्य पुरविण्यात येत आहे. अशा प्रकारे भक्कम संशोधनासाठी संस्थात्मक जाळे विणलेले असुन ते संभाव्य आव्हानास समर्थपणे तोंड देवु शकेल.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांना महाराष्ट्र शासन तसेच भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांचेकडून आर्थिक तरतुद प्राप्त होते. विद्यापीठाने विविध राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय संस्थाशी शिक्षण व संशोधन कार्यासाठी सामंजस्य करार केले आहेत. विद्यापीठाकडे ३९०६ हेक्टर जमीन शिक्षण व संशोधन कार्याकरीता उपलब्ध आहे.मध्यवर्ती प्रक्षेत्राखाली १८९३ हे. जमीन बियाणे उत्पादनासाठी आहे. १०९३ हेक्टर जमीन ही संशोधन कार्यासाठी, ७६९ हे जमीन ही शिक्षण कार्यासाठी तसेच १५१ हे जमीन कृषि विद्यालयांच्या कार्यासाठी उपलब्ध आहे.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाला भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या राष्ट्रीय कृषि शिक्षण अधिस्विकृती समितीव्दारे प्रतिष्ठेचे 'ए' ग्रेड मानांकन २०२३ ते २०२८ या पाच वर्षांच्या कालवधीसाठी प्राप्त झाले आहे. वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या ५२ व्या वार्षीक अहवालात १ एप्रिल, २०२३ ते ३१ मार्च, २०२४ पर्यंतचा कालावधी अंतर्भुत आहे. या कालावधीत विद्यापीठाने केलेल्या शिक्षण, संशोधन व विस्तार तसेच इतर विविध कार्याचा आढावा या वार्षीक अहवालात देण्यात आलेला आहे.




**वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कार्यक्षेत्र**

# शिक्षण

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत १२ घटक महाविद्यालये असून त्यामध्ये ६ कृषि महाविद्यालये तसेच उद्यानविद्या महाविद्यालय, अन्नतंत्र महाविद्यालय, कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय, सामुदायिक विज्ञान महाविद्यालय, विलासराव देशमुख कृषि जैव तंत्रज्ञान महाविद्यालय आणि पदव्युत्तर कृषि व्यवसाय व्यवस्थापन संस्था कार्यरत आहेत. या महाविद्यालयांमार्फत उच्च शिक्षणांतर्गत खालील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम राबविण्यात येतात.

### अ) पदवी अभ्यासक्रम :

१. बी. एस.सी (कृषि)
२. बी. एस.सी (उद्यानविद्या)
३. बी. एस.सी (सामुदायिक विज्ञान)
४. बी. एस.सी (कृषि जैवतंत्रज्ञान)
५. बी. एस.सी (कृषि पणन व व्यवस्थापन)
६. बी. टेक (कृषि अभियांत्रिकी)
७. बी. टेक (अन्नतंत्र)



### ब) पदव्युत्तर अभ्यासक्रम :

१. एम. एस.सी (कृषि)
२. एम. एस.सी (उद्यानविद्या)
३. एम. एस.सी (सामुदायिक विज्ञान)
४. एम. एस.सी (कृषि जैवतंत्रज्ञान)
५. एम. टेक (कृषि अभियांत्रिकी)
६. एम. टेक (अन्नतंत्र)
७. एम. बी.ए. (कृषि)
८. पी. एच.डी (कृषि)
९. पी. एच.डी (सामुदायिक विज्ञान)
१०. पी. एच.डी (कृषि अभियांत्रिकी)
११. पी. एच.डी (अन्नतंत्र)





## वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत शैक्षणिक संस्था

### अ) घटक महाविद्यालय, प्रवेश क्षमता

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नाव | स्थापना वर्ष | विद्यार्थी प्रवेश क्षमता | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | पदवी | पदव्युत्तर | आचार्य |
| १ | कृषि महाविद्यालय, परभणी | १९५६ | १२० | १४३ | ५९ |
| २ | कृषि महाविद्यालय, लातूर | १९८७ | १२० | १०८ | -- |
| ३ | कृषि महाविद्यालय, धाराशिव | २००० | ६० | -- | -- |
| ४ | कृषि महाविद्यालय, अंबाजोगाई | २००० | १२० | -- | -- |
| ५ | कृषि महाविद्यालय, बदनापूर | २००० | १२० | ४२ | -- |
| ६ | कृषि महाविद्यालय, गोळेगांव | २०१२ | ६० | -- | -- |
| ७ | उद्यानविद्या महाविद्यालय, परभणी | १९८४ | ६० | -- | -- |
| ८ | अन्नतंत्र महाविद्यालय, परभणी | १९७६ | ८० | १५ | १० |
| ९ | कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, परभणी | १९८६ | ८० | १६ | ०७ |
| १० | सामुदायिक विज्ञान महाविद्यालय, परभणी | १९७६ | ६० | १२ | -- |
| ११ | विलासराव देशमुख कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, लातूर | २००६ | ५० | ०८ | -- |
| १२ | पदव्युत्तर कृषि व्यवसाय व्यवस्थापन संस्था, चाकूर, जि.लातूर | २००९ | -- | ३५ | -- |
| १३ | कृषि महविद्यालय, नांदेड | २०२४ | ६० | -- | -- |
| १४ | कृषि महविद्यालय, जिरेवाडी, ता.परळी वैजनाथ, जि.बीड | २०२४ | ६० | -- | -- |
| १५ | कृषि महविद्यालय, लिहाखेडी, ता.सिल्लोड, जि. छ.संभाजीनगर | २०२४ | ६० | -- | -- |
| १६ | कृषि व्यवसाय व्यवस्थापन संस्था, जिरेवाडी, ता.परळी वैजनाथ, जि.बीड | २०२४ | ६० | -- | -- |
| | | **एकूण** | **११७०** | **३७९** | **७६** |






## विना अनुदानित संलग्न महाविद्यालय (पदवी अभ्यासक्रम)

| अ.क्र | महाविद्यालयाचे नांव कृषि महाविद्यालय-२१ | मान्यता दिलेले वर्ष | प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|
| १ | कृषि महाविद्यालय, नायगांव बाजार, जि. नांदेड | २००२-०३ | ६०+६० |
| २ | आदित्य कृषि महाविद्यालय, बीड, ता.जि. बीड | २००२-०३ | ६०+६०+६० |
| ३ | दादासाहेब पाटील कृषि महाविद्यालय, दहेगांव, ता.वैजापुर, जि.औरंगाबाद | २००२-०३ | ६०+६० |
| ४ | राजीव गांधी कृषि महाविद्यालय, परभणी | २००२-०३ | ६०+६० |
| ५ | छत्रपती शाहु फुले आंबेडकर कृषि महाविद्यालय, आष्टी | २००४-०५ | ६०+६० |
| ६ | कृषि महाविद्यालय, कांचनवाडी, औरंगाबाद | २००६-०७ | ६०+६० |
| ७ | कृषि महाविद्यालय, खरपुडी, जि.जालना | २००८-०९ | ६०+६० |
| ८ | कृषि महाविद्यालय, डोंगरशेळकी तांडा, उदगीर जि. लातूर | २००८-०९ | ६०+६० |
| ९ | कृषि महाविद्यालय, नेहरुनगर, नागलगांव, ता.कंधार | २००८-०९ | ६०+६० |
| १० | कृषि महाविद्यालय, तोंडापूर, पोस्ट वारंगा फाटा, जि. हिंगोली | २००८-०९ | ६०+६० |
| ११ | कृषि महाविद्यालय, गेवराई तांडा, औरंगाबाद | २००८-०९ | ६०+६० |
| १२ | नेताजी सुभाषचंद्र बोस कृषि महाविद्यालय, मरखेल, जि.नांदेड | २०१०-११ | ६०+६० |
| १३ | कृषि महाविद्यालय, सेलू, ता.सेलू, जि.परभणी | २०१०-११ | ६०+६० |
| १४ | कृषि महाविद्यालय, पाथरी, ता.पाथरी, जि.परभणी | २०१०-११ | ६०+६० |
| १५ | कृषि महाविद्यालय, खंडाळा, ता.वैजापूर, जि.औरंगाबाद | २०१०-११ | ६०+६० |
| १६ | कै. अंबादासराव वरपुडकर कृषि महाविद्यालय, ता.जि. परभणी | २०१२-१३ | ६०+६० |
| १७ | महात्मा गांधी मिशन कृषि महाविद्यालय, गांधेली, औरंगाबाद | २०१२-१३ | ६०+६० |
| १८ | कृषि महाविद्यालय, नाव्हा, ता.जि. जालना | २०१४-१५ | ६० |
| १९ | केएसके, कृषि महाविद्यालय, राजुरी नवगण बीड, ता.जि. बीड | २०१४-१५ | ६० |
| २० | कृषि महाविद्यालय, आळणी गडपाटी, उस्मानाबाद | २०१५-१६ | ६० |
| २१ | कृषि महाविद्यालय, पाथरी, ता.फुलंब्री, जि. औरंगाबाद | २०१५-१६ | ६० |
| | | **एकूण** | **२३४०** |

| अन्नतंत्र महाविद्यालय -१० | |
|---|---|
| अन्नतंत्र महाविद्यालय, राजुरी नवगण, ता.जि. बीड | ८० |
| आदित्य अन्नतंत्रज्ञान महाविद्यालय, बीड | ८० |
| राजीव गांधी अन्नतंत्र महाविद्यालय, परभणी | ८० |
| अन्नतंत्र महाविद्यालय, नायगांव, जि. नांदेड | ८० |
| एमजीएम अन्नतंत्र महाविद्यालय, गांधेली ता.जि.औरंगाबाद | ८० |
| एमआयपी अन्नतंत्र महाविद्यालय, औंढा नागनाथ जि. हिंगोली. | ४० |
| अन्नतंत्रज्ञान महाविद्यालय, गेवराई तांडा ता.जि.औरंगाबाद | ४० |
| एमआयटी अन्नतंत्र महाविद्यालय,बीड बायपासरोड, औरंगाबाद | ४० |
| अन्नतंत्र महाविद्यालय, नेहरुनगर, ता.कंधार जि. नांदेड | ४० |
| अन्नतंत्र महाविद्यालय, आष्टी जि. बीड | ४० |
| एकूण | ६०० |

## विना अनुदानित संलग्न महाविद्यालय (पदवी अभ्यासक्रम) कृषि जैवतंत्रज्ञान - ५

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नांव | प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| १ | महात्मा गांधी कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, पोखर्णी, ता.जि. नांदेड | १०० |
| २ | कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, गेवराई तांडा, औरंगाबाद | १०० |
| ३ | महात्मा गांधी मिशन कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, गांधेली, औरंगाबाद | १०० |
| ४ | आदित्य कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, तेलगांव रोड, बीड | १०० |
| **एकूण** | | **४००** |
| कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय | | |
| १ | कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, चिखुर्डा, लातूर | १२० |
| **एकूण** | | **८०** |
| कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय - २ | | |
| १ | आदित्य कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, बीड | ८० |
| २ | कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, नेहरुनगर, नागलगांव, जि. नांदेड | ४० |
| **एकूण** | | **२००** |

## सन २०२३-२४ या वर्षात पास झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या

| अ.क्र. | विषयाचे नाव | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| | **पीएच.डी. आचार्य** | |
| १ | पी.एच. डी (कृषि) | २९ |
| २ | पी.एच. डी (सामाजिक विज्ञान) | ०० |
| ३ | पी.एच. डी (अन्नतंत्र) | ०४ |
| ४ | पी.एच. डी (कृषि अभियांत्रीकी) | ०२ |
| | एकूण अ | ३५ |
| | **पदव्युत्तर** | |
| १ | एम.एस.सी (कृषि) | २४१ |
| २ | एम.एस.सी (उद्यानविद्या) | ३६ |
| ३ | एम.एस.सी (सामाजिक विज्ञान) | ०५ |
| ४ | एम.एस.सी (अन्नतंत्र) | १५ |
| ५ | एम.एस.सी (कृषि अभियांत्रीकी) | ११ |
| ६ | एम.एस.सी (कृषि पणन व्यवस्थापन) | ३४ |
| ७ | एम.एस.सी (कृषि जैव तंत्रज्ञान) | ०७ |
| | एकूण ब | ३४९ |
| | **पदवी** | |
| १ | बी.एस.सी (कृषि) | ३१९२ |
| २ | बी.एस.सी (उद्यानविद्या) | ४३ |
| ३ | बी.एस.सी (सामाजिक विज्ञान) | २९ |
| ४ | बी.एस.सी (जैव तंत्रज्ञान) | ७४३ |
| ५ | बी.टेक (अन्नतंत्र) | ६३६ |
| ६ | बी.टेक (कृषि अभियांत्रीकी) | ३७९ |
| ७ | बी.बी.ए. (कृषि) | ३६ |
| | **एकूण क** | **५०५८** |
| | **एकूण ड अ + ब + क** | **५४४२** |

## निम्नस्तर कृषि शिक्षण अभ्यासक्रम सन २०२३-२४

| अ.क्र | अभ्यासक्रम | विद्यार्थी संख्या | उत्तीर्ण विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १ | कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम | ३२२१ | ९७६ |
| २ | माळी प्रशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रम | ३३ | ०९ |

## कार्यक्रमांचे आयोजन

### 'अन्न सुरक्षा आणि कृषी शाश्वततेसाठी मातीचे आरोग्य पुर्नेजीवन' यावरील मृदाशास्त्रज्ञांचा राज्यस्तरीय परिसंवाद

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठात भारतीय मृद विज्ञान संस्था, शाखा परभणीच्या वतीने २१ व २२ डिसेंबर रोजी 'अन्न सुरक्षा आणि कृषी शाश्वततेसाठी मातीचे आरोग्य पुर्नेजीवन' यावरील मृदाशास्त्रज्ञांच्या राज्यस्तरीय परिसंवाद आयोजित करण्याज आला. कार्यक्रमास कुलगुरू मा.डॉ. इन्द्र मणि, भाकृअप, नवी दिल्लीचे उप महासंचालक डॉ. एस.के. चौधरी, कृषि शास्त्रज्ञ भरती मंडळाचे सदस्य डॉ. बी. एस. व्दिवेदी, हैद्राबाद येथील इक्रीसॅटच्या जागतिक संशोधन कार्यक्रमाचे संचालक डॉ. एम.एल. जाट हे उपस्थित होते तर व्यासपीठावर शिक्षण संचालक डॉ उदय खोडके, सहयोगी अधिष्ठाता डॉ सय्यद ईस्माईल, आयोजक विभाग प्रमुख डॉ प्रविण वैद्य, सचिव डॉ अनिल धमक आदींची उपस्थिती होती.



**अन्नसुरक्षा तसेच कृषि शाश्वतता यासाठी जमिनीचे आरोग्य - राज्यस्तरीय चर्चासत्र**

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू मा डॉ इन्द्र मणि म्हणाले की, नैसर्गिक साधनसंपत्ती पाणी, माती, ऊर्जा यांचे संवर्धन करण्यातची जबाबदारी प्रत्येकाची आहे. बदलत्यास हवामानामुळे शेती क्षेत्रावर मोठा परिणाम होत आहे. शेतकरी बांधवाना शेतीत जोखिम व्यवस्थापन शिकण्याची आवश्यवकता आहे. डॉ. एम एल जाट यांनी जगात शांतता व अखंडता राखण्याकरिता मातीचे आरोग्यी टिकविणे आवश्यक असल्याचे म्हणले. तर डॉ बी एस व्दिवेदी यांनी धोरणकर्ते, उद्योजक, शासन, विद्यापीठ आणि शेतकरी यांनी एकत्रितपणे मृदा आरोग्यी जपण्याकरिता काम करण्या ची गरज असल्याचे म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ प्रविण वैद्य यांनी केले. परिसंवादात महाराष्ट्रातील चारही कृषि विद्यापीठातील तसेच भारतीय कृषि अनुसंधान संस्थातील १४७ शास्त्रज्ञांनी सहभाग नोंदविला असुन अन्न सुरक्षा आणि कृषि शाश्वतेसाठी मातीचे आरोग्य पुनरर्ज्जीवित करणे या विषयावर परिसंवादात सहभागी मृदाशास्त्रदज्ञ विविध सत्रात विचारमंथन करण्या त आले.

महाराष्ट्र ठिंबक सिंचन, तुषार सिंचन व सुक्ष्म सिंचन पध्दतीचा शेतकरी बांधव मोठा प्रमाणात वापर करित आहेत.




**डॉ. एस.के. चौधरी, उप महासंचालक, भाकृअप, नवी दिल्ली यांचे मार्गदर्शन**




**प्रा.डॉ. इन्द्र मणि, मा.कुलगुरु यांचे मार्गदर्शन**

रासायनिक खतांचा वापर मर्यादित करण्याकरिता पर्याय दयावा लागेल. दरवर्षी विविध कारणांमुळे जमिनीची धूप होत असल्या्ने मातीचा -हास होत आहे. मातीचे आरोग्य अबाधित राखण्यासाठी विशेष लक्ष देण्याची गरज आहे. बदलत्याा हवामान परिस्थितीत माती व पाणी यांच्यू स्व रूपात होणारे बदल लक्षात घेऊन संशोधनाला प्राधान्या द्यावे लागेल. कृषीच्यो विद्याथ्यातुन चांगले शास्त्रज्ञ घडले पाहिजेत, त्या दृष्टीने प्रयत्न करण्याची गरज, असे प्रतिपादन नवी दिल्ली येथील नैसर्गिक स्त्रोत व्यवस्थापन संस्थेचे उपमहानिर्देशक डॉ एस के चौधरी यांनी केले.

सदरच्या सेमिनारमध्ये जमिनीचे आरोग्य, जमिनीतून होणाऱ्या अन्नद्रव्यांचा उपसा आणि जमिनीचे पोषन यासोबतच काटेकोर शेती पद्धती आणि पिकाची उत्पादकता आणि विविध प्रकारच्या जमिनीमध्ये अन्नद्रव्य व्यवस्थापन, तृण धान्य पिकांना पोषक मूलद्रव्ययुक्त करणे संदर्भात पर्याय आणि जमिनीचे बिघडलेले आरोग्य सुधारण्यासाठी यासोबतच अन्नसुरक्षेसाठी जमिनीचा वापर, जमीन गुणवत्तेचे विश्लेषण या संदर्भात विविध उद्योजक आणि प्रगतीशील शेतकरी यांच्या समवेतच मृदाविज्ञान विषयातील तज्ञ यांनी चर्चा केली आणि विशेष शिफारशी शासनाला सादर केल्या

## प्रायोगिक पूर्व-प्राथमिक शाळा, मानव विकास आणि कौटुंबिक अभ्यास विभाग, सामुदायिक विज्ञान महाविद्यालय, वनामकृवी, परभणी

वनामकृवी, परभणी येथील सामुदायिक विज्ञान महाविद्यालयातील मानव विकास आणि कौटुंबिक अभ्यास विभागांतर्गत पदवीपूर्व आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांना बालसंगोपन, विकास आणि शिक्षण आणि संबंधित अभ्यासक्रमांमध्ये प्रत्यक्ष प्रशिक्षण आणि व्यावहारिक अनुभव देण्याकरिता सन १९७७ पासून प्रायोगिक पूर्व-प्राथमिक शाळा (एलपीपी स्कूल) सुरु केलेली आहे. या सुविधांमुळे ग्रामीण, झोपडपट्टी आणि शहरी कुटुंबांच्या फायद्यासाठी संशोधन आणि विस्तार शिक्षण उपक्रम राबविण्यास देखील मदत झाली आहे.

सध्या विभागीय प्राध्यापकांचा दृष्टिकोन आणि ध्येयाच्या समन्वयामुळे आणि विद्यापीठ प्रशासनाकडून प्राप्त होत असलेल्या उत्कृष्ट मार्गदर्शन आणि पाठिंब्यामुळे ही शाळा उत्कृष्टतेच्या पातळीवर पोहोचली आहे. या शाळेबद्दल पालकांचा विश्वास निर्माण झालेला असल्याने पालकांकडून त्यांच्या बालकांना प्रवेश मिळावा यासाठी त्यांची मोठी मागणी आहे. दरवर्षी जवळजवळ २०० विद्यार्थी या शाळेत प्रवेश घेत असून (वयोगट : २ ते ६ वर्षे) या शाळेतर्फे त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देत असलेल्या समृद्ध उत्तेजनात्मक वातावरणाचा लाभ त्यांना मिळत आहे.






**पदवीदान समारंभ (एलपीपी स्कुल), सामुदायीक विज्ञान महाविद्यालय**

पूर्व- प्राथमिक शिक्षण हे बालकांच्या आयुष्यातील एक पायाभूत टप्पा असल्याने, ही शाळा दरवर्षी दीक्षांत समारंभाचे आयोजन करून ज्यांनी त्यांचा या शिक्षणाचा प्रवास यशस्वीरित्या पूर्ण केला आहे अशा विद्यार्थ्यांचा सन्मान करते. भारतीय असल्याचा अभिमान बाळगत सर्व विद्यार्थी आणि अधिकारी दीक्षांत समारंभाला जाण्यापूर्वी पारंपारिक भारतीय पोशाख परिधान करतात. या पोषाखात त्यांना अधिक आरामदायक आणि त्यांच्या संस्कृतीशी जोडलेले वाटते. हा कार्यक्रम त्यांच्या पहिल्या शैक्षणिक टप्प्याचा उत्सव म्हणून साजरा केल्या जाऊन त्यांना पुढील औपचारिक शालेय शिक्षणासाठी तयार करतो.

## सामुदायिक विज्ञान महाविद्यालय, परभणी

### प्रशिक्षण कार्यक्रम

- शिवणकाम - ३०० प्रशिक्षणार्थी
- भरडधान्यापासून तयार होणारे पदार्थ - ४० प्रशिक्षणार्थी

**महिला ऊस कामगार यांच्यासाठी आरोग्यज्ञान या विषयावर मोबाईल ॲप**




आरोग्यज्ञान










**मिश्र अध्ययन (शिक्षण) यावर चर्चासत्र**




**पतंजली यांचेमार्फत विद्यापीठात आरोग्य या विषयावर चर्चासत्र**




वनामकृवि, परभणी येथे उन्नत कौशल विकास कार्यक्रमा अंतर्गत कौशल्य विकास प्रशिक्षण नोव्हेंबर २२-२४, २०२३ दरम्यान आयोजित करण्यात आले. हा कार्यक्रम सीएनएच न्यु हॉलंड यांच्याकडून कार्पोरेट सामाजिक जबाबदारी या अंतर्गत आयोजित करण्यात आला. कार्यक्रमास परिसरातील १०० पेक्षा जास्त प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.इन्द्र मणि, मा.कुलगुरु, वनामकृवि, परभणी, डॉ. डी.एन. गोखले, डॉ. स्मिता सोलंकी यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमात ट्रॅक्टरची निगा, देखभाल व दुरुस्ती यावर प्रशिक्षण देण्यात आले.



## कृषि महाविद्यालय, गोळेगाव वर्धापन दिन

कृषि महाविद्यालय, गोळेगाव, ता.औंढा, जि.हिंगोली चा वर्धापन दिन नुकताच साजरा करण्यात आला. कार्यक्रमास डॉ.इन्द्र मणि, मा.कुलगुरु, वनामकृवि, परभणी, डॉ. के.पी. गोरे, माजी कुलगुरु, डॉ. डी.एन. गोखले, डॉ. भगवान आसेवार, श्री. दिपक कशाळकर आणि इतर प्राध्यापक उपस्थित होते.



College of Agriculture, Golegaon - Foundation Day

## अन्नतंत्र महाविद्यालय, परभणी

### सामायीक उष्मायण केंद्र

अन्नतंत्र महाविद्यालय, वनामकृवि, परभणी येथे केंद्रशासन सहाय्यित प्रधानमंत्री सुक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग उष्मायन योजने अंतर्गत (PMFME), इंन्क्यूबेशन सेंटर उभारणी साठीच्या केंद्र शासनाकडून मान्यता मिळालेली आहे. या उष्मायन केंद्रा (Incubation Centre) अंतर्गत गुळ, उसाचा रस व मसाला प्रक्रिया अशा तीन प्रक्रियांसाठी नवीन इमारत, उपकरणे व यंत्र सामुग्री इ. साठी एकत्रित रु.३,२९,५०,०००/- (रु. तीन कोटी एकोनतीस लाख पन्नास हजार फक्त) मंजुर झालले आहेत. योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना प्रशिक्षण, प्रात्यक्षिक आणि कौशल्य विकास देण्यासाठी इनक्यूबेशन सेंटरची सुविधा वापरली जाते. इनक्यूबेशन सेंटरच्या प्रक्रिया सुविधा विद्यमान आणि इच्छुक सूक्ष्म उद्योजक, (FPO), स्वयंसहायता गट, सहकारी, ईएलपी विद्यार्थी अन्न उत्पादने तयार करण्यासाठी उपलब्ध करून दिल्या जातात.

गूळ प्रक्रिया रान व उसाचा रस आणि पेय प्रक्रिया रान भाडे तत्त्वावर चालविण्यासाठी थर्ड पार्टी/प्रायव्हेट ऑपरेशन मेंटेनन्स अँड मॅनेजमेंट एजन्सीकडे सोपविण्यात आली आहे. इन्क्युबेशन सेंटरची प्रक्रिया सुविधा विद्यमान आणि इच्छुक सूक्ष्म उद्योजक, एफपीओ, बचत गट, सहकारी आणि ईएलपी विद्यार्थी इत्यादींना एजन्सीद्वारे खाद्यपदार्थ तयार करण्यासाठी उपलब्ध करून दिली जाते.





सामायीक उष्मायन केंद्र

## उद्यानविद्या महाविद्यालय

उद्यानविद्या महाविद्यालयमध्ये राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभाग चालवला जातो, ज्यामध्ये एकूण ५० स्वयंसेवकांची प्रवेश क्षमता आहे. स्वयंसेवकास छडड चे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी दोन वर्षांत एकूण २४० तासांचे NSS कार्य पूर्ण करणे आवश्यक असते. २४० तासांचे कार्य पूर्ण केल्यानंतर स्वयंसेवकांनी महाविद्यालयातर्फे आयोजित केलेल्या विशेष शिबिरात भाग घेतला. हे विशेष शिबिर पिंपळगाव कुटे ता.वसमत, जि.हिंगोली येथे आयोजित करण्यात आले होते. स्वयंसेवकांनी गावातील शाळेतील मुलांबरोबर 'प्रभातफेरी' काढली आणि मुलींना शिक्षण, हुंडाबंदी, वृक्षारोपण अशा सामाजिक प्रबोधनासाठी घोषणाबाजी केली. या शिबिरात अंधश्रद्धा निर्मूलन, स्वच्छता आणि आरोग्याचे महत्त्व, तसेच शेती पिक व्यवस्थापनावर विशेष व्याख्याने आयोजित करण्यात आली होती.








कृषि कार्यनुभव कार्यक्रम (RAWE) - विद्यार्थी उपक्रम




कृषि कार्यनुभव कार्यक्रम (RAWE) - विद्यार्थी उपक्रम




उद्योजकता शिक्षण प्रकल्प (ELP Activities) - विद्यार्थी उपक्रम

**List of students qualified in ASRB-NET 2023**

| Sr.No. | Reg.No. | Name of student | Department | Category | Marks |
|---|---|---|---|---|---|
| 1. | 2021A/52ML | Chinthala Y.K. | Agril. Entomology | OBC | 55.33% |
| 2. | 2021A/58ML | Randive D.B. | Agril. Entomology | SC | 48.67% |
| 3. | 2020A/71ML | Zatale N.D. | Agril. Entomology | OBC | 45 % |
| 4. | 2019A/67ML | Patel H.N. | Agril. Entomology | General | 50 % |
| 5. | 2019A/66ML | Gore S.H. | Agril. Entomology | OBC | 45 % |
| 6. | 2019A/72ML | Sharad K. M. | Agril. Entomology | ST | 40 % |
| 7. | 2018A/61ML | Bankar D.R. | Agril. Entomology | OBC | 45 % |
| 8. | 2018A/64ML | Dhormare A. P. | Agril. Entomology | OBC | 45 % |
| 9. | 2018A/71ML | Thakre B. A. | Agril. Entomology | OBC | 45 % |
| 10. | 2017A/62ML | Deshmukh K.V. | Agril. Entomology | OBC | 45 % |
| 11. | 2016A/69ML | Sakhare V.M. | Agril. Entomology | OBC | 48.22% |
| 12. | 2011A/22ML | Shendage S. A. | Agril. Entomology | OBC | 45% |
| 13. | 2021A/80ML | Kurapati K. | Plant Pathology | EWS | 52.89% |
| 14. | 2021A/10ML | P. Sharma | Agronomy | UR | 56.00% |
| 15. | 2021A/11ML | Rajkumar C. | Agronomy | OBC | 46.89% |

**List of students qualified in ICAR-JRF : 2022**

| Sr. No | Name of student | Reg. No | Discipline | Category | Rank |
|---|---|---|---|---|---|
| 1. | G. R. Shinde | 2017AGLT079 | Entomology and Nematology (4) | GEN | 103 |
| 2. | V.N. Hagare | 2018AGLT034 | Entomology and Nematology (4) | OBC | OBC-70 & GEN-158 |
| 3. | S.B. Shinde | 2018AGLT079 | Entomology and Nematology (4) | GEN | GEN-693 |
| 4. | S.V. Dhanwe | 2018AGLT024 | Entomology and Nematology (4) | ST | ST-41 & GEN-785 |
| 5. | A. D. Kadam | 2018AGLT040 | Plant Sciences (2) | EWS | EWS-13 & GEN-65 |
| 6. | S. U. Deshmukh | 2018AGLT019 | Plant Sciences (2) | GEN | GEN-1152 |
| 7. | A.K. Kamble | 2018AGLT042 | Agronomy (5) | SC | SC-169 & GEN-1129 |
| 8. | S.R. Kadam | 2018AGLT096 | Physical Science (3) | GEN | GEN-285 |
| 9. | S.S. Eklare | 2018AGLT027 | Agri Business Management (19) | OBC | OBC-304 & GEN-752 |

## कृषि महाविद्यालय, लातूर – उपलब्धी

**List of students qualified in ICAR-SRF 2023**

| Sr. No | Reg. No. | Name of student | Department | Category | Rank obtained | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | Overall | Category |
| 1. | 2021A/60ML | Thasnifa B.S.C.N. | Agril. Entomology | ST | 183 | 14 |
| 2. | 2021A/52ML | Chinthala Y.K | Agril. Entomology | OBC | 191 | 75 |
| 3. | 2021A/80ML | Kurapati K. | Plant Pathology | EWS | 29 | 5 |
| 4. | 2021A/26ML | Burri K. S. | Genetics and Plant Breeding | SC | 216 | 21 |
| 5. | 2021A/31ML | Guglothu S. | Genetics and Plant Breeding | ST | 468 | 23 |
| 6. | 2021H/07ML | Sristi G. | Horticulture (Fruit Science) | UR | 91 | - |
| 7. | 2021A/10ML | P. Sharma | Agronomy | UR | 126 | - |
| 8. | 2021A/62ML | Takte P.P. | Agril. Extension Education | OBC | 98 | 34 |
| 9. | 2021A/62ML | PagareY.D. | Agril. Extension Education | OBC-NCL | 246 | 84 |
| 10. | 2021A/62ML | Ghodke R.V. | Agril. Extension Education | SC | 60 | 9 |

**List of students employed through Campus Placement/ Interviews conducted during 2023**

| Sr. No | Name of Company | Date of Campus Interviews | Name of Post | Reg. No. of | Name of student |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Viterra India Pvt. Ltd. (Formerly known as Glencore Agriculture India Pvt Ltd) | 11.04.2023 | Research Analyst (Marathwada Region) | 2021A/57ML | D. Mujmule |
| | | | Research Analyst (North Maharashtra & Vidarbha) | 2021A/61ML | D. Wayal |
| | | | Research Analyst (Karnataka) | 2021A/08ML | Thayanna N. M.K. |
| 2. | Gharda Chemicals Ltd., Mumbai | 08.05.2023 | Field Assistant | 2020AGLT358 | S. S. Vaidya |
| | | | Field Assistant | 2020AGLT351 | Gandhale A. S. |
| | | | Field Assistant | 2020AGLT355 | Mokale R M |
| 3. | HDFC Bank, Rural Banking Group | 25.05.2023 | Relationship Managers and Rural Portfolio Officer | 2019AGLT0 | A. G. Shinde |
| 4. | Nutris Crop Solutions India Pvt. Ltd., Satara | 08.07.2023 | Market Development Officer | 2020AGLT354 | S. G. Mandhare |
| 5. | PANI Foundation, Mumbai | 22.12.2023 | Agriculture Trainer or Block Coordinator | 2021A/86ML | Balu Ramesh Chavan |
| | | | Agriculture Trainer or Block Coordinator | 2019AGLT004 | Shailesh Rajendra Badole |
| 6. | Himalaya Wellness Company, Bengaluru | 03.01.2024 | Field Assistant | 2019AGLT004 | Shailesh Rajendra Badole |

# कृषि महाविद्यालय, लातूर - अनुभवातून कृषि शिक्षण उपक्रम













# कृषि महाविद्यालय, लातूर

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी अंतर्गत कार्यरत कृषी महाविद्यालय, लातूर येथे विद्यार्थ्यांसाठी READY (Rural Entrepreneurship Awareness Development Yojana) आणि RAWE (Rural Agricultural Work Experience) हे उपक्रम नियमितपणे राबवले जातात, जे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव व ग्रामीण सहभाग मिळवून देतात. उन्हाळी सत्रामध्ये, उच्च मूल्य असलेल्या पिकांच्या संरक्षित शेतीसंदर्भातील अभ्यासक्रम राबवण्यात आला. यामध्ये विद्यार्थ्यांनी पॉलिहाउस आणि नेट हाउसमध्ये शेत व बागायती पिकांचे उत्पादन घेतले व आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित कृषी पद्धतींचा सराव केला. अनुभवाधिष्ठित शिक्षण कार्यक्रम (ELP) अंतर्गत मशरूम उत्पादन, दुग्ध प्रक्रिया व दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन, तसेच रेशीम उद्योग यांसारख्या उपक्रमांची यशस्वी अंमलबजावणी सुरू आहे. अनेक विद्यार्थी या कार्यक्रमांमध्ये प्रशिक्षण घेत असून, ते जवळील गावांमध्ये शेतकऱ्यांना मार्गदर्शन करत आहेत, आणि त्यांना आधुनिक शेतीतंत्रज्ञानाची माहिती देत आहेत.













मुलांचे वसतीगृह उद्घाटन



मुलींचे वसतीगृह उद्घाटन

# कृषि महाविद्यालय, गोळेगाव




शैक्षणिक सहल



ऑनग्रीड सोलार यंत्रणा उद्घाटन







सांस्कृतीक कार्यक्रम






कृषि कार्यानुभव कार्यक्रम

# कृषि महाविद्यालय, बदनापूर– उपलब्धी

**Graduated Students Secured Admitted for PG in Other Universities in India**

| Sr.No. | Student Name | Alloted University |
|---|---|---|
| 1 | Pathan Lalkhan ( ICAR- JRF GPB) | RPCAU, PUSA BIHAR |
| 2 | Avinash Singh (ICAR- GPB) | RPCAU, PUSA BIHAR |
| 3 | Wadekar Devansh (ICAR- GPB) | MPKV, RAHURI |
| 4 | Bankar Satish (ICAR- GPB) | ANDUA, AYODHYA |
| 5 | Meravath Shailaja (ICAR- Agronomy) | A. N. G. Ranga Agril. University, Hyderabad |
| 6 | Himashree P. S. (ICAR- Pathology) | Kerala Agricultural university |
| 7 | Bhanuse Pankaj (ICAR- Pathology) | Sher- e- Kashmir University of Agricultural Sciences and technology, Jammu |
| 8 | Bobade Puja (ICAR- Agril. Extension) | NUA, Nagaland Extension |
| 9 | Patil Abhiraj (ICAR- Pathology) | CAU, Imphal |
| 10 | Ratnaparkhi Vishwambhar (BHU-Entomology) | BHU, Varanasi |

**Students Passed ICAR - JRF Exam**

| Sr. No. | Student Name | Alloted University |
|---|---|---|
| 1 | Pathan Lalkhan ( ICAR- JRF GPB) | RPCAU, PUSA BIHAR |

**Students Passed ASRB - NET Exam**

| Sr. No. | Student Name | Discipline |
|---|---|---|
| 1 | Shreya Singh | Agronomy |







डॉ. तुकाराम मोटे, सहसंचालक कृषि, छत्रपती संभाजीनगर यांचे कृषि शिक्षणातील संधी यावर व्याख्यान

## कृषि महाविद्यालय, बदनापूर- उपलब्धी














## कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, परभणी – उपलब्धी

**राष्ट्रीय सेवा योजना संक्षिप्त अहवाल**

रासेयो विशेष कार्यक्रम थीम ‘कौशल्य विकासासाठी युवक’, रासेयो विशेष शिबीर कालावधी २१/०२/२०२४ ते २७/०२/२०२४

| कार्यक्रम/ उपक्रम | राबविलेल्या उपक्रमांची/ शिबिरांची संख्या | सहभागी स्वयंसेवक | लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|
| वृक्षारोपण | ०१ | १०० | वृक्ष लागवडीची संख्या - ३०० |
| अवयव दान जनजागृती | ०१ | १०० | एकूण उपस्थिती- २५० |
| स्वच्छता कार्यक्रम | ०३ | १०० | १०० |
| श्रमदान कार्यक्रम | ०३ | १०० | १०० |
| रस्ता सुरक्षा अभियान | ०१ | ५० | १५० |
| योग प्रशिक्षण कार्यक्रम | ०१ | ५० | एकूण उपस्थिती-१५० |
| जलसंवर्धन कार्यक्रम | ०१ | ५० | एकुण उपस्थिती - १०० |
| सावित्रीबाई फुले जयंती | ०१ | १०० | १०० |
| राष्ट्रीययुवा दिन | ०१ | १०० | १०० |
| राष्ट्रीय विज्ञान दिन | ०१ | १०० | १०० |
| जागतिक महिला दिन | ०१ | १०० | १०० |





**२) कडधान्ये आणि तेलबिया प्रक्रिया उद्योजगता शिक्षण कार्यक्रम यूनिट**

कृषि प्रक्रिया अभियांत्रिकी विभागामध्ये भरडधान्ये, कडधान्ये आणि तेलबियांवर प्रक्रिया करण्यासाठी एक शैक्षणिक व उद्योजकता-आधारित नमुना प्रकल्प केंद्र (पायलट प्लांट) स्थापन करण्यात आले आहे. या एक्सपेरिमेंटल लर्निंग प्रोजेक्ट (कध)युनिटचा उद्देश म्हणजे भरडधान्ये, कडधान्ये आणि तेलबिया यांच्यावर आधारित उत्पादने तयार करण्याच्या प्रक्रिया तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक दाखवणे आणि भावी उद्योजक व विद्यार्थ्यांसाठी उद्योजकता विकास कार्यक्रमांचे आयोजन करणे हा आहे. तसेच, या विभागात गॅस वर चालणारी संयंत्र विकसित केले आहे. यामध्ये हरभरा, ज्वारी, मका, राजगिरा, शेंगदाणे, सोयाबीन धान्य, फ्रायमस यांचे भाजणे व फुगवणे (पफिंग/पॉपिंग) या प्रक्रियेचे तंत्रज्ञान तसेच विभागात विकसित केलेल्या भाजणी व फुगवणी यंत्रांचे प्रात्यक्षिक शेतकरी गट, महिलांचे स्वयं-सहायता गट, युवा उद्योजकांचे गट तसेच विविध शाळा व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक व उद्योजकता विकासासाठी दिले जाते.

नवउद्योजक व विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण आणि मार्गदर्शन कार्यक्रमांचे आयोजन दिनांक ०१/०४/२०२३ ते ३०/०३/२०२४ या कालावधीत घेतलेली प्रात्यक्षिके व प्रशिक्षण कार्यक्रम खालील यादीप्रमाणे आहेत.

| दिनांक | विषय | लाभार्थी गट | लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १०/०३/२०२३ | सोया दूध व सोया पनीरचे प्रात्यक्षिक | शेतकरी गट, वाशिम, बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प | १५ |
| १३/०३/२०२३ | सोया दूध व सोया पनीर तयार करणे तसेच बॅच प्रकारची अर्धस्वयंचलित मल्टिग्रेन पॉपिंग व पफिंग मशीन याचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले | शेतकरी गट, हिंगोली | ६० |
| २१/०३/२०२३ | बॅच प्रकारची अर्धस्वयंचलित मल्टिग्रेन पॉपिंग व पफिंग मशीन याचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले | अमरज्योति महिला बचत गट, दीनदयाल अंत्योदय योजना, नागरी उपजीविका अभियान. | ४५ |
| १६/०२/२०२४ | सोया दूध व सोया पनीर तयार करण्याची प्रक्रिया प्रात्यक्षिक रूपाने दाखवण्यात आली. | अबक आणि एसी योजना-ट्रेनी प्रात्यक्षिक, पाच दिवसीय प्रशिक्षण | १५ |






**शैक्षणिक सहल**

कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, परभणी येथील बी.टेक.(कृषि अभियांत्रिकी) अभ्यासक्रमाच्या तृतीय सत्राच्या विद्यार्थ्यांची सहल दिनांक २१-२३ फेब्रुवारी २०२४ रोजी पश्चिम विभागातील कृषि प्रदर्शन येथे आयोजीत करण्यात आली. या शैक्षणिक सहलीमध्ये एकूण ४२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी सिंचन, ट्रॅक्टर, औजारे, ड्रोन प्रक्रियायुक्त पदार्थ या स्टॉलला भेट देऊन प्रत्यक्ष माहिती घेतली. तसेच यावेळी विद्यार्थ्यांनी कृषि विभाग, राज्यातील कृषि



विद्यापीठे, भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्लीची संशोधन केंद्रे, पशु प्रदर्शन, बचतगट, स्वयंसेवी संस्था, राज्य शासनाच्या विविध विभागाच्या स्टॉलला भेटी देऊन प्रत्यक्ष माहिती घेतली. यासोबतच विद्यार्थ्यांनी फर्टिगेशन सुधारीत शेती औजारे, जैविक तसेच सेंद्रिय खत निर्मिती या विषयांची प्रात्यक्षिकेही पाहिली. सदर शैक्षणिक सहलीमुळे ज्ञानाबरोबरच विद्यार्थ्यांची कौशल्ये ड्रोनचा शेतीत वापर व प्रात्यक्षिके पाहून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास दाखव्याचे दिसून आले.



**कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या सन २०२३-२४ च्या नोकरीच्या संधी**

| अ.क्र. | नोकरीच्या संधी | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| १ | बँकिंग | १७ |
| २ | कृषि सेवा /राज्य सेवा परिक्षा | १० |
| ३ | केंद्रिय लोकसेवा आयोग परिक्षा | ५ |
| ४ | उच्च शिक्षण (एम.टेक./पी.एच.डी./पी.जी.डिप्लोमा) | ७ |
| ५ | खाजगी संस्था (Tractor, Irrigation, Food and NGO's) | ८ |
| ६ | शासकीय नोकरी | ४ |
| ७ | शिक्षण क्षेत्रातील नोकरी | २ |
| ८ | उद्योजक | ३ |
| ९ | संगणक चाचणी विषय तयारी | ४ |
| १० | एम.बी.ए. तयारी | ६ |

**कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या सन २०२४ च्या नोकरीच्या संधी**

| अ.क्र. | नोकरीच्या संधी | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| १ | खाजगी संस्था (Tractor, Irrigation, Food and NGO's) VST Tillers & Tractor Pvt. Ltd. | 1. Borkar Darshan Gopal<br>2. Prajwal Madhav Satav |




ड्रोन तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण व मार्गदर्शन



ठिबक सिंचन तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण व मार्गदर्शन

### कृषि उत्पादकता वाढीकरीता यंत्रमानव, ड्रोन आणि स्वयंचलित यंत्राद्वारे डिजीटल शेती यावरील सेंटर ऑफ एक्सेलन्स

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठास प्रगत कृषि विज्ञान व तंत्रज्ञान केंद्र राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्पांतर्गत कृषि उत्पादकता वाढीकरीता यंत्रमानव, ड्रोन आणि स्वयंचलित यंत्राद्वारे डिजीटल शेती यावरील सेंटर ऑफ एक्सेलन्स प्रशिक्षण प्रकल्पास नवी दिल्ली येथील भारतीय कृषि संशोधन परिषदेने मान्यता दिली आहे. या प्रकल्पात डिजीटल शेती संबंधीत विविध आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय संस्था तसेच कंपन्या, उद्योजक यांचे जाळे तयार होण्यास मदत होणार आहे.

शेतक-यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी शेतीतील उत्पादन खर्च कमी करणे, विविध निविष्ठांचे कार्यक्षमरित्या उपयोग करणे यासाठी तंत्रज्ञानाची गरज आहे. येणारे युग हे डिजीटल तंत्रज्ञानाचे असुन शेतीत देखील डिजीटल तंत्रज्ञानाचा वापर करावा लागणार आहे. यादृष्टीने विद्यापीठाने पुढाकार घेऊन डिजीटल शेतीला लागणारे मनुष्यबळ निर्मितीकरीता सदरील प्रशिक्षण प्रकल्प हाती घेतला आहे. यात डिजीटल शेतीच्या तंत्रज्ञानात्मक देवाणघेवाणकरीता जगातील अग्रगण्य विद्यापीठाशी सामंजस्य करार केला असुन यात अमेरिकेतील वॉशिंग्टन स्टेट युनिव्हर्सिटी तसेच स्पेन, युक्रेन व बेलारुस येथील विद्यापीठांचा समावेश आहे. तसेच पवई आणि खरगपुर येथील आयआयटी संस्थेचे नॉलेज सेंटर म्हणुन सहकार्य लाभणार आहे.

या प्रकल्पात यंत्रमानव, ड्रोन व स्वयंचलीत यंत्र सारखी डिजीटल साधनांचा समावेश असणा-या विविध संशोधन प्रयोगशाळा निर्माण करुन विद्यार्थी व संशोधन प्राध्यापकांना प्रशिक्षणाची सुविधा निर्माण करण्यात येणार आहे. या केंद्राद्वारे कौशल्य प्राप्त प्रशिक्षणार्थी डिजीटल शेतीचे तंत्र शेतक-यांपर्यंत नेण्याचा प्रयत्न करणार आहेत. प्रकल्पास अठरा कोटी रुपयांचा निधी मंजुर करण्यात आला आहे, यात पन्नास टक्के वाटा जागतिक बॅंक व पन्नास टक्के वाटा भारत सरकार कडुन भारतीय कृषि संशोधन परिषदेच्या माध्यमातुन प्राप्त होत आहे.विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रशिक्षण कार्यक्रम, पदव्युत्तर व आचार्य विद्यार्थी प्रशिक्षण तसेच विविध विषयांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय वेबीनार आयोजित करण्यात आले.



Mobile Seed Processing Unit under NAHEP

### डिजिटल शेतीचे घडे गिरविण्याकरिता वनामकृविचे ५५ पदव्युत्तर विद्यार्थी रवाना

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठातील जागतिक बॅंक आणि भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली पुरस्कृत राष्ट्रीय कृषी उच्च शिक्षण प्रकल्पांतर्गत डिजिटल शेतीवर आधारीत प्रकल्प राबविण्यात येत असुन या प्रकल्पांतर्गत डिजिटल शेतीसंबंधीत शैक्षणिक आणि संशोधन उपक्रम राबविण्यात येत आहेत. प्रकल्पांर्गत विद्यापीठातील प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल शेती संबंधीत कौशल्य निर्मिती करणे हा मुख्य उद्देश आहे. याचाच एक भाग म्हणुन थायलंड येथील एशियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी या नामांकित संस्थेत विद्यापीठांतर्गत असलेल्या विविध महाविद्यालयातील अकरा पदव्युत्तर विद्यार्थ्यांना डिजिटल तंत्रज्ञान व त्याचा वापर या एक महिन्याच्या आयोजित प्रशिक्षण करिता दिनांक २६ फेब्रुवारी ते २६ मार्च दरम्यान पाठविण्यात आले आहे. सदर विद्यार्थ्यांचे पदव्युत्तर संशोधन हे डिजिटल तंत्रज्ञान व यांत्रिकीकरण यावर आधारित आहे.

**विदेशी संस्थांमध्ये आधुनिक प्रयोगशाळेला वनामकृविच्या शास्त्रज्ञांच्या भेटी**

१. डॉ. आर. पी. कदम यांनी पुत्रा मलेशिया विद्यापीठात २४ नोव्हेंबर ते १० डिसेंबर, २०२३ या कालावधीत १५ दिवसीय प्रशिक्षण घेतले.
२. डॉ. पी. एस. कापसे यांनी पुत्रा मलेशिया विद्यापीठात २४ नोव्हेंबर ते १० डिसेंबर, २०२३ या कालावधीत १५ दिवसीय प्रशिक्षण घेतले.
३. डॉ. ए. ए. भरोसे यांनी पश्चिम सिडनी विद्यापीठ, ऑस्ट्रेलिया येथे २३ नोव्हेंबर ते २५ डिसेंबर, २०२३ या कालावधीत ३० दिवसीय प्रशिक्षण घेतले.
४. डॉ. आर. बी. क्षीरसागर यांनी अन्नतंत्र या विभागात ब्राझिल येथे १ ते १५ डिसेंबर, २०२३ या कालावधीत १५ दिवसीय प्रशिक्षण घेतले.
५. डॉ. प्रविण घाडगे यांनी अन्नतंत्र या विभागात ब्राझिल येथे १ ते १५ डिसेंबर, २०२३ या कालावधीत १५ दिवसीय प्रशिक्षण घेतले.
६. डॉ. कैलास गाडे यांनी अन्नतंत्र या विभागात ब्राझिल येथे १ ते १५ डिसेंबर, २०२३ या कालावधीत १५ दिवसीय प्रशिक्षण घेतले.
७. डॉ. भारत आगरकर यांनी डबरिकण, हंगेरी येथे १५ दिवसीय प्रशिक्षणात भाग घेतला.
८. डॉ. अनुप्रिता जोशी यांनी डबरिकण, हंगेरी येथे १५ दिवसीय प्रशिक्षणात भाग घेतला.
९. आर. ई. कांबळे, एस. एस. वडनेरकर, पी. एस. गंगाखेडकर आणि व्ही. पी. जाधव यांनी डबरिकण, हंगेरी येथे नोव्हेंबर ते डिसेंबर, २०२३ या कालावधीत ३० दिवसीय प्रशिक्षण घेतले.
१०. वि. बी. वाडमारे, एस. पी. चावनके, ए. ई. मुंजमुळे आणि सी. जे. गीरीपुंजे यांनी कांपीनस विद्यापीठ, ब्राझील येथे डिसेंबर, २०२३ या कालावधीत ३० दिवसीय प्रशिक्षण घेतले.
११. डॉ. जी. एस. पवार, डॉ. जे. डी. देशमुख यांनी वेस्टर्न सिडनी, ऑस्ट्रेलिया येथे १५ दिवसीय प्रशिक्षणात भाग घेतला.
१२. डॉ. सी. व्ही. अंबाडकर यांनी वेस्टर्न सिडनी, ऑस्ट्रेलिया येथे १५ दिवसीय प्रशिक्षणात भाग घेतला.
१३. डॉ. एस. यु. पवार यांनी पुत्रा मलेशिया विद्यापीठात १५ दिवसीय प्रशिक्षण घेतले.
१४. डॉ. मेघा जगताप यांनी वेस्टर्न सिडनी विद्यापीठ, ऑस्ट्रेलिया येथे १५ दिवसीय प्रशिक्षणात भाग घेतला.
१५. डॉ. डी. डी. पटाईत यांनी पुत्रा मलेशिया विद्यापीठात १५ दिवसीय प्रशिक्षण घेतले.
१६. एम. गाडेकर, एम. भोंडवे, पदव्युत्तर विद्यार्थी आणि आर. साळवे, ए. काळे आचर्य पदवी विद्यार्थी यांनी पुत्रा मलेशिया विद्यापीठात १५ दिवसीय प्रशिक्षण घेतले.
१७. डॉ. व्ही. एस. खंदारे यांनी स्पेन मधील वेलनिका येथील कृषि यांत्रिकी प्रयोगशाळा व पॉलिटेकनिक विद्यापीठ येथे १५ दिवसीय प्रशिक्षण घेतले.
१८. डॉ. पी. एच. वैद्य यांनी पुत्रा मलेशिया विद्यापीठात १५ दिवसीय प्रशिक्षण घेतले.
१९. डॉ. पी. एच. गौरखेडे यांनी पुत्रा मलेशिया विद्यापीठात १५ दिवसीय प्रशिक्षण घेतले.
२०. डॉ. व्ही. के. इंगळे यांनी पुत्रा मलेशिया विद्यापीठात १५ दिवसीय प्रशिक्षण घेतले.
२१. डॉ. एस. डी. पायाळ यांनी पुत्रा मलेशिया विद्यापीठात १५ दिवसीय प्रशिक्षण घेतले.
२२. आर. व्ही. चव्हाण यांनी स्पेन मधील वेलनिका येथील कृषि यांत्रिकी प्रयोगशाळा व पॉलिटेकनिक विद्यापीठ येथे १५ दिवसीय प्रशिक्षण घेतले.
२३. प्रा. डी. व्ही. पाटील यांनी कानसास विद्यापीठात १५ दिवसीय प्रशिक्षण घेतले.

**Demonstration of Drone technology on farmers field**

National Higher Education Project (NAHEP) project sponsored jointly by World Bank and Indian Council of Agricultural Research, New Delhi is being in operation at VNMKV, Parbhani. The main objective of the project is to create awareness of drone technology among farming community. College of Agricultural Engineering and Technology demonstrated the use of drone technology on farmers field at village Pingli and Karegaon. Dr. Indra Mani, Hon. Vice Chancellor inaugurated the programme on 30th March, 2023. The demonstration was organised on the field of Shri. Sopanraoji Awachar and Shri. Khurana. Dr. U.M.Khodke, Associate Dean and Principal, Dr. Gopal Shinde, PI, NAHEP along with Shri. Rahul Magdum and Er. Ajinkya from IoTech company were present for this programme.

# विद्यापीठाचा २५ वा दीक्षांत समारंभ

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचा २५ वा दीक्षांत समारंभ १९ मार्च, २०२४ रोजी संपन्न झाला. दीक्षांत समारंभाच्या अध्यक्षस्थान विद्यापीठाचे माननीय कुलपती तथा माननीय राज्यपाल महाराष्ट्र शासन श्री. रमेश बैस यांनी आभासी माध्यमातून द्वारे भूषविले आणि प्रमुख अतिथी भारतीय कृषी शास्त्रज्ञ निवड मंडळाचे अध्यक्ष माननीय डॉ. संजय कुमार यांनी दीक्षांत अभिभाषण केले तर वनामकृविचे कुलगुरु प्रा.(डॉ.) इन्द्र मणि, पदेकृविचे कुलगुरु डॉ शरद गडाख, माफसूचे कुलगुरु डॉ. नितीन पाटील, विद्यापीठ कार्यकारी परिषदेचे सदस्य डॉ. आर. ए. मराठे, श्री. दिलीप देशमुख, विद्वत परिषदेचे सदस्य डॉ. पी. जी. इंगोले, वनामकृविचे माजी कुलगुरु डॉ. सी. डी. मायी, डॉ. के. पी. गोरे, डॉ. बी. व्यंकटेश्वरलू, डॉ. अशोक ढवण, वनामकृविचे शिक्षण संचालक डॉ. उदय खोडके, कुलसचिव श्री. पुरभा काळे, विस्तार शिक्षण संचालक डॉ. धर्मराज गोखले, संशोधन संचालक डॉ जगदीश जहागीरदार, संचालक बियाणे डॉ. देवराव देवसरकर, मकृशिसंपचे शिक्षण संचालक डॉ. हेमंत पाटील, उप कुलसचिव डॉ. गजानन भालेराव, विद्यापीठ अभियंता श्री. दीपक कशाळकर, नियंत्रक श्री. प्रवीण निर्मळ आणि सर्व महाविद्यालयांचे सहयोगी अधिष्ठाता आदींची उपस्थिती होती. विविध विद्याशाखेतील ११००२ स्नातकांना विविध पदवी, पदव्युत्तर पदवी आणि आचार्य पदवीने अनुग्रहित करण्यात आले. दीक्षांत समारंभास शहरातील प्रतिष्ठित व्यक्ती, प्रगतशील शेतकरी, विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण विद्यापीठाच्या युटयुब चॅनल वरून करण्यात आले होते.






# विद्यापीठ ग्रंथालय

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठांतर्गंत परभणी येथील विद्यापीठ परिसरात केंद्रस्थानी विद्यापीठ ग्रंथालयाची सुसज्ज इमारत आहे. मुख्यालयावरील ५ महाविद्यालये व संशोधन संस्थांना ग्रंथालयातर्फे ग्रंथालय व माहितीसेवा दिली जाते. विद्यापीठाच्या शिक्षण संशोधन व विस्तार कार्यक्रमास मदत करण्यासाठी हे एकच मध्यवर्ती ग्रंथालय आहे. व्यवस्थित ग्रंथालय सेवा देण्यासाठी मुख्यालयात ग्रंथालयाचे जाळे निर्माण करुन त्यांच्यामार्फत विद्यापीठातील सर्व महाविद्यालये, संशोधन संस्था व कृषि तंत्र निकेतन यांना देखील सेवा देणे सुरु आहे. त्यासाठी विद्यापीठ ग्रंथालय स्थानिक व राष्ट्रीय नेटवर्कशी जोडलेले आहे. सीएबी सिडी रोम ॲग्रीस सिडीरोम एफएसटीए सिडीरोम ॲकडमिक सर्च प्रिमीअर सिडीरोम डाटा बेसेस व ओपन जेगेट सेरा सीसी इन, इंडिया स्टॅट डॉट कॉम सेवा या विविध डाटाबेसेसच्या सहाय्याने हे ग्रंथालय माहितीसेवा देत आहे.

**वाचन साहित्य :**

| | | | |
|---|---|---|---|
| अ | पुस्तके | : | ८८९९९ |
| ब. | नियकालिकांचे खंड | : | १७१४२ |
| क. | संशोधन प्रबंध | : | ९५७९ |
| | एकूण | : | ११५७२० |




**नियतकालिके :**

| | | | |
|---|---|---|---|
| अ | नियतकालिके (वर्गणी भरलेली) | : | १४ |
| ब. | नियतकालिके (देणगी दाखल) | : | ११० |
| क. | नियतकालिके (आजीवन सदस्यत्व) | : | १८ |
| | एकूण | : | १४२ |

**ग्रंथालय सभासदत्व संख्या**

| | | | |
|---|---|---|---|
| अ | विद्यार्थी संख्या | : | ७१७ |
| ब | शिक्षक व शिक्षकेत्तर संख्या | : | ३० |
| क | तात्पुरते सभासद संख्या | : | ०२ |
| | एकुण | : | ७४९ |

**e-Resources**

| | | |
|---|---|---|
| Cera e-journals | : | 3162 |
| J-gate agricultural and biological sciences e journals | : | 2880 |
| Diva enterprises e-journals | : | 100 |
| Subscibed e-books | : | 70 |
| I-scholer e-journals | : | 17 |
| Total e-journals | : | 6142 |
| Indiaagristat.com-website providing statistical information | | |

**विद्यापीठ ग्रंथालयात खालील डाटाबेसेस उपलब्ध आहेत :**

- **सीएबी सिडी रोम:** हा माहिती संग्रह सीएबी ॲबस्ट्रक्टच्या समकक्ष आहे. यात कृषि, वने व त्या संबंधी माहिती समाविष्ट आहे. या संग्रहात, विविध ७४ भाषेत प्रकाशित झालेल्यामुळे दस्तऐवजाच्या ४ दशलक्ष नोंदी (सारांशसह) इंग्रजीही भाषेत उपलब्ध आहेत. या संग्रहात, कृषि विषयक प्रकाशित ८० टक्के साहित्याचा समावेश आहे.

- **ॲग्रीस :** यात १३५ सदस्य देश व २४ राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय केंद्राच्या कृषि व तंत्रज्ञान विषयक माहितीचा समावेश आहे. संकलनाकरिता ॲग्रीसचे जाळे संपूर्ण जगात व्यापक प्रमाणात पसरले आहे. या करिता युनायटेड नेशन्सची अन्न व कृषि संघटना समन्वयकासाठी स्वरुपात काम करते.
- **एफएसटीए :** एफएसटीए हा माहिती संग्रह आंतरराष्ट्रीय अन्न माहिती सेवेतर्फे प्रकाशित छापील आवृत्तीचे इलेक्ट्रॉनिक रुप आहे. हा संग्रह जगातील अन्नविज्ञान व तंत्रज्ञान मुळ स्त्रोत आहे.
  भारतीय ग्रंथालयाच्या सीडी-रोम ची एकत्रित सूची (खंड २)
  कॉपसॅट : कॉपसॅट (कंटेटस् ऑफ पिरीऑडिकल्स इन सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी) ही एक इन्फ्लिबनेट द्वारे दिली जाणारी माहिती सेवा आहे.
- **ॲकॅडेमिक सर्च प्रिमीअर :** अमेरिकेच्या इ.बी. स्टिव्हनसन आणि कंपनीने ॲकॅडमिक सर्च प्रिमीअर नावाची वेबसाईट सुरु केली आहे. वेबसाईटवर चालू वर्षाच्या ४५०० नियतकालिकातील माहिती उपलब्ध असते. त्यापैकी ३६०० नियतकालिके पूर्ण माहिती असलेली व ६०० कॉमनवेल्थ ॲग्रीकल्चरल ब्युरोची नियतकालिके असतात. ग्रंथालयात सध्या ॲकॅडेमिक सर्च प्रिमीअरच्या १९९० ते फेब्रुवारी २००४ कालावधीच्या सीडी उपलब्ध आहे.
- **जे-गेट कस्टम कन्टेन्ट (जेसीसी) :** याद्वारे विद्यापीठाच्या वाचकांना, नियतकालिकातील लेखांची सारांश सेवा देण्यात येते.
  पीएच.डी थेसिस डाटाबेस :
- **पीएच.डी थेसिस डाटाबेस :**

| | | |
|---|---|---|
| Cera.jccc.in | : | e-journal Consortium Developed by Indian Council of Agricultural Research (2000 + International Journals) |
| Krishikosh | : | Database of Ph.D. theses of all the Indian Agricultural (Indian Agricultural) Universities since 2000 Doctoral Dissertations Repository) |
| openj-gate.com | : | Free website of 100684 total hits open access journals (223 – download article, 48 – print article) |










### संगणकीय प्रलेखन व माहिती सेवा :

विद्यापीठ ग्रंथालयात सध्या तीन सर्व्हर, ४० पीसी, १० प्रिंटर व तीन स्कॅनर असून कॉमनवेल्थ ॲग्रीकल्चर ब्युरो सीडी रोम डाटा बेस, ॲग्रीस सीडी रोम डाटा बेस, फुड सायन्स ॲंड टेक्नॉलॉजी ॲब्स्ट्रॅक्ट सीडी रोम डाटा बेस, ॲकॅडमिक सर्च प्रिमीअर सीडी रोम डाटाबेस (इब्स्को), पीएच.डी. थेसिस डाटा बेस व जेसीसी सीडी रोम डाटा बेस तसेच Cera.jccc.in , KrishiPrabha, open-gate.com, indiastat.com हे ऑन लाईन डाटा बेसेस उपलब्ध आहेत. या डाटा बेसेस मध्ये कृषि व त्या संबंधित विषयांचे निर्देश सारांसहित पुरविण्याची सोय आहे. वरील डाटा बेसेस मध्ये पूर्ण शोध निबंध देखील उपलब्ध आहेत. या डाटा बेसेस द्वारा संशोधकांना प्रलेखन व माहिती सेवा दिली जाते. त्यामध्ये निर्देश व सार यांची सविषयावर निवड करुन प्रिंटर द्वारा प्रिंट करुन याद्या पुरविल्या जातात.

सन २०१३-१४ च्या आर्थिक वर्षामध्ये भा.कृ.अ.प. नवी दिल्लीच्या अनुदानातून विद्यापीठ ग्रंथालयात ङक़्क्ष़ ही संगणकीयकृत देवाण घेवाण प्रणाली कार्यान्वीत करण्यात आलेली आहे. सदरील प्रणालीमध्ये समाविष्ट  चेक इन चेक आऊट याद्वारे पुस्तकांची देवाण घेवाण करणे व इतर वाचनसाहित्य सुरक्षित ठेवणे, देवाण घेवाण पध्दतीने ने आण होणा-या वाचनसाहित्याचे संरक्षण होते. तसेच पुस्तके गहाळ होणे  किंवा चोरीस जाणे यास आळा बसतो.

विद्युत पुरवठा खंडीत झाल्यास संगणकांचा विद्युत पुरवठा सुरळीत सुरु राहवा यासाठी पाच केव्हीए चे दोन व दहा केव्हीए चे एक UPS-युपीएस खरेदी करण्यात आले आहेत. विद्यार्थी / प्राध्यापकांना उपयुक्त अशा विविध विषयांच्या प्रशिक्षणाबाबतच्या डिव्हीडी खरेदी करण्यात आलेल्या आहेत.

याशिवाय इंटरनेट, इ-मेल, ओपॅक, डॉक्युमेंट डिलीव्हरी सर्व्हिस, प्रचलित माहिती प्रसारण सेवा व  इतर नेटवर्क सेवा ग्रंथालयातील सभासदांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. इंटरनेट / इंट्रानेट / सीडी-रोम / सीडी ब्राउझिंग सेवा मोफत दिली जाते. दररोज सरासरी ७५ वाचक वरील सर्व माहिती सेवांचा उपभोग घेतात. ग्रंथालयाच्या सर्व सेवा उदा. देवाण - घेवाण, तालिकीकरण, ग्रंथ खरेदी, नियतकालिक सेवा इ. संगणकीकृत सेवा देण्यासाठी स्लिम-२१ नावाचे सॉफ्टवेअर खरेदी करण्यात आले आहे व त्याद्वारे सेवा देणे सुरु आहे.  स्लिम संगणक प्रणालीङक़्क्ष़ प्रणाली सोबत जोडण्यात आली आहे.

## विद्यापीठ ग्रंथालयास उत्कृष्ठ कामगिरीबद्दल सन्मानपत्र






# विद्यार्थी कल्याण अधिकारी

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथे शिक्षण, संशोधन व विस्तार कार्यासोबत विद्यार्थ्यांचा शारीरिक, मानसिक व बौध्दीक विकासाचे कार्य चालू आहे. सदरील कार्य हे विद्यार्थी कल्याण अधिकारी यांचे कार्यालयामार्फत केले जाते. या कार्यालयाच्या अंतर्गत विद्यापीठात विद्यार्थ्यांच्या क्रीडा कौशल्य, कला व नेतृत्व गुणांना वाव देण्यासाठी आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा, आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सव योगा दिवस, आंतर महाविद्यालयीन संशोधन स्पर्धा, आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षन व राष्ट्रीय सेवा योजना ईत्यादी उपक्रम राबवण्यात येत आहेत. विद्यापीठ स्तरावर खेळाचे मैदाने, खेळाचे साहित्य, रंगमंच व व्यायाम शाळा या सारख्या सुविधा उपलब्ध आहेत. आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा व युवक महोत्सव यासाठी क्रीडा शिक्षक व मार्गदर्शक यांच्या मार्फत विद्यार्थ्यांना क्रीडा व युवक महोत्सव स्पर्धा करिता विद्यार्थ्यांना प्रशिक्षित केले जाते.

- **व्यायाम शाळा :** वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत ५ कृषि संलग्न व महाविद्यालये मुख्य परिसरामध्ये कार्यरत आहेत. या महाविद्यालयातील पदवी, पदव्युत्तर पदवी व आचार्य पदवी या अभ्यास क्रमातील विद्यार्थ्यांचे शारीरिक दृष्टया आरोग्य चांगले राहण्याकरिता व खेळामधील कार्यक्षमता वाढविण्यासाठी अद्यावत प्रकारचे सुसज्य अशी व्यायामशाळा कार्यालयाच्या अंतर्गत स्थापित आहे व राजमाता जिजाऊ वसतीगृहामध्ये मुलींसाठी स्वतंत्र व्यायामशाळा या कार्यालया मार्फत स्थापित करण्यात आली आहे. विविध प्रकारचे व्यायाम करण्यासाठी व विद्यार्थ्यांच्या शारीरिक तंदुरुस्तीस मदत होईल असे अनेक अद्यावत उपकरण बसवण्यात आले आहे.
- **बाहय खेळ सुविधा :** विद्यापीठ क्रीडा संकुलमध्ये आंतरमहाविद्यायीन क्रीडा स्पर्धा व राज्य आणि राष्ट्रीय पातळीच्या क्रीडा स्पर्धा आयोजनासाठी खाली नमुद केलेल्या क्रीडा प्रकाराचे मैदाने उपलब्ध आहेत.

| अ.क्र. | खेळाचा प्रकार | मैदानांची संख्या |
|---|---|---|
| | | |
| २. | व्हॉलीबॉल | ०४ |
| ३. | खो-खो | ०४ |
| ४. | बास्केटबॉल | ०२ |
| ५. | हँण्डबॉल | ०१ |
| ६. | धावण मार्ग ४०० मी. | ०१ |

- **अंतर्गत खेळ सुविधा :** कार्यालयाअंतर्गत कॅरम, बुध्दीबळ व बॅडमिंटन सारख्या खेळाचे अद्यावत कोर्ट आहे. या सर्व कोर्टवर लाईटची सुविधा आहे व आंतर विद्यापीठ तसेच राष्ट्रीय स्तरावरच्या स्पर्धा घेण्यासाठी हे कोर्ट एकदम उत्तम रित्या तयार आहेत. अंतर्गत व बहीर्गत मैदानावर विद्यापीठाच्या संघाचे व आंतर विद्यापीठीय स्पर्धा व सराव शिबीर घेतल्याने विद्यापीठाचा खेळाचा दर्जा उंचवण्यास मदत होत आहे.

  **युवक महोत्सव :** आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सव स्पर्धा विद्यापीठाच्या मार्फत आयोजीत केल्या जातात. सन २०२२-२३ या वर्षात या स्पर्धा कृषि महाविलय सेलु येथे आयोजित करण्यात आल्या होत्या यामध्ये लोकनृत्य, वाड्मयीन स्पर्धा, संगीत, कलाप्रकार, नाटक या ५ प्रकारात विद्यार्थ्यांनी भाग घेतला. या युवक महोत्सवसाठी विद्यार्थी कल्याण अधिकारी कार्यालयाचे मिटींग हॉल व सुवर्ण जयंती दीक्षांत सभागृह नव्याने तयार झाले आहे. यामध्ये युवक महोत्सव अंतर्गत आयोजीत सर्व कला प्रकाराचे उत्कृष्ट आयोजन करता येते. या सर्व सुविधा व योग्य नियोजनामुळे आपले विद्यापीठ सांस्कृतिक क्षेत्रात भारतातील कृषि विद्यापीठ यामध्ये राष्ट्रीय पातळीवर घवघवीत यश संपादन करीत आहे.

- **क्रीडा स्पर्धा :** विद्यार्थी कल्याण अधिकारी कार्यालया मार्फत दरवर्षी आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा आयोजीत करण्यात येतात. सन २०२२-२३ या वर्षात मुले व मुली यांच्यासाठी टेबल टेनिस, बॅडमिंटन, खो-खो, कबडडी, बुध्दीबळ, बास्केटबॉल, मैदानी स्पर्धा इत्यादी शासकीय व खाजगी कृषि संलग्न महाविद्यालयाच्या मदतीन आयोजित करण्यात आले होते.
- **क्रीडा व कलाप्रकारात सहभाग :** विद्यापीठाचा संघ देशातील व राज्यातील सर्व महत्वाच्या क्रीडा व कला व राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व प्रकारात भाग घेत असतो या बाबतची सविस्तर माहिती खालील तक्तयात दिली आहे.

| अ.क्र. | क्रीडा/कला प्रकाराची नावे | आयोजक | शेरा |
|---|---|---|---|
| ०१. | क्रीडा महोत्सव अश्वमेध | डॉ बाबसाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद | -- |
| ०२. | इंद्रधनुष्य व्यंगचित्र प्रश्नमंजुषा मुकअभिनय | महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी | रोप्य पदक<br>कास्य पदक<br>रोप्य पदक |
| ०३. | आव्हान | बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव | -- |
| ०४. | आविष्कार | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे | -- |
| ०५. | आयसीएआर अखिल भारतीय आंतर कृषि विद्यापीठीय क्रीडा स्पर्धा. व्हॉलीबॉल मुली | चौधरी चरणसिंग कृषि विद्यापीठ, हिस्सार | सुवर्ण पदक |
| ०६. | आयसीएआर अखिल भारतीय आंतर कृषि विद्यापीठीय युवक महोत्सव स्पर्धा. पोस्टर व्यंगचित्र कोलाज | कृषि विज्ञान विद्यापीठ, बंगलुरु | सुवर्ण पदक<br>सुवर्ण पदक<br>कास्य पदक |
| ०७. | पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ व्हालीबॉल स्पर्धा | संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती | |
| ०८. | पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ बॅडमिंटन स्पर्धा | स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड | |
| ०९. | पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ वुडबॉल स्पर्धा. वुडबॉल | जगनाथ विद्यापीठ, जयपुर | रोप्य पदक |
| १०. | पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ युवक महोत्सव स्पर्धा. मेहंदी | गणपत विद्यापीठ, म्हैसाणा | सुवर्ण पदक |
| ११. | पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ राष्ट्रीय युवक महोत्सव स्पर्धा. मेहंदी | जैन विद्यापीठ, बंगलुरु | कास्य पदक |
| १२. | एनएसएस साहसी शिबीर | संत गाडगेबाब अमरावती विद्यापीठ, अमरावती | |
| १३. | एनएसएस राष्ट्रीय एकात्मता | श्री. वाय एन महाविद्यालय नरसापुर, जिल्हा गोदावरी | |

- **राष्ट्रीय सेवा योजना २०२२-२३ :** सन २०२२-२३ या वर्षामध्ये वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ अंतर्गत ५२ महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये ३१०० स्वयंसेवक कार्यरत होते. सर्व स्वयंसेवकांनी या कालावधीत विविध समाजोपयोगी उपक्रम राबवून ग्रामीण भागात राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्य करण्यात आले आहेत. ग्रामीण भागात राष्ट्रीय सेवा योजनाचे विशेष शिबीर आयोजन करुन ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना कृषि विषयक मार्गदर्शन, वृक्षारोपण, रक्तदान शिबीराचे आयोजन झाले. अंधश्रध्दा निर्मुलन, स्वच्छतेचे महत्त्व असे विविध उपक्रम तसेच ग्राम स्वच्छता अभियान राबविण्यात आले आहे. या कार्यालयातर्फे राष्ट्रीय सेवा अंतर्गत अतिशय महत्वाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला तो म्हणजे हार्डफुलनेस.

- **जयंती समारोह कार्यक्रम :** दि. १९ फेब्रुवारी, २०२३ रोजी छत्रपती शिवाजी महाराज व दि. १४ एप्रिल, २०२३ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे आयोजन करण्यात आले. तसेच शैक्षणिक वर्षात येणाऱ्या विविध जयंती कार्यक्रम या कार्यालयामार्फत वर्षभर घेण्यात आले. विद्यार्थी कल्याण अधिकारी कार्यालयामार्फत २१ जून, २०२२ रोजी योगा दिनाचा कार्यक्रम भव्य प्रमाणात घेण्यात आला.

  वर्षभरात येणाऱ्या ध्वजारोहणाचे जसे की, २६ जानेवारी प्रजासत्ताक दिन, ०१ मे महाराष्ट्र दिन, १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिन, १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन या कार्यक्रमाचे विद्यापीठाच्या मुख्य मैदानवर तसेच कुलसचिव कार्यालय व कुलगुरु यांच्या निवासस्थानी देखील या कार्यालयामार्फत ध्वजारोहणाचे आयोजन करण्यात येते.













रक्तदान शिबीर



योगा दिवस

**वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ अंतर्गत, महाराष्ट्र शासन अनुदानित खालील १७ संशोधन केंद्रे कार्यरत आहेत. त्याद्वारे पीकनिहाय संशोधनाचे कार्य सुरु आहेत.**

| अ.क्र. | संशोधन केंद्राचे नाव |
|---|---|
| १. | ज्वार संशोधन केंद्र, परभणी |
| २. | कापूस संशोधन केंद्र, नांदेड |
| ३. | फळ संशोधन केंद्र, औरंगाबाद |
| ४. | कृषि संशोधन केंद्र, बदनापूर |
| ५. | गळीतधान्ये संशोधन केंद्र, लातूर |
| ६. | केळी संशोधन केंद्र, नांदेड |
| ७. | बीजतंत्र संशोधन केंद्र व पैदासकार बियाणे विभाग, परभणी |
| ८. | मोसंबी संशोधन केंद्र, बदनापूर |
| ९. | कापूस संशोधन केंद्र, महेबुब बाग, परभणी |
| १०. | प्रादेशिक उस संशोधन केंद्र, वसमतनगर |
| ११. | कोरडवाहू शेती संशोधन केंद्र, परभणी |
| १२. | सिताफळ संशोधन केंद्र, अंबाजोगाई |
| १३. | कृषि संशोधन केंद्र, तुळजापूर |
| १४. | गळीतधान्ये संशोधन उपकेंद्र, अंबाजोगाई |
| १५. | कृषि संशोधन केंद्र, सोमनाथपूर |
| १६. | तालुका बीज गुणन केंद्र, अंबाजोगाई |
| १७. | सेंद्रीय शेती संशोधन आणि प्रशिक्षण केंद्र, परभणी |
| १८. | सोयाबिन उप संशोधन केंद्र, जिरेवाडी, बीड |
| १९. | मका संशोधन केंद्र, कोटनांद्रा, छ. संभाजीनगर |

**तसेच खालील २३ अखिल भारतीय समन्वयीत संशोधन प्रकल्प भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या अनुदानावर कार्यरत आहेत**

| अ.क्र. | योजनेचे नाव |
|---|---|
| १. | अखिल भारतीय समन्वयीत ज्वार संशोधन प्रकल्प, वनामकृवि, परभणी |
| २. | अखिल भारतीय समन्वयीत कापूस संशोधन योजना, नांदेड |
| ३. | अखिल भारतीय समन्वयीत बाजरा संशोधन प्रकल्प, एन.ए.आर.पी., औरंगाबाद |

| | |
|---|---|
| ४. | अखिल भारतीय समन्वयीत कोरडवाहु शेती संशोधन प्रकल्प, वनामकृवि, परभणी |
| ५. | अखिल भारतीय समन्वयीत हरभरा संशोधन योजना, बदनापूर,जि, जालना |
| ६. | अखिल भारतीय समन्वयीत तूर संशोधन योजना, बदनापूर, जि. जालना |
| ७. | अखिल भारतीय समन्वयीत मुलार्प (मुग/उडीद) संशोधन योजना, बदनापूर, जि. जालना |
| ८. | अखिल भारतीय समन्वयीत सोयाबीन संशोधन प्रकल्प, वनामकृवि, परभणी |
| ९. | अखिल भारतीय समन्वयीत सामुदायिक विज्ञान संशोधन प्रकल्प, वनामकृवि, परभणी |
| १०. | अखिल भारतीय समन्वयीत करडई संशोधन प्रकल्प, वनामकृवि, परभणी |
| ११. | अखिल भारतीय समन्वयीत सिंचन पाणी व्यवस्थापन प्रकल्प, वनामकृवि, परभणी |
| १२. | अखिल भारतीय समन्वयीत जैविक खत प्रकल्प, वनामकृवि, परभणी |
| १३. | अखिल भारतीय समन्वयीत दीर्घकालीन खत प्रयोग योजना, वनामकृवि, परभणी |
| १४. | अखिल भारतीय समन्वयीत हवामान संशोधन योजना, वनामकृवि, परभणी |
| १५. | अखिल भारतीय समन्वयीत एकात्मिक पीक पध्दती संशोधन प्रकल्प, वनामकृवि, परभणी |
| १६. | अखिल भारतीय समन्वयीत शुष्क कडधान्य संशोधन प्रकल्प, वनामकृवि, परभणी |
| १७. | अखिल भारतीय समन्वयीत सूर्यफूल संशोधन योजना, लातूर |
| १८. | अखिल भारतीय समन्वयीत भात संशोधन योजना, तुळजापूर |
| १९. | अखिल भारतीय समन्वयीत शुष्क भागातील फळ पिके (सिताफळ), अंबाजोगाई |
| २०. | अखिल भारतीय समन्वयीत पशु शक्तीचा योग्य वापर प्रकल्प, वनामकृवि, परभणी |
| २१. | अखिल भारतीय समन्वयीत संशोधन प्रकल्प (भाजीपाला), वनामकृवि, परभणी |
| २२. | अखिल भारतीय समन्वयीत बीजतंत्र संशोधन केंद्र, वनामकृवि, परभणी |
| २३. | अखिल भारतीय समन्वयीत राष्ट्रीय बियाणे उत्पादन प्रकल्प, वनामकृवि, परभणी |

### हवामानाचा वार्षीक तपशील २०२३-२४

महाराष्ट्रातील मराठवाडा विभागात सन २०२३ मध्ये २७ व्या हवामान आठवडयात मान्सुनचे आगमन झाले तर ३९ व्या हवामान आठवडयात पावसाचे निर्गमन झाले. मराठवाडा विभागामध्ये एकुण सरासरी पाऊस ५६८.३ मि.मी. पाऊस झाला. तो मराठवाडा विभागातील सरासरी पर्जन्यमानापेक्षा १६.३ टक्के कमी पडला. मराठवाडयातील सर्व जिल्हयात एकुण पर्जन्यमान सरासरीपेक्षा कमी कमी झाले.

मराठवाडयाचे हवामान सर्व साधारणपणे कोरडे व उष्ण आहे. मराठवाडयाचे सरासरी वार्षिक पर्जन्यमान ८१४.२ मिमी आहे. एकूण वार्षिक पावसापैकी जवळपास ८० ते ८५ टक्के पाऊस जुन ते सप्टेंबर या काळात पडतो. तसे पाहता सन २००३ हंगमात मराठवाड्यात पाऊसाची नोंद सरासरीपेक्षा कमी झालेली आढळते. मराठवाड्यात सरासरी ७४ पर्जन्यदिनात ५६८.३ मीमी पर्जन्यामानाची नोंद झाली जी सरासरीच्या -१६.३ टक्के कमी झाल्याचे आढळते. ऑक्टोबर महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात मोसमी पावसाचे निर्गमन झाले.

**पर्जन्यमान :** मराठवाडा विभागात जुन ते ऑक्टोबर दरम्यान सरासरी ५८१.८ मीमी पर्जन्यमानाची नोंद झाली ते सरासरीच्या -२४.७ टक्के कमी झाल्याचे दिसुन येते तसेच नांदेड जिल्ह्यात सर्वाधिक मोसमी पर्जन्यमानाची ८८३.१ मीमी व सर्वात कमी धाराशिव जिल्ह्यात ४२८ मीमी पर्जन्यमानाची नोंद झाली.

### हवामान परिस्थिती परभणी

१. **पर्जन्यमान :** परभणी येथे जून ते ऑक्टोबर, २०२३ या कालावधीमध्ये ५८१.८ मीमी पर्जन्यमान नोंदले गेले जो सरासरीच्या २४.७ टक्क्याने कमी पाऊस पडला.

२. **तापमान :** सरासरी सर्वाधिक कमाल तापमान हवामान आठवडा क्र. १८ मध्ये (४३.८० सें) लघुत्तम कमाल तापमान हवामान आठवडा क्र. ०४ मध्ये (२२.०० सें) नोंदले गेले. महत्तम किमान तापमान हवामान आठवडा क्र. २३ मध्ये (२८.५ ०सें) तर लघुत्तम किमान तापमान हवामान आठवडा क्र. ५ मध्ये (५.७ ०सें) इतके नोंदले गेले.

३. **सापेक्ष आर्दता :** सरासरी सकाळची सपेक्ष आर्द्रता व दुपारची सापेक्ष आर्द्रता अनुक्रमे ३७ ते ९५ टक्के आणि १६ ते ६६ टक्केच्या या दरम्यान होती.

४. **सुर्यप्रकाश :** सरासरी प्रखर सुर्यप्रकाशाची कमाल तास हवामान आठवडा क्र. १८ मध्ये (१०.२ तास) तर किमान तास (०.४ तास) प्रती दिन हवामान आठवडा क्र. ३० मध्ये नोंदले गेले.

५. **वाऱ्याची गती :** सरासरी सर्वाधिक वाऱ्याची गती आठवडा क्र. ०४ मध्ये (९.५ किमी प्रति तास) तर किमान (१.९ मिमी प्रती तास) हवामान आठवडा क्र. ५२ मध्ये नोंदले गेले.

**सन २०२३ मध्ये जिल्हयावर पडलेला पाऊस खालील तक्यात दिला आहे.**

| अ. क्र. | जिल्हा | सन २०२३ मधील मासिक पर्जन्यमान | | | | सरासरी पाऊस (मीमी) | एकुण पाऊस (मीमी) | तफावत (टक्केवारी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | जुन २०२३ | जुलै २०२३ | ऑगस्ट २०२३ | सप्टेंबर २०२३ | | | |
| १. | छत्रपती संभाजीनगर | ७३.१ | १६५.२ | ३८.३ | २४७.७ | ५८१.७ | ५२४.३ | -९.९ |
| २. | जालना | ६१ | १८७ | ४८.७ | १८९.४ | ६०३.१ | ४८६.१ | -१९.४ |
| ३. | बीड | ५५.६ | १८३.७ | ३०.४ | १७९.४ | ५६६.१ | ४४९.१ | -२०.७ |
| ४. | लातुर | ६०.८ | २५१.९ | २७.९ | १७२ | ७०६ | ५१२.६ | -२७.४ |
| ५. | धाराशिव | ३३.६ | २२७.७ | २६.९ | १४०.५ | ६०३.१ | ४२८.७ | -२८.९ |
| ६. | नांदेड | ४५.९ | ५२१.२ | ९८.४ | २१७.६ | ८१४.४ | ८८३.१ | ८.४ |
| ७. | परभणी | ५५.५ | २११.१ | ७२.२ | १८३.७ | ७६१.३ | ५२२.५ | -३१.४ |
| ८. | हिंगोली | ४५.१ | ३७४ | ८८.९ | २३२ | ७९५.३ | ७४० | -७.० |
| एकुण सरासरी | | ५३.८ | २६५.२ | ५४.० | १९५.३ | ६७८.९ | ५६८.३ | -१६.३ |

## हवामान व पीक परिस्थिती :

- सन २०२३ मध्ये मराठवाडयात पावसाचे आगमन जुनच्या चौथ्या आठवडयात झाले जूनचा चौथा मे जुलैच्या पहिल्या आठवडयात पेरणीयोग्य पावसाची नोंद झाल्यामुळे मराठवाडयातील बहुतांश भागात सर्व खरीप पिकांची पेरणी जुनच्या चौथ्या आठवडयात ते जुलैच्या दुसऱ्या आठवडयात पुर्ण झाली. सर्व खरीप पिकांची ऊगवण चांगल्या प्रकारे झाली व जुलै महिन्यात चांगल्या पावसाची नोंद झाल्यामुळे पिकांची वाढ चांगल्या प्रकारे झाली. ऑगस्ट महिन्यात सर्व जिल्हयात सरासरीपेक्षा कमी पावसाची नोंद झाल्यामुळे त्याचा पिकांच्या वाढीवर विपरीत परिणाम झाल्याचे दिसुन आले. तसेच सप्टेंबर महिन्यात चांगल्या पावसाची नोंद झाली. मराठवाडयातील बहुतांश भागात कापूस पिकावर पांढरी माशी व रसशोषण करणाऱ्या किडींचा बऱ्याच प्रमाणात प्रादुर्भाव आढळून आला. तसेच मुग, उडीद व तुर या पिकावर सुध्दा रसशोषन करणाऱ्या किडीचा व शेंगा पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसुन आला.

- ऑक्टोबर महिन्यात कमी पावसाची नोंद झाल्यामुळे रबी पिकांच्या पेरणीवर परिणाम झाला. जमिनीतील कमी ओलाव्यामुळे रबी पिकांच्या उगवण व वाढीवर परिणाम झालेला असल्यामुळे उत्पादनात घट झाल्याचे दिसुन आले. मराठवाडयातील मौसमी पावसाचे निर्गमण ३९ व्या हवामान आठवडयात झाले. सर्वसाधारणपणे सन २०२३ या वर्षातील खरीप व रब्बी हंगामातील पिकावर विपरीत परिणाम झाला.
- कृषि हवामान सल्ला पत्रिका मराठवाडा विभागाकरीता ग्रामीण कृषि मौसम सेवाङ्क ही योजना या विभागांतर्गत कार्यान्वित आहे. सद्य:स्थितीत या केंद्रामार्फत मराठवाडयातील ६ जिल्हयाकरीता व परभणी जिल्ह्यातील ९ तालुक्यासाठी प्रत्येक मंगळवार आणि शुक्रवार स्वंतत्र कृषि हवामान सल्ला पत्रिका तयार केली जाते. तसेच ही कृषि हवामान सल्ला पत्रिका विविध प्रसारमाध्यमे, संकेतस्थळ, मराठवाडा विभागातील सर्व कृषि हवामान केंद्र, शेतीविषयात काम करणाऱ्या सामाजिक संस्था, जिल्हा कृषि कार्यालय तसेच रिलांयन्स फाऊंडेशन, महिंद्रा समृध्दी, महिंद्रा कार्पोरेट संस्थेच्या भागीदारीने कृषि हवामान सल्ला पत्रिका मराठवाडयातील सर्व शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न या केंद्रामार्फत केला जातो.
- सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरीता 'ग्रामीण कृषि मौसम सेवा' परभणी या केंद्रामार्फत एकूण २०४ कृषि हवामान सल्ला पत्रिका तयार करून प्रसारीत करण्यात आल्या.
- मराठवाडयातील परभणी, नांदेडआणि बीड या सर्व जिल्हयांच्या आकाशवाणी केंद्रावरून रोज कृषि हवामान सल्ला प्रसारीत केला गेला व एफएम व्दारे लातूर व परभणी प्रसारीत केला गेला.
- मराठवाडयातील सर्व कृषि विज्ञान केंद्रांमार्फत कृषि हवामान सल्ला पत्रिका विविध शेतकरी गटापर्यंत पोहचविली गेली.
- तसेच कृषि विज्ञान केंद्र, तोंडापूर जि. हिंगोली, कृषि विज्ञान केंद्र, खरपूडी जि. जालना आणि नाबार्ड यांच्या सहकार्याने या केंद्रामार्फत शेतकऱ्यांना मोबाईलवर संदेश स्वरूपामध्ये (एस.एम.एस) दिला.
- भारतीय मौसम विभाग, पुणे व वसंतराव नाईक मराठवाडा विद्यापीठाच्या संकेतस्थळावर कृषि हवामान सल्ला पत्रिका तयार करून प्रसारीत करण्यात येते. एम किसान पोर्टल अंतर्गत मराठवाड्यातील १२,६६,८३३ शेतकऱ्यांना या कृशि हवामान सल्ला पत्रिकेचा उपयोग होतो.

## संशोधन उपलब्धी

महाराष्ट्रातील चारही कृषि विद्यापीठांच्या संयुक्त कृषि संशोधन आणि विकास समितीच्या ५१ व्या बैठकीचे आयोजन दिनांक २५-२७, मे २०२३ दरम्यान महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांचे या बैठकीमध्ये ०६ वाणांचे, ०३ यंत्राचे प्रसारण आणि ३६ पीक उत्पादन तंत्रज्ञानावर आधारित शिफारशी पारित करण्यात आल्या आहेत. त्यांचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे आहे.

### अ) वाण प्रसारण :

**१. अमेरीकन कपाशी : एन एच ६७७**



अमेरीकन कपाशीचा सरळ वाण एन एच ६७७ हा अधिक उत्पादन देणारा आणि रस शोसणाऱ्या किडीस, जीवाणूजन्य करपा व बुरशीजन्य ठिपके या रोगांना सहनशील असणारा वाण महाराष्ट्र राज्यात कोरडवाहु लागवडीसाठी प्रसारीत करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**२. हरभरा : परभणी चना-१६ (बीडीएनजी २०१८-१६)**

परभणी चना-१६ (बीडीएनजी २०१८-१६) हा अधिक उत्पादन देणारा, यांत्रिकीसाठी सुलभ, टपोरा दाण्याचा वाण महाराष्ट्रातील मराठवाडा विभागात लागवडीसाठी प्रसारित करण्याची शिफारस करण्यात येत आहे.





**हरभरा : परभणी चना-१६ (बीडीएनजी २०१८-१६)**

**३. तीळ : टीएलटी १०**

टीएलटी १० हा तिळाचा पांढरा, टपोरा निर्यातक्षम (३.५-४.० ग्रॅम) वाण राज्य व राष्ट्रीय तुल्यबळ वाणांपेक्षा १७.५४ ते ३७.५०% बियाणे व १२.२५ ते ३४.५०% तेलाच्या उत्पादनात सरस आढळून आला. हा वाण पानावरील ठिपके व भुरी या रोगास प्रतिबंधक तसेच या वाणावर तुडतुडे, पाने गुंडाळणारी व बोंड पोखरणारी अळी या किडींचा उपद्रव तुल्यबळ वाणापेक्षा कमी आढळुन आला. म्हणुन या वाणाची महाराष्ट्र राज्यात खरीप व रब्बी /उन्हाळी लागवडीखालील क्षेत्रासाठी प्रसारीत करण्याची शिफारस करण्यात येत आहे.




**तीळ : टीएलटी १०**

**४. खरीप ज्वारी : परभणी शक्ती (पीव्हीके १००९)**

ज्वारीचा जैवसंपृक्त वाण परभणी शक्ती (पीव्हीके १००९) हा रब्बी हंगामात महाराष्ट्रात लागवडीसाठी शिफारस करण्यात येत आहे.

**५. मिरची : पीबीएनसी-१७**

ाीबीएनसी-१७ हा अधिक उत्पन्न देणारा मिरीची वाण हिरव्या मिरचीसाठी मराठवाडा विभागात खरीप हंगामात लागवडीसाठी प्रसारीत करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**६. टोमॅटो : पीबीएनटी-२०**

ाीबीएनटी-२० हा अधिक उत्पन्न देणारा टोमॅटोचा वाण मराठवाडा विभागात रब्बी हंगामात लागवडीसाठी प्रसारीत करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**ब) यंत्र प्रसारण :**

१. शेतामध्ये पेरणी पूर्व व पेरणी पश्चात स्लरी नियंत्रितपणे टाकण्याकरीता वनामकृवि विकसीत बैलचलीत शेणाची स्लरी टाकणारे यंत्र प्रसारीत करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२. आजारी पशुंना उचलून आधारासह उभे करणे व त्यांच्यावर सुलभतेने उपचार करण्यासाठी वनामकृवि विकसीत आजारी पशु उभे करणारे यंत्र प्रसारीत करण्यासाठी शिफारस करण्यात येत आहे.

३. विविध पिकांवर फवारणी करण्यासाठी वनामकृवि विकसित बैलचलित ४ नोझल सौर ऊर्जा आधारीत फवारणी यंत्र प्रसारीत करण्याची शिफारस करण्यात येत आहे.



**खरीप ज्वारी : परभणी शक्ती (पीव्हीके १००९)**



**मिरची : पीबीएनसी-१७**



**टोमॅटो : पीबीएनटी-२०**



**बैलचलीत शेणाची स्लरी टाकणारे यंत्र**



**आजारी पशु उभे करणारे यंत्र**



**बैलचलित ४ नोझल सौर ऊर्जा आधारीत फवारणी यंत्र**

## क) पिक उत्पादन तंत्रज्ञानावर आधारीत शिफारशी

### कृषि विद्या



हळद + मधुमका आंतरपिक पध्दती



सोयाबीन पिकासाठी सुक्ष्मजीव जैविक किटकनाशकाची फवारणी

१. बीटी कापूस पिकाला पूर्व अवस्था (१-३० दिवस), मध्य अवस्था (३१-१११ दिवस) व शेवटच्या अवस्थेसाठी (११२-१६४ दिवस) पाण्याची गरज काढण्यासाठी ०.५१, १.२४ आणि ०.९५ या पीक गुणांक मुल्यांची मराठवाडयासाठी शिफारस करण्यात येत आहे.

२. सोयाबीन पिकाला पूर्व अवस्था (१-२८ दिवस), मध्य अवस्था (२९-८४ दिवस) व शेवटच्या अवस्थेसाठी (८५-११० दिवस) पाण्याची गरज काढण्यासाठी ०.६४, १.३१ आणि ०.६६ या पीक गुणांक मुल्यांची मराठवाडयासाठी शिफारस करण्यात येत आहे.

३. सेंद्रीय पध्दतीने लागवड करण्यात येणाऱ्या सोयाबीन पिकाचे अधिक उत्पादन व निव्वळ आर्थिक नफा मिळवण्यासाठी तसेच जमिनीचे आरोग्य सुधारण्यासाठी १००% शिफारशीत नत्र खताची मात्रा (३० किलो/ हेक्टरी) गांडूळ खताच्या (३.० टन/ हेक्टरी) माध्यमातून किंवा १००% शिफारशीत नत्र खताची मात्रा (३० किलो/ हेक्टरी) प्रत्येकी ३३% शेणखत (२.०० टन/ हेक्टरी) + ३३% गांडूळ खत (१.२५ टन/ हेक्टरी) + ३३% निंबोळी पेंडीच्या (२७५ किलो/ हेक्टरी) माध्यमातून पेरणी करतांना देण्याची शिफारस करण्यात येते.

४. सेंद्रीय पध्दतीने लागवड करण्यात येणाऱ्या तूर पिकाचे अधिक उत्पादन व आर्थिक फायदयासाठी तसेच जमिनीचे आरोग्य सुधारण्यासाठी १००% शिफारशीत नत्र खताची मात्रा (२५ किलो/ हेक्टरी) ही प्रत्येकी ३३% प्रमाणे ३३% शेणखत (१.६ टन/ हेक्टरी) + ३३% गांडूळ खत (१.०० टन/ हेक्टरी) + ३३% निंबोळी पेंडीच्या (२३० किलो/ हेक्टरी) माध्यमातून किंवा १००% शिफारशीत नत्र खताची मात्रा (२५ किलो/ हेक्टरी) गांडुळ खताच्या (२.५ टन/ हेक्टरी) माध्यमातुन पेरणी करतांना देण्याची शिफारस करण्यात येते.

५. अधिक उत्पादन व आर्थिक नफा मिळवण्यासाठी ओवा पिकाची पेरणी ऑगस्ट महिन्याच्या दुसऱ्या पंधरवाडयात ६० सेंमी. x ३० सेंमी अंतरावर करण्याची शिफारस मराठवाडा विभागासाठी करण्यात येत आहे.

६. सोयाबीन-करडई पीक पध्दतीमध्ये अधिक उत्पादन व निव्वळ नफा मिळविण्यासाठी रुंद, सरी वरंब्यावर खरीप सोयाबीननंतर रब्बी करडई चार ओळी प्रती सरी वरंब्यावर १०० टक्के खताची मात्रा (६०:४०:३० किलो/हेक्टर) व अझाटोबॅक्टर (१० मिली/किलो बियाणे) अ पीएसबी (१० मिली/किलो बियाणे) बीजप्रक्रिया करुन पेरणी करण्याची शिफारस करण्यात येते.

७. हळद पिकाचे अधिक समतुल्य उत्पादन व निव्वळ आर्थिक नफा मिळविण्याकरीता हळद मधुमका अ (२:१) ही आंतरपीक (गादी वाफ्यावर हळदीची लागवड ६० x २० सेंमी अंतरावर करून वाफ्याच्या मध्यावर हळदीच्या ओळींमध्ये मधुमक्याची एक ओळ) १०० टक्के शिफारस खतमात्रेची (२००:१००:१०० नत्र, स्फुरद व पालाश किग्रॅ प्रती हेक्टर) देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

८. अधिक उत्पादन, नफा आणि जमिनीची सुपीकता टिकविण्यासाठी भुईमुग - सूर्यफुल आणि सोयाबीन - सूर्यफुल या क्रमिक पीक पध्दतीची शिफारस मराठवाडा विभागासाठी करण्यात येते.

**उद्यानविद्या :**

९. रब्बी हंगामात बटाटा पिकापासुन अधिक उत्पादन आणि निव्वळ आर्थिक नफा मिळवण्यासाठी कुफ्री पुखराज या वाणाची मराठवाडा विभागात लागवड करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

१०. मराठवाडा विभागासाठी हरभरा, रबी ज्वारी व करडई या पिकांना पर्यायी पीक म्हणुन रबी हंगामात ओवा पिकाचे अधिक उत्पादन व आर्थिक फायदयासाठी संरक्षित पाण्याखाली लागवड करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**पशुविज्ञान :**

११. दहयापासुन सर्वोत्कृष्ठ स्वीकाहर्यता असलेले आणि ८ दिवस टिकणारी मुल्यवर्धीत अंबील तयार करण्यासाठी दहयाच्या ७ ऽ या प्रमाणात बाजरीचे पीठ (४८ तास मोड आलेले बाजरीसत्व), ५०% पाणी व मसाले (२% मीठ, १% जीरे, ४.५% अद्रक-लसुण पेस्ट, १% मिरची पावडर, ०.५% काळे मिरे) मिसळुण हे मिश्रण उकळेपर्यंत तापवुन थंड झाल्यानंतर ५० सें.ग्रे. तापमानाला साठवण्याची शिफारस करण्यात येते.

**कृषि अभियांत्रिकी :**

१२. सरासरी मोठे आकारमान असलेल्या ज्वारीच्या दाण्यापासून उत्तम प्रतीच्या ९० ते ९५ टक्के लाहया फुटण्यासाठी, ज्वारी प्रथम ३० मिनिटे पाण्यात भिजवावी, नंतर १२ तास कपडयांमध्ये बांधून ठेवावी व १७०० से. तापमानावर मिठामध्ये भाजावी या वनामकृवि विकसित प्रक्रियेची शिफारस लघुउद्योगासाठी करण्यात येत आहे.

१३. मराठवाडयातील सर्व तालुक्यांसाठी प्रमुख रबी पिकांची (ज्वारी, गहू, करडई व हरभरा) हवामान आठवडानिहाय पाण्याची गरज व सिंचन पध्दतीनिहाय सिंचनाच्या पाण्याची गरज काढण्याकरिता वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी द्वारे विकसित केलेले तक्ते वापरण्याची शिफारस करण्यात येत आहे. तसेच, विशिष्ठ आठवडयासाठी ठराविक ठिकाणी पाण्याची व सिंचनाची गरज काढण्यासाठी भौगोलिक माहिती प्रणाली (जीआयएस) मध्ये विकसित केलेले नकाशे वापरण्याची शिफारस करण्यात येते.

१४. वनामकृवि विकसित सौर फोटोव्होल्टेइक (३ कि.वॅट) पावर व (२.२ कि.वॅट) व्ही एफ डी उर्जा प्रणाली वापरुन कृषि प्रक्रिया मशीन जसे की पापड बनवण्यासाठी मशीन, बियाणे प्रतवारी व सफाई यंत्र, शेवई तयार करण्यासाठी मशीन आणि पिठाची गिरणी (२.०- कि.वॅट क्षमतेपर्यंत) सर्वसाधारण उन्हाच्या दिवसात सुमारे ५ तास पर्यंत चालवण्यासाठी शिफारस करण्यात येत आहे.



**सोलार फोटोव्होल्टेक कृषि प्रक्रिया मशीन यंत्र**



**ज्वारीच्या दाण्यांपासून उत्तम प्रतीच्या लाहया**

**अन्न तंत्रज्ञान :**

१५. साठ दिवसांपर्यत साठवण क्षमता असलेली पौष्टिक वडी तयार करण्यासाठी ज्वारीचे पोहे, तांदळाचे पोहे, शेंगदाणे, तीळ, मुगसत्व, गुळ, द्रव ग्लुकोज व पाणी २०:१०:१०:१०:५:२५:१०:१० या प्रमाणात वापरावे अशी शिफारस करण्यात येत आहे.

१६. पोषणमुल्ययुक्त कुकीज बनविण्याकरिता ६० ग्रॅम मैदा आणि १० ग्रॅम बाजरी, १५ ग्रॅम नाचणी, १५ ग्रॅम राळा यांचे सत्व वापरुन त्यामध्ये २५ ग्रॅम साखर किंवा गुळ २० ग्रॅम वनस्पती तूप, ०.५ ग्रॅम अमोनियम बायकार्बोनोट आणि ०.३ ग्रॅम सोडीयम बायकार्बोनोटचा वापर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.




**झटपट उपमा मिक्स**

१७. साठवण क्षमता ९० दिवसांपर्यत असण्याकरिता चांगल्या प्रतीची मिश्र सूप भुकटी तयार करण्यासाठी मक्याचे स्टार्च, सुरण कंदाचे पीठ, शेवग्याच्या पानांची भुकटी, लाल अंबाडीच्या पाकळ्यांची भुकटी, उडीद पीठ, निर्जलीत भाज्यांची भुकटी (२ ग्रॅम ढोबळी मिरची, १ ग्रॅम हिरवी मिरची, २ ग्रॅम मशरुम, ४ ग्रॅम मधुमका, २ ग्रॅम हिरवा वाटाणा आणि २ ग्रॅम गाजर), मिश्रीत मसाला भुकटी (१.५ ग्रॅम कांदा, ०.५ ग्रॅम लसुण, २ ग्रॅम कोथिंबीर आणि २ ग्रॅम काळी मिरी) व मीठ यांचा अनुक्रमे ४५:२५:५:२:२:१३:५:३ या प्रमाणात वापर करावा अशी शिफारस करण्यात येत आहे.

१८. भरड धान्यापासून ९० दिवसांपर्यत साठवण क्षमता असणारे पौष्टिक क्रॅकर्स तयार करण्यासाठी ६० ग्रॅम बाजरी पीठ, ३० ग्रॅम ज्वारी पीठ, १० ग्रॅम सोयाबीन पीठ, ४० ग्रॅम साखर, ३५ मिली दुध, २ ग्रॅम वेलची आणि २ ग्रॅम अमोनियम बायकार्बोनेट वापर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

१९. पोषणमुल्ययुक्त आणि ९० दिवसांपर्यंत साठवण क्षमता आणारा पास्ता तयार करण्यासाठी ८० ग्रॅम गव्हाचा रवा, २० ग्रॅम चवळी सत्व, १ ग्रॅम मीठ, ०.२ ग्रॅम गवार डिंक अणि ०.२ ग्रॅम इसबगोलचा वापर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२०. चांगल्या प्रतीची प्रजैविक बासुंदी तयार करण्यासाठी ०.६५ टक्के हायड्रोक्लोरिक आम्ल सुधारित कोंडा (इसबगोल कोंडा) या संपुटनाचा लॅक्टोबॅसिलस ॲसीडोफिलस आणि लॅक्टोबॅसिलस बलगॅरिकस (१:१ सम प्रमाणाच्या) चे १० टक्के मिश्रण वापर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२१. पौष्टीक इडली तयार करण्यासाठी ७५ ग्रॅम तांदुळ, १० ग्रॅम उडीद डाळ, १० ग्रॅम सोयाबीन, ५ ग्रॅम बाजरी, ०.२५ ग्रॅम गवार डिंक आणि ०.२५ ग्रॅम झेंथम डिंक वापरुन १२ तास किण्वनक्रिया करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

## सामुदायीक विज्ञान :

२२. परभणी जिल्हयातील बालविवाहामुळे मुलींना सामोरे जाव्या लागणा-या विविध समस्यांवर मात करण्यासाठी पालकांनी त्यांच्या मुलींचे बालविवाह करणे टाळुन मुलींनीही स्वत: सक्षम होण्यासाठी त्यांचे शिक्षण व अर्थांजन याबाबत विशेष प्रयत्न करण्याची तसेच महिला व बालकल्याणासंबंधी कार्य करणा-या विविध शासकीय व अशासकीय विभागांनी /प्रकल्पांनी परभणी जिल्हयात बालविवाह थांबविण्यासाठी सामुदायिक सहकार्याने लोक चळवळ निर्माण करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२३. काम करतानाची शरीर संस्थिती, उपकरणांची संरचना तथा हाताळणी, शरीर/जैव यांत्रिकी, कार्यस्थळाची संरचना, पर्यावरण घटक आणि सर्वसाधारण कार्याभ्यास विषयक तत्वे या बाबत गृहीणीमध्ये जागरुकता निर्माण करण्यासाठी मकार्यसुलभतेच्या शास्त्रोक्त पध्दतीफ हा प्रशिक्षण संच वापरण्याची शिफारस करण्यात येते.



मिश्र सुप भुकटी



भरड धान्यापासून उत्तम प्रतीचे पौष्टिक क्रॅकर्स



पास्ता तयार करण्याकरिता गव्हाचा रवा आणि चवळी सत्व



प्रजैविक बासुंदी



पौष्टिक इडली मिक्स

२४. वनामकृवि विकसीत पर्यावरणपुरक रंग तयार करण्यासाठी १ ग्रॅम नारळाचा भुसा १०० मि.ली. पाण्यात ३० मिनिटे उकळुन प्रत्येकी १ ग्रॅम सुती आणि रेशीम कापड रंगविण्याकरिता तसेच तो रंग कापडावर पक्का होण्यासाठी ०.४ मि.ग्रॅ. तुरटी, ०.६ मि.ग्रॅ. फेरस सल्फेट, ०.८ मि.ग्रॅ. कॉपर सल्फेट या द्रावणात १५ मिनिटे बुडवुन ठेवण्याची शिफारस करण्यात येत आहे.

### मृद विज्ञान :

२५. टोमॅटो पिकाचे अधिक उत्पादन, गुणवत्ता, जास्त आर्थिक नफा व जमीनीचे गुणधर्म सुधारण्यासाठी शिफारशीत खत मात्रेसोबत बीजांमृत (मुळावर अंतरिक्षीकरण) जीवांमृत (५०० लीटर प्रती हेक्टर मुळाभोवती वापर) तसेच ३ टक्के पंचगव्य (१५,३०,४५,६०,७५ आणि ९० दिवसांनी फवारणी) करण्याची शिफारस करण्यात येते.

२६. गव्हाच्या धान्य आणि भुश्यामध्ये लोह आणि जस्त यांचे प्रमाण वाढविण्यासाठी आणि जमिनीचे गुणधर्म वृधीसाठी, उत्पादन आणि अधिकतम नफ्याकरिता शिफारसीत खत मात्रेसोबत लोह व जस्त विद्राव्यक जिवाणू सुडोमोनास स्ट्रायटा या द्रवरुप जिवाणु खताची १०० मिली/१० किलो बियाण्यास बिज प्रक्रीया करण्याची शिफारस करण्यात येते.

### विस्तार शिक्षण :

२७. अभ्यासांती असे निदर्शनास आले की, गाभण जनावरांची काळजी, चाऱ्याचे प्रमाण, स्वच्छ दुध उत्पादनाची माहिती, घटसर्प रोग आणि त्याचे नियंत्रण याविषयी माहिती, कृत्रिम रेतन आणि त्याचे फायदे या सर्वात महत्वाच्या प्रशिक्षणाच्या गरजा दुग्ध व्यवसाय करणाऱ्या बहुतांश शेतकरी महिलांनी नोंदवल्या आहेत. पशुवैद्यकीय, कृषि विद्यापीठे आणि राज्याचे पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विभाग आणि सर्व प्रशिक्षण संस्था यांनी दुध व्यवसाय करणाऱ्या शेतकरी महिलांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करताना या विषयांवर भर द्यावा, अशी शिफारस करण्यात येते.

२८. अभ्यासांती असे निदर्शनास आले की, कापूस उत्पादकांची हवामानातील परिवर्तनशीलतेचे आकलन आणि अनुकूलतेची पातळी मध्यम स्वरूपाची असून कापूस उत्पादकांना योग्य पीक व्यवस्थापनाकरिता हवामान बदलानुसार आणि सूक्ष्म परिस्थितीच्या आधारे स्थळनिहाय अचूक हवामान अंदाज व त्यानुसार त्वरित पीक व्यवस्थापन सल्ला देणारे एक परिपूर्ण समर्पित मोबाईल ॲप विद्यापीठाने व इतर विस्तार यंत्रणेने विकसित करण्याची शिफारस करण्यात येते.

२९. अभ्यासांती असे दिसुन आले की, शहरी भागातील व्यक्ती, युवक, नोकरदार यांच्यामध्ये भरड धान्याबाबतची जागरुकता व सेवनाचे प्रमाण मध्यम स्वरुपाचे असुन भरड धान्याचा आहारातील उपयोग वाढीकरिता सार्वजनिक ठिकाणी किंवा विक्रीच्या ठिकाणी भरड धान्याच्या पोषणमुल्याबाबत विस्तार यंत्रणांनी जनजागृती करावी. तसेच विविध पौष्टिक पदार्थ पाककृतीबाबत प्रशिक्षणे आयोजित करावीत आणि या पाककृती आधारित व्हिडिओ निर्मिती कृषि विद्यापीठाने करुन समाज माध्यमांद्वारे प्रसारित करण्याची शिफारस करण्यात येते.

३०. अभ्यासांती असे निदर्शनास आले की, हरभरा पिकावरील शेतकरी शेती शाळेतील बहुसंख्यीय सहभागी शेतकऱ्यांच्या मुलभुत ज्ञानामध्ये वाढ झाल्याचे दिसुन आले आहे. सहभागी शेतकऱ्यांना कृषि प्रदर्शन, शेतकरी मेळावा आणि कृषि साहित्याद्वारे तंत्रज्ञानाची माहिती होण्यासाठी व शेती शाळेत अधिकाधिक शेतकऱ्यांचा सहभाग वाढवण्यासाठी तसेच जिल्हात शेतकरी शेती शाळेची संख्या वाढवण्यासाठी कृषि विभाग महाराष्ट्र शासनाने प्रयत्न करावे अशी शिफारस करण्यात येते.

३१. संशोधनाच्या निष्कर्षावरून असे दिसून येते की, शेतीसाठी डिजीटल तंत्रज्ञानाचा वापर करुन पिकांच्या उत्पादनासाठी व बाजारपेठेची माहिती मिळावीण्यासाठी त्यांचा दृष्टिकोन अनुकूल आहे, करिता अशा प्रकारचे डिजीटल तंत्रज्ञान (ॲप्स) कृषि विद्यापीठाने आणि राज्याच्या कृषि विभागाने विकसीत करावेत तसेच डिजीटल तंत्रज्ञान (ॲप्स) हताळण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करावेत अशी शिफारस करण्यात येते.

### कृषि अर्थशास्त्र :

३२. बाजरा उत्पादक शेतकऱ्यांचा तंत्रज्ञान वापराकडील कल वाढीसाठी, बाजरा उत्पादनाचे बहुतांश तंत्रज्ञान व उत्पादन वाढ हे घटक प्रामुख्याने कारणीभूत असल्याचे आढळून आले व हे तंत्रज्ञान वापर करणारे ९२ टक्के शेतकरी तांत्रिक दृष्टया सक्षम पेरणीची वेळ व सुधारित वाण दिसून आले आहे. म्हणून कोरडवाहू जमिनीत बाजरा उत्पादनासाठी इतर शेतकऱ्यांनी वनामकृवि, परभणी विकसित बाजरा उत्पादन तंत्रज्ञानाचा अवलंब करावा अशी शिफारस करण्यात येते.

३३. महाराष्ट्र राज्यात सोयाबीन पीक वगळता तेलबिया पिकांची जसे भुईमूग, सूर्यफुल, करडई, तीळ, जवस व कारळे या पिकांची लागवड असमाधानकारक असल्याने शासनाने वरील क्षेत्र वाढविण्यासाठी तेलबिया पिकांचया वाढीसाठी तेलबिया पिकांवरील तंत्रज्ञान अभियान यासारखे प्रकल्प राज्यात राज्यात सुरू करावेत अशी शिफारस करण्यात येते.

३४. अभ्यासांती असे आढळून आले की, सोयाबीन लागवडीसाठी वनामकृवि, परभणी विकसित (४:१) सरी वरंबा पध्दती (बीबीएफ) तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यास उत्पादकतेत २७.६७% वाढ, बियाणात ३३.४७% बचत आणि निव्वळ नफ्यात १३१.६५ टक्के इतकी वाढ होते, त्यामुळे अशी शिफारस करण्यात येते की, वनामकृवि, परभणी विकसित (४:१) बीबीएफ तंत्रज्ञानाखालील सोयाबीन लागवड क्षेत्र वाढीकरिता कृषी विस्तारकांनी मोठया प्रमाणात प्रयत्न करावेत आणि सोयाबीन उत्पादकांसाठी व ट्रॅक्टर चालकांसाठी नियमित प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत ज्यामुळे सोयाबीन उत्पादकांच्या उत्पन्नात मोठया प्रमाणात भर पडेल.

३५. महाराष्ट्रातील सर्व कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये पिकांच्या भविष्यातील किंमतीचा अंदाज वर्तवणारी यंत्रणा विद्यापीठाकडुन उभारण्यात यावी, ज्यामुळे शेतक-यांना आलेल्या मालाचे विक्री व्यवस्थापन करणे व पिकाखालील क्षेत्र ठरविणे शक्य होईल अशी शिफारस करण्यात येते.

३६. अभ्यासाच्या निष्कर्षावरुन असे दिसून आले की, गडचिरोली, लातूर, उस्मानाबाद, बीड, जालना व सिंधुदुर्ग हे जिल्हे हवामान बदलाच्या अनुषंगाने अति असुरक्षित आहेत. त्यामुळे अशी शिफारस करण्यात येते की, शासनाने क्लायमेट रिझिलंट ॲग्रीकल्चर (सी आर ए) या प्रकल्पाची व्याप्ती सुरुवातीला वरील नमुद केलेल्या जिल्हयात वाढवावी व त्यानंतर खूप असूरक्षित जिल्हे जसे धुळे, ठाणे, अहमदनगर, सोलापूर, अकोला, हिंगोली, नांदेड, चंद्रपुर, नागपूर व भंडारा या जिल्हयात वाढवावी अशी शिफारस करण्यात येते.

### Registration of varieties in NBPGR, New Delhi and PPV & FRA

| Sr.No. | Name of Variety | Accession No. from NBPGR |
|---|---|---|
| | **Cotton** | |
| 1. | PHH 316 [Ganga] | R 17-3 / 2000 |
| 2. | PH 348 [Yamuna] | 002674 PPV & FRA |
| 3. | NH 452 | NGB RC 025 / 2002 |
| 4. | NH 545 | 001676 PPV & FRA |
| 5. | IS - 376 /4/1/14/21 | INGR No. 04106 |
| 6. | IS - 244 /2/1 | INGR No. 04105 |
| 7. | PA 183 [Sweta] | NGB RC 593 / 2001 |
| 8. | PA 255 [Parbhani Turab] | 000559 PPV & FRA |
| 9. | PAIG 8/1 | IC 296626 NBPGR |
| 10. | PAIG 8/3 | IC 296627 NBPGR |
| 11. | PAIG 2K/98 | IC 296628 NBPGR |
| 12. | PAIG 27 | IC 296629 NBPGR |
| 13. | PAIG 29-1 [Broad leaves] | IC 296630 NBPGR |
| 14. | PAIG 29-2 [Narrow leaves] | IC 296631 NBPGR |
| 15. | AH 65 | IC 296632 NBPGR |

| | | | |
|---|---|---|---|
| 16. | PA 500 | IC 296633 | NBPGR |
| 17. | NH 615 (Anusaya) | 000894 | PPV & FRA |
| 18. | PA402 (Vinayak) | 000558 | PPV & FRA |
| 19. | NHH 715 | IC 624354 | NBPGR |
| 20. | PH 1076(F line) | IC 624355 | NBPGR |
| 21. | NDLH 1938 (Male line) | IC 624356 | NBPGR |
| 22. | NH 635 | IC 616886 | NBPGR |
| 23. | NHH 206 | IC 616894 | NBPGR |
| 24. | NH 615 (F line) | IC 616895 | NBPGR |
| 25. | NH 625 (Male line) | IC 616896 | NBPGR |
| 26. | PA740 | S.O. 3220 (E) | CVRC |
| 27. | PA810 | S.O. 8 (E)280 | CVRC |
| 28. | PA837 | S.O.4065 (E) 142 | CVRC |
| 29 | NHH44BGII | S.O..314 | CVRC |
| 30 | NH-1901 Bt | 3-86-23 | PPV & FRA |
| 31 | NH-1902 Bt | 3-86-23 | PPV & FRA |
| 32 | NH-1904 Bt | 3-86-23 | PPV & FRA |
| | **Sorghum** | | |
| 1. | PVK 400 | S. O. 615 [E] | CVRC |
| 2. | PVK 801 (Parbhani Sweta) | 76 of 2012 | PPV & FRA |
| 3. | Parbhani Moti [SPV 1411] | 18 of 2012 | PPV & FRA |
| 4. | PVK 809 [SPV 1474] | 226 of 2014 | PPV & FRA |
| 5. | Parbhani Jyoti [CSV 18] | 449 (E) of 2009 | PPV & FRA |
| 6. | Parbhani Sainath [SPH 1567] | 1108 (E) of 2008 | PPV & FRA |
| 7. | PMS 28 A x B | IC 57645 | NBPGR |
| 8. | C 43 | IC 57646 | NBPGR |
| 9. | SPH 1641 | IC 615555 | NBPGR |
| 10. | PMS71A | IC 615556 | NBPGR |
| 11. | PMS71B | IC 615557 | NBPGR |
| 12. | KR196 | IC 615558 | NBPGR |
| 13. | CSV40F (SPV2387) | IC48663 | PPV & FRA |
| 14. | Parbhani Shakti SPV1009 | S. O. 4065 [E] | CVRC |
| 15. | Parbhani Super Moti SPV2407 | S.O.120 2021 | CVRC |
| 16. | PVRSG 101 (Parbhani Vasant) | SO 4222 (E) | PPFRA |
| | **Bajra** | | |
| 1. | AHB 1666 [Pratibha] | IC 93862 | NBPGR |
| 2. | Parent AIB 157 | IC 93863 | NBPGR |
| 3. | AIMP 92901 [Samrudhi] | Reg. No. 62 of 2009 | PPV & FRA |
| 4. | PPC – 6 [Parbhani Sampada] | Reg. No. 29 of 2009 | PPV & FRA |
| 5. | ABPC 4-3 | IC No. 573421 | NBPGR |
| 6. | AHB 1200 Fe | S.O.1246 (E) 2018 | CVRC |
| 7. | AHB 1269 | S.O.1326 (E) 2019 | CVRC |
| | **Soybean** | | |
| 1. | MAUS1 [Aarti] | 2000 / 0097 | PPV & FRA |
| 2. | MAUS 2 [Pooja] | 2000 / 0098 | PPV & FRA |
| 3. | MAUS 32 [Prasad] | 2000 / 0099 | PPV & FRA |
| 4. | MAUS 47 [Parbhani Sona] | 2000 / 0100 | PPV & FRA |

| | | | |
|---|---|---|---|
| 5. | MAUS 61 [Pratikar] | 2001 / 162 | PPV & FRA |
| 6. | MAUS 61-2 [Pratishtha] | 2002 / 0232 | PPV & FRA |
| 7. | MAUS 71 [Samruddhi] | 2002 / 0233 | PPV & FRA |
| 8. | MAUS 81 [Shakti] | 2003 / 0353 | PPV & FRA |
| 9. | MAUS 158 | IC 584050 & 2 | NBPGR |
| 10. | MAUS 162 | IC 593957 | NBPGR |
| 11. | MAUS 612 | S.O. 1379 (E) 2018 | CVRC |
| 12. | MAUS 725 | S.O. 1056 (E) 2023 | CVRC |
| | **Safflower** | | |
| 1. | PBNS 12 | IC 255983 | NBPGR |
| 2. | PBNS 40 | IC 546545 | NBPGR |
| 3. | PBNS 86 (Purna) | S.O. 6318 (E) 79 | CVRC |
| 4. | PBNS 184 (Kusum) | S.O. 4065 (E) 105 | CVRC |
| 5. | PBNS 154 (Parbhani Suvarna) | S.O. 1056 (E) 81 | CVRC |
| | **Groundnut** | | |
| 1. | TLG 45 | IC 323366 | PPV & FRA |
| 2. | LGN 1 | IC 547028 | NBPGR |
| 3. | LGN 123 | IC 594651 | NBPGR |
| | **Sunflower** | | |
| 1. | LSF 8 | IC 547027 | NBPGR |
| 2. | LSFH 35 | IC 520847 | NBPGR |
| 3. | LSFH 171 | IC 594130 | NBPGR |
| 4. | CMS 17 (A) | IC 594131 | NBPGR |
| 5. | CMS 17 (B) | IC 594132 | NBPGR |
| 6. | RHA 1-1 | IC 520846 | NBPGR |
| | **Niger** | | |
| 1. | PNS 6 | IC 449063 | NBPGR |
| | **Pigeonpea** | | |
| 1. | BDN 708 | IC 412909 | NBPGR |
| 2. | BSMR 853 | NGB/ RC 051/2001 | PPV & FRA |
| 3. | BDN 2004 - 4A | INGR 10105 | NBPGR |
| 4. | BDN 2004 – 4B | INGR 10106 | NBPGR |
| 5. | BDN 711 | S.O.2125(E)2012 | CVRC |
| 6. | BDN 716 | S.O.2805(E)2017 | CVRC |
| 7. | BDN 2013-41 (Godavari) | S.O. 8(E)2021 | CVRC |
| 8. | BDNV 2013-2 (Renuka) | S.O.1056(E)2023 | CVRC |
| | **Green gram** | | |
| 1. | BPMR 145 | NGB/ RC 488/2001 | PPV & FRA |
| 2. | BM2003-2 | IC 571727 | NBPGR |
| | **Black gram** | | |
| 1. | BDU 1 | NGB/RC 050/2001 | PPV & FRA |
| | **Gram** | | |
| 1. | BDNG 797 | IC 405223 | NBPGR |
| | **Okra** | | |
| 1. | PBN - OK-1 | IC 617898 | NBPGR |
| | **Chilli** | | |
| 1. | PBNC – 1 | IC 617899 | NBPGR |
| | **Tomato** | | |
| 1. | BDNT – 5 | IC 627752 | NBPGR |

## बीजोत्पादन कार्यक्रम व कलमे-रोपे निर्मिती (२०२३-२४)

| अ.क्र. | हंगाम | क्षेत्र (हे.) | उत्पादन (क्विंटल) |
|---|---|---|---|
| १. | खरीप | ११७७.२३ | ७३९९.३९ |
| २. | रब्बी | ३४९.३७ | २८०५.९६ |
| एकुण | | १५२६.६० | १०२०५.३५ |

## खरीप हंगाम :

| अ.क्र. | पिकाचे नांव | क्षेत्र (हे.) | उत्पादन (क्विंटल) |
|---|---|---|---|
| १. | सोयाबीन | १०१८.२३ | ६६४६.९७ |
| २. | साळ | १.०० | ०.५२ |
| ३. | बाजरी | ५.५० | २९.१२ |
| ४. | मुग | १९.६० | ५४.४७ |
| ५. | उडीद | १.०० | १.८७ |
| ६. | तूर | ११२.९० | ६३५.५१ |
| ७. | भुईमूग | १.०० | २.०० |
| ८. | सुर्यफूल | ४.५० | ११.६६ |
| ९. | कापूस | ११.०० | १३.४५ |
| १०. | भेंडी | १.०० | २.८२ |
| ११. | मिरची | १.५० | १.०० |
| | एकुण | ११७७.२३ | ७३९९.३९ |

## रब्बी हंगाम:

| अ.क्र. | पिकाचे नांव | क्षेत्र (हे.) | उत्पादन (क्विंटल) |
|---|---|---|---|
| १. | ज्वारी | ५८.७० | ७०४.४० |
| २. | गहू | ५.९० | ११८.०० |
| ३. | करडई | १७१.४३ | १२००.०० |
| ४. | हरभरा | ८४.९४ | ६३७.०५ |
| ५. | सुर्यफूल | ५.०० | १५.०० |
| ६. | जवस | २०.५० | १०२.५० |
| ७. | बाजरी | २.९० | २९.०० |
| एकुण | | ३४९.३७ | २८०५.९६ |

## फळझाडाच्या कलमा व रोपांची विक्री

### मध्यवर्ती रोपवाटीका योजना

| अ. क्र. | फळपिकाचे नांव कलमे/रोपे | संख्या | दर (रु.) | मिळालेले उत्पन्न (रु.) |
|---|---|---|---|---|
| १ | आंबा (केसर व इतर) | ११४५० | ८० | ९१६००० |
| २ | पेरु (सरदार) | १३६४ | ६० | ८१८४० |
| ३ | सिताफळ, (बाळानगर) | २३६८ | ५० | ११८४०० |
| ४ | चिकु (कालीपत्ती) | २९५७ | ९० | २६६१३० |
| ५ | जांभुळ (कोंकण बहाडोली) | १८०७ | ७० | १२६४९० |
| ६ | चिंच (नं.-२६३, प्रतिष्ठान व अजिंठा) | २७३९ | ७० | १९१७३० |
| ७ | मोसंबी (न्युसेलर/काटोलगोल्ड) | १४०३ | ६० | ८४१८० |
| ८ | डाळिंब (भगवा) | ५३९ | ३० | १६१७० |
| ९ | आवळा (एनए-७) | १०८१ | ५० | ५४०५० |
| १० | कागदी लिंबु रोपे | ३७५२ | ३५ | १३१३२० |
| ११ | करवंद | ३५८९ | १५ | ५३८३५ |
| १२ | नारळ रोपे | ८४६ | १०० | ८४६०० |
| १३ | संत्रा (नागपुर) | १३१ | ६० | ७८६० |
| १४ | अंजीर (दिनकर) | २६ | ४० | १०४० |
| १५ | बांबु रोपे | ४३२९ | २० | ८६५८० |
| १६ | शोभीवंत | १३३९ | २५ | ८४७०५ |
| १७ | चिंच, जांभुळ ,कडीपत्ता रोपे | ३११६ | २५ | ७७९०० |
| १८ | इतर (बकुळ, अशोक, करंज, गुलमोहर, अर्जुन, बदाम रोपे) | ५१०५ | २५ | १२७६२५ |
| १९ | रंगपूर लाईम रोपे | ६६१ | ३० | १९८३० |
| २० | शेवगा | ४२७ | १० | ४२७० |
| २१ | मोसंबी फळांचा लिलाव | ३९८०० | - | ३९८०० |
| २२ | रंगपुर फळांचा लिलाव | २०३०० | - | २०३०० |
| २३ | माहितीचा अधिकारी | ६० | - | ६० |
| २४ | करवंदाची विक्री | ५३.२५ | ५० | २६६२.५ |
| २५ | जांभुळ विक्री | ३६० | ८ | २८८० |
| २६ | आंबा रोपे | २५० | ८ | २००० |
| २७ | आंबा फळांची विक्री | ५२९.५ | ७० | ३७०६५ |
| २८ | उधारी व वसुली इतर | ४८६४० | - | ५८८४० |
| २९ | एकुण विक्री | | - | २७४६८०३ |
| | विद्यापीठातील इतर कार्यालयास विक्री | ४३४८५ | - | ९४८५ |
| **एकुण आर्थिक उत्पादन** | | | | **२७५६२८८** |

## बीजोत्पादन प्रक्षेत्र यांत्रिकीकरण

विद्यापीठ कार्यक्षेत्रातली २५०० एकर पडिक जमिन बीजोत्पादनासाठी विकसित करण्यात आली. तसेच विद्यापीठाचे बीजोत्पादनात ७००० क्विं. वरुन १२००० क्विं. पर्यंत वाढ करण्यात आली.





## पाणी सुरक्षा अभियान

### अमृत सरोवर

अमृत सरोवर योजनेअंतर्गत ९ करोड लि. पाणी साठवण क्षमतेचे शेततळे विकसित करण्यात आली. पुढील लक्ष २६ करोड लिटर पाणी क्षमतेचे आहे.






### उत्पादन तपासणी प्रयोगांची माहिती (२०२३-२४)

| वर्ष | पिकाचे नाव | संशोधन केंद्राचे नाव | तपासणीसाठी प्राप्त उत्पादनांची संख्या |
|---|---|---|---|
| २०२३-२४ | बीटी कापूस | कापूस संशोधन केंद्र, नांदेड | ०६ |
| | सोयाबीन | कृषिविद्या विभाग, परभणी | ०२ |
| | सोयाबीन | कृषि किटकशास्त्र विभाग, परभणी | ०१ |
| | सोयाबीन | मृद विज्ञान कृषि रसायनशास्त्र विभाग, परभणी | ०१ |
| | कापूस | मृद विज्ञान कृषि रसायनशास्त्र विभाग, परभणी | ०१ |
| | वांगी | कृषि किटकशास्त्र विभाग, परभणी | ०१ |
| | टोमॅटो | भाजीपाला संशोधन केंद्र, परभणी | ०३ |
| | भेंडी | भाजीपाला संशोधन केंद्र, परभणी | ०१ |
| | हळद | भाजीपाला संशोधन केंद्र, परभणी | ०१ |
| | मका | गहु व मका संशोधन केंद्र, परभणी | ०५ |
| | मोसंबी | मोसंबी संशोधन केंद्र, बदनापूर | ०१ |
| | खुले प्रक्षेत्र | कृषि संशोधन केंद्र, बदनापूर | ०१ |
| | | एकुण | २४ |
| | | प्राप्त तपासणी शुल्क (रू.) (ब) | ५७,६३,४००/- |
| २०२३-२४ | मॅन्युअल विडर | अवजारे तपासणी केंद्र, परभणी | ०१ |
| | | एकुण | ०१ |
| | | प्राप्त तपासणी शुल्क (रू.) (क) | ४७,५०८/- |
| | | एकुण प्राप्त तपासणी शुल्क (रू.) (अ+ब+क) | ४,७८,५०,९०८ |

### प्रशिक्षण व कार्यशाळेचे आयोजन

१. हैद्राबाद येथील केंद्रीय कोरडवाहू शेती संशोधन संस्थेच्या ३९ व्या स्थापना दिनानिमित्त दिनांक २५ एप्रिल, २०२३ रोजी दामपुरी ता. परभणी येथील प्रगतशील शेतकरी श्री अशोक सालगोडे यांना उत्कृष्ट शेतकरी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. अखिल भारतीय समन्वयित कृषि हवामानशास्त्र संशोधन प्रकल्प निक्रा अंतर्गत हवामान आधारीत कृषि सल्ला पत्रिकेनुसार आधुनिक पध्दतीने शेती तसेच फळबागेचे व्यवस्थापन करून या तंत्रज्ञानाचा शेतक-यांमध्ये प्रसार केल्याबद्दल त्यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे माजी महासंचालक डॉ. त्रिलोचन महापात्रा, माजी कुलगुरु डॉ बी. वेंकटेश्वरलु, आनंद कृषि विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. ए. एम. शेख, क्रीडाचे संचालक डॉ. व्ही. के . सिंग, माजी संचालक डॉ. वाय. एस. रामकृष्ण आणि डॉ. एस.के. बल आदी उपस्थित होते.

२. वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचा ५१ वा वर्धापनदिन आणि आंतरराष्ट्रीय भरडधान्य वर्षाचे औचित्य साधुन विस्तार शिक्षण संचालनालय आणि कृषि विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १८ मे, २०२३ रोजी खरीप शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याचे उद्घाटन अमेरिकेतील कनेक्टीकट विद्यापीठाचे मा.अधिष्ठाता तथा संचालक प्रा. इंद्रजीत चौबे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. कुलगुरु डॉ. इन्द्र मणि होते तर व्यासपीठावर अहमदाबाद (गुजरात) येथील बन्सी गीर गोशाळेचे मा. अध्यक्ष श्री. गोपालभाई सुतारीया, शिक्षण संचालक डॉ. धर्मराज गोखले, संशोधन संचालक डॉ. दत्तप्रसाद वासकर, विस्तार शिक्षण संचालक डॉ. देवराव देवसरकर, कृषि अधिकारी श्री. रवि हरणे आदींची प्रमुख उपस्थिती होती. खरीप पीक परिसंवादात विविध विषयावर विद्यापीठ शास्त्रज्ञांनी मार्गदर्शन केले. तसेच

## आदिवासी योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना यंत्रे व अवजारे वाटप





शेतकरी बांधवाच्या कृषि विषयक विविध शंकांचे निराकरण करण्यात आले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विद्यापीठ शास्त्रज्ञ लिखित विविध घडीपत्रिका, पुस्तिका, शेतीभाती मासिकांचे विमोचन करण्यात आले तसेच विद्यापीठ निर्मित बियाणे विक्रीचे उदघाटन करण्यात आले. मेळाव्यास शेतकरी बांधव, महिला शेतकरी, कृषि विस्तारक आदी मोठया संख्येने उपस्थित होते.

३. महाराष्ट्रातील चारही कृषि विद्यापीठांच्या संयुक्त कृषि संशोधन आणि विकास समितीच्या ५१ व्या बैठकीचे आयोजन दिनांक २५ ते २७ मे, २०२३ दरम्यान महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी आणि महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने राहुरी येथे करण्यात आले होते. बैठकीच्या उद्‌घाटन प्रसंगी दि. २५ मे, २०२३ रोजी अध्यक्षस्थानी ना.श्री. अब्दुलजी सत्तार, मा.मंत्री (कृषि), महाराष्ट्र राज्य तथा प्रतिकुलपती, कृषि विद्यापीठे हे होते. व्यासपीठावर दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. संजय सावंत, राहुरी येथील महात्मा फुले कषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. प्रशांतकुमार पाटील, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. इन्द्र मणि, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. शरद गडाख होते. कृषि परिषदेचे मा. महासंचालक श्री. रावसाहेब भागडे, कृषि परिषदेचे संशोधन संचालक डॉ. हरिहर कौसडीकर, वनामकृविचे संशोधन संचालक डॉ. दत्तप्रसाद वासकर, डॉ. पंदेकृविचे संशोधन संचालक डॉ. विलास खर्चे, डॉ. बासाकोकृविचे संशोधन संचालक डॉ. संजय भावे, मफुकृविचे संशोधन संचालक डॉ. एस. डी.गोरंटीवार, तसेच चारही कृषि विद्यापीठाचे शिक्षण संचालक, विस्तार शिक्षण संचालक आदींची प्रमुख उपस्थिती होती. कृषि संशोधन केंद्र, बदनापुर येथील कडधान्य पैदासकार डॉ. डी. के. पाटील यांना महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेच्या वतीने राज्यस्तरीय उत्कृष्ट कृषि संशोधक पुरस्कार राज्याचे मा.कृषि मंत्री ना.श्री.अब्दुल सत्तार यांच्या हस्ते देण्यात आला. या बैठकीच्या समारोपीय कार्यक्रमाप्रसंगी दि. २७ मे, २०२३ रोजी अध्यक्षस्थानी डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. संजय सावंत हे होते. कार्यक्रमात विद्यापीठातील उत्कृष्ट कृषि संशोधक आणि निवृत्त कृषि संशोधकांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला तसेच विविध पुस्तके, घडीपत्रिकांचे विमोचन करण्यात आले. तीन दिवस चाललेल्या बैठकीत राज्यातील चारही कृषि विद्यापीठातील तीनशेपेक्षा जास्त शास्त्रज्ञांनी सहभाग घेतला. तांत्रिक सत्रातील १२ गटांच्या कार्यवृत्तांताचे वाचन समन्वयकांनी केले. या बैठकीत वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या विविध पिकांच्या ६ वाणास मान्यता देण्यात आली. याशिवाय ३ यंत्रे आणि विविध विभागांच्या ३६ शिफारशी प्रसारीत करण्यात आल्या आहेत.

४. अखिल भारतीय समन्वयीत कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्पाच्या कोरडवाहू एकात्मिक शेती पध्दती अंतर्गत पालम तालुक्यातील मौजे आडगाव येथे दिनांक ५ जून, २०२३ रोजी खरीप हंगाम पूर्व नियोजन या विषयावर कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता. कार्यक्रमात विद्यापीठातील तज्ञांनी विविध विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. किशोर कुगने हे होते तर सरपंच श्री. बाळासाहेब ढोले, उपसरपंच श्री. रमाकांत पाऊडशेटे  मुख्य शास्त्रज्ञ डॉ. वासुदेव नारखेडे आदींची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाला मौजे आडगाव येथील मोठया संख्येने शेतकरी उपस्थित होते.



**कोरडवाहू शेती प्रशिक्षण कार्यक्रम**

५. वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठांतर्गत असलेल्या लातूर येथील गळीतधान्ये संशोधन केंद्रास अखिल भारतीय समन्वीत संशोधन प्रकल्प (सुर्यफूल) या योजनेत सन २०१७ ते २०२१ या कालावधीमध्ये सुर्यफूल पिकावर केलेल्या उत्कृष्ट संशोधन कार्याबदल मंडौर, जोधपूर (राजस्थान) येथील कृषि विद्यापीठात पार पडलेल्या वार्षिक समूह बैठकीमध्ये उत्कृष्ट संशोधन केंद्राचा पुरस्कार प्रदान करण्यांत आला. सदर पुरस्कार भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे मा. उप-महासंचालक डॉ. टी.आर. शर्मा, सहाय्यक महा-संचालक डॉ. संजीव गुप्ता, कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. बी.आर. चौधरी यांचे हस्ते प्रदान करण्यांत आला.

६. खरीप विभागीय संशोधन व सल्लागार समितीची ७३ वी बैठक दिनांक १२ जून, २०२३ रोजी राष्ट्रीय कृषि संशोधन प्रकल्प, औरंगाबाद येथे डॉ. इंद्र मणी, मा. कुलगुरु, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांचे अध्यक्षतेखाली पार पाडली. विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. दत्तप्रसाद वासकर, संचालक विस्तार शिक्षण डॉ. देवराव देवसरकर, छत्रपती संभाजीनगर विभागाचे कृषि सहसंचालक श्री. आर. टी. जाधव, लातुर विभागाचे डॉ. एस. के. दिवेकर, सहयोगी संशोधन संचालक डॉ. एस.

बी. पवार, डॉ. जया बंगाळे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. या बैठकीमध्ये खरीप २०२३ हंगामासाठी मार्गदर्शन करण्यात आले. डॉ. दत्तप्रसाद वासकर, संचालक संशोधन यांनी संशोधनात्मक तसेच डॉ.देवराज देवसरकर, संचालक विस्तार शिक्षण यांनी विस्तारकार्याविषयी मार्गदर्शन केले. कृषि विभाग, महाराष्ट्र शासनाचे पदाधिकारी कर्मचारी यांनी सादरीकरण केले. या बैठकीसाठी कृषि विद्यापीठातील शास्त्रज्ञ व शेतकरी उपस्थित होते.

७. अखिल भारतीय समन्वयीत कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्पाच्या वतीने हवामान बदलानुरूप राष्ट्रीय कृषि उपक्रम अंतर्गत खरीप हंगाम नियोजन व शेतकरी मेळाव्याचे आयोजन दिनांक १५ जून, २०२३ रोजी करण्यात आले होते, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून मा. कुलगुरु डॉ. इन्द्र मणि होते. यावेळी प्रमुख पाहुणे संशोधन संचालक डॉ. दत्तप्रसाद वासकर, विद्यापीठ कार्यकारी परिषदेचे सदस्य मा. श्री. प्रविण देशमुख, सरपंच (बाभुळगाव) श्री. रामदास दळवे, सरपंच (उजळंबा) श्री. विठ्ठल धोतरे, सरपंच (सोन्ना) श्री. मारोती कदम, सरपंच (आडगांव) श्री. बालासाहेब ढोले आदींची विशेष उपस्थिती होती. परभणी तालुक्यातील बाभुळगाव, उजळंबा, सोन्ना आणि पालम तालुक्यातील आडगांव येथील शेतकऱ्यांच्या शेतावर हा प्रकल्प राबविण्यात येतो. याप्रसंगी मान्यवरांच्या प्रात्याक्षिकांसाठी निवडक शेतकरी बांधवांना विद्यापीठ विकसित बियाणे वाटप करण्यात आले.



**एकात्मिक शेती पध्दती आणि हवामान बदलानुरुप शेती प्रशिक्षण कार्यक्रम**

८. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा हरितक्रांतीचे प्रणेते स्व. वसंतराव नाईक यांची जयंती दिनांक १ जुलै, २०२३ रोजी कृषिदिन म्हणुन साजरी करण्यात आली. विद्यापीठातील स्व. वसंतराव नाईक यांच्या स्मारकाचे मा. कुलगुरू डॉ. इन्द्र मणि यांच्या हस्ते पुजन करुन विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी मार्गदर्शनात मा. कुलगुरू म्हणाले की, राज्यातील कृषि व ग्राम विकासात स्व. वसंतराव नाईक यांचे मोठे योगदान असुन राज्यात आधुनिक कृषिची सुरुवात त्यांच्या काळात झाली. त्यांनी अवलंबलेल्या कृषि धोरणामुळे राज्य अन्नधान्यात स्वयंपुर्ण झाले असुन आज कृषि क्षेत्रात प्रगतीपथावर आहे. कार्यक्रमास शिक्षण संचालक डॉ. धर्मराज गोखले, संशोधन संचालक डॉ. दत्तप्रसाद वासकर, विस्तार शिक्षण संचालक डॉ. देवराव देवसरकर, कुलसचिव डॉ. धीरजकुमार कदम, प्राचार्य डॉ. सय्यद ईस्माईल, प्राचार्या डॉ. जया बंगाळे, प्राचार्य डॉ. राजेश क्षीरसागर, सहयोगी अधिष्ठाता (निम्न शिक्षण) डॉ. गजेंद्र लोंढे आदींसह विविध विभागाचे विभाग प्रमुख, विद्यापीठातील अधिकारी, आणि कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

९. अखिल भारतीय समन्वयीत संशोधन प्रकल्प कृषीरत महिला, सामुदायिक विज्ञान महाविद्यालय, परभणी आणि ज्वार संशोधन केंद्र, परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २ जुलै, २०२३ रोजी मौजे पोखर्णी ता. जि. परभणी येथे भरडधान्य उत्पादन आणि दैनंदिन आहारातील वापर वाढविण्याच्या दृष्टीने शेतकऱ्यांसाठी आद्यरेषीय पीक प्रात्यक्षिकांतर्गत ज्वारी आणि बाजरी पिकांच्या विद्यापीठ विकसित बियाणांचे वाटप करण्यात आले. आंतरराष्ट्रीय भरडधान्य वर्ष २०२३ अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या श्रीअन्नग्राम कार्यक्रमासाठी अभाससंप्र-कृषीरत महिला प्रकल्पाने पोखर्णी हे गाव दत्तक घेतले आहे. यावेळी अभाससंप्र-कृषीरत

महिला केंद्र समन्वयक डॉ. सुनीता काळे यांनी भरडधान्याचे महत्त्व आणि भरडधान्यावर प्रक्रीया, त्यावर आधारित अन्नपदार्थ यावर मार्गदर्शन केले. ज्वार संशोधन केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. लक्ष्मण जावळे यांनी भरडधान्याचे विविध वाण, सुधारित वाणांची वैशिष्टये आणि उत्पादन क्षमता यावर मार्गदर्शन केले. डॉ. प्रीतम भुतडा यांनी भरडधान्य लागवडीचे तंत्रज्ञान यावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमात गावातील शेतकरी आणि महिला मोठया संख्येने उपस्थित होते.

१०. ज्वार संशोधन केंद्र, परभणी आणि भारतीय भरडधान्य संशोधन संस्था, राजेंद्रनगर (हैद्राबाद) यांच्या संयुक्त विद्यमाने आदिवासी उपयोजनेअंतर्गत आंतरराष्ट्रीय भरडधान्याचे औचित्य साधुन आदिवासी लोकांच्या दैनंदिन आहारात भरडधान्याचा वापर व उत्पादनात वाढ व्हावी या उद्देशाने दिनांक ३ जुलै, २०२३ रोजी ज्वारीचे जैवसमृध्द वाण परभणी शक्ती आणि जैविक बुरशीनाशक ट्रायकोबुस्ट या निविष्ठांचे मौजे वाळक्याची वाडी ता. हिमायतनगर, जि. नांदेड येथील आदिवासी शेतकरी बांधवाना वाटप करण्यात आले. यावेळी केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. एल. एन. जावळे यांनी परभणी शक्ती या वाणाचे वैशिष्टये, आरोग्याच्या दृष्टीने महत्व याविषयी मार्गदर्शन केले. ज्वार कृषिविद्यावेत्ता प्रा. प्रीतम भुतडा यांनी भरडधान्यांचे दैनंदिन आहारातील महत्व आणि लागवड तंत्रज्ञान याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास उपसरपंच श्री. संजय मोदाळकर, तलाठी श्री. दिलीप मेटलवाड आदींसह गावातील शेतकरी बांधव व महिला उपस्थित होत्या.

११. वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठातील सेंद्रीय शेती संशोधन आणि प्रकल्पाच्या वतीने महाराष्ट्र राज्यासाठी सेंद्रीय आणि नैसर्गिक शेतीतील संशोधन प्राधान्य या विषयावर एक दिवसीय विचारमंथन कार्यशाळेचे आयोजन दिनांक १२ जुलै, २०२३ रोजी करण्यात आले होते, कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी मा. कुलगुरु डॉ. इन्द्र मणि होते. राज्यात सेंद्रीय शेती विकासासाठी लोकचळवळ उभी करण्याकरीता शास्त्रीय ज्ञानाचे पाठबळ आवश्यक आहे, असे प्रतिपादन मा. कुलगुरु यांनी याप्रसंगी केले. कार्यशाळेत प्रमुख पाहुणे म्हणून संशोधन संचालक डॉ. दत्तप्रसाद वासकर, नागपुर येथील प्रादेशिक सेंद्रीय व नैसर्गिक शेती केंद्राचे प्रादेशिक संचालक डॉ. ए. एस. राजपुत, अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशनचे प्रकल्प संचालक श्री. संतोष आळसे, यवतमाळ येथील वसंतराव नाईक कृषि जैव तंत्रज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. एन. डी. पासलावार, प्राचार्य डॉ. सय्यद इस्माईल, उपसंचालक श्री. बुचे, प्रकल्प संचालक (आत्मा) श्री. डी.एस. चव्हाण, कृषि आयुक्तालय सेंद्रीय शेतीचे राज्य समन्वयक श्री. सुनील चौधरी आदींसह प्रगतशील शेतकरी कृषिभुषण श्री. सुर्यकांतराव देशमुख, श्री. शिवराम घोडके, आयोजक प्रमुख अन्वेषक डॉ. आनंद गोरे आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी डॉ. दत्तप्रसाद वासकर म्हणाले की, कृषि निविष्ठावरील वाढता खर्च, जमिनीचे खालावलेले आरोग्य, रासायनिक कीटकनाशकांचा अधिक प्रमाणात वापर व त्यांचे फळे व भाजीपाला पिकातील अवशेष, हवामान बदल या पार्श्वभूमीवर सेंद्रीय शेती ही शेतकरी उत्पादक आणि ग्राहक यांना दोघांनाही महत्वाची आहे. सेंद्रीय शेतीत निविष्ठा या शेतावरच बनविल्या पाहिजेत आणि शेतीवरील खर्च कमी केला पाहिजे. तांत्रिक सत्रात भारतीय एकात्मिक शेती पद्धती संशोधन संस्था, मोदीपुरम, उत्तर प्रदेश येथील शास्त्रज्ञ डॉ.







अमृत लाल मीना, डॉ. प्रकाश चंद घासल, डॉ. चंद्रभानू यांनी सेंद्रीय आणि नैसर्गिक शेतीमधील विविध विषयावर मार्गदर्शन केले. राज्यातील चारही कृषि विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी आपल्या केंद्राचा अहवाल सादर केला. कार्यशाळेस देशातील व राज्यातील शास्त्रज्ञ, विभाग प्रमुख, कृषि विज्ञान केंद्राचे प्रमुख, कृषि विभागाचे अधिकारी, सेंद्रीय प्रमाणीकरण तज्ञ, प्रगतशील शेतकरी उपस्थित होते.



१२. अखिल भारतीय समन्वयीत कोरडवाहु शेती संशोधन प्रकल्पाच्या वतीने कोरडवाहु एकात्मिक शेती पध्दती या योजनेअंतर्गत दिनांक १८ ऑगस्ट, २०२३ रोजी मौजे आडगाव ता.जि.परभणी येथे पशुधन व्यवस्थापन : लम्पी जागृती व लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच श्री. बालासाहेब ढोले, हे होते तर तांत्रिक मार्गदर्शक म्हणुन पशुधन विकास अधिकारी डॉ.प्रकाश सावणे, वरिष्ठ शास्त्रज्ञ-कृषिविद्या डॉ.आनंद गोरे, डॉ. शिवाली पाटील, डॉ. अनिल डांगे, उपसरपंच श्री. रमाकांत पौडशेट्टे, श्री. उमाकांतराव ब्याळे, पशुसंवर्धन विभागातील कर्मचारी व गावातील शेतकरी उपस्थित होते. डॉ. प्रकाश सावणे यांनी सद्यस्थितीत लम्पी रोगाचा वाढता प्रभाव, लम्पी लसीकरणाची माहिती दिली. डॉ. आनंद गोरे यांनी पावसाच्या खंडकाळामध्ये पिकांसाठी घ्यावयाची काळजी यावर माहिती दिली. कार्यक्रमाअंतर्गत ४०० जनावरांचे लसीकरण करण्यात आले व १४ लम्पीग्रस्त जनावंरावर प्रतिजैविके व रोगप्रतिकारात्मक शक्ती वाढविण्याऱ्या लसी देवुन उपचार करण्यात आली. याप्रसंगी लसीकरण कार्यक्रमास व तांत्रिक चर्चासत्रास मोठया संख्येने शेतकरी व पशुपालक उपस्थित होते.

१३. वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी आणि कृषि विभाग, महाराष्ट्र शासन, परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त दि. १७ सप्टेंबर, २०२३ रोजीरबी पीक परिसंवाद कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. कुलगुरू डॉ. इन्द्र मणि हे होते कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणुन नागपुर येथील महाराष्ट्र पशु आणि मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू मा डॉ. नितिन पाटील आणि परभणीचे माजी खासदार मा. ॲड. सुरेशराव जाधव हे होते. व्यासपीठावर संचालक (संशोधन) डॉ दत्तप्रसाद वासकर, विस्तार शिक्षण संचालक डॉ धर्मराज गोखले, संचालक (शिक्षण) डॉ उदय खोडके, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी श्री दौलत चव्हाण, श्री किशोर कदम आदींची प्रमुख उपस्थिती होती. शेतकरी बांधवांनी हवामान बदलानुसार रखी पिकांचे नियोजन करावे. या वर्षी खरीप हंगामात पावसाचे प्रमाण कमी राहीले असुन पडणाऱ्या पावसात खंड पडला, यामुळे खरीप पीकाच्या वाढीवर परिणाम झाला आहे. पावसाचे कमी प्रमाण आणि उपलब्ध जमीनीतील ओलावा यांचा विचार करून येणाऱ्या रबी पिकांची निवड करावी. परभणी कृषि विद्यापीठ विकसित ज्वार, करडई, जवस आदी पिकांच्या वापर करावा, असा सल्ला कुलगुरू मा. डॉ. इन्द्र मणि यांनी दिला. प्रमुख अतिथी कुलगुरु मा. डॉ. नितिन पाटील म्हणाले की, अनिश्चित पर्जन्यमान्याच्या पार्श्वभुमीवर शेतकरी बांधवांनी पीक लागवडी सोबतच शेळी पालन, मत्स्य पालन, दुग्ध व्यवसाय आदीची जोड दिल्यास आर्थिक स्थैर्य प्राप्त होऊ शकते. परिसंवादात हवामान बदलानुसार रबी पिकांचे नियोजन, शुन्य मशागत नियोजन, रबी पिक लागवड, पिकांवरील किड व रोग व्यवस्थापन, शेततळयाचे नियोजन आदी विषयावर विद्यापीठ शास्त्रज्ञांनी मार्गदर्शन केले. मान्यवरांच्या हस्ते विद्यापीठ विकसित रबी पिकांच्या बियाणे विक्रीचे उदघाटन करण्यात आले. तसेच विद्यापीठ शास्त्रज्ञ लिखित घडीपत्रिका व प्रकाशनांचे विमोचन करण्यात आले. परिसंवादास शेतकरी बांधव, कृषि अधिकारी मोठया संख्येने उपस्थित होते.

१४. वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठातंर्गत किटकनाशक प्रतिकारशक्ती प्रकल्पांतर्गत आयआरएम मौजे पेठ बाभळगाव ता.पाथरी जि.परभणी येथे दिनांक ०७ ऑक्टोबर, २०२३ रोजी जागतिक कापूस दिनाचे औचित्य साधून गटचर्चा आणि प्रक्षेत्र भेट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. परभणी जिल्हयातील मौजे पेठ बाभळगाव, लोणी व टाकळगव्हाण ता.पाथरी खानापूर व पिंगळी ता.परभणी या गावांमध्ये कीटकनाशक प्रतिकारशक्ती व्यवस्थापन प्रकल्प केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर यांच्या सहकार्याने राबवण्यात येत आहे. प्रकल्पाअंतर्गत शेतकऱ्यांच्या शेतावर गुलाबी बोंडअळी व्यवस्थापनाची प्रात्यक्षिके घेण्यात आली आहेत. त्यामध्ये शेतकऱ्यांना जैविक कीटकनाशके, ट्रायकोकार्डस, कामगंध सापळे आणि रासायनिक कीटकनाशके यासारख्या निविष्ठा वाटप करण्यात येत आहेत. यावेळी कापूस संशोधन योजनाचे प्रभारी अधिकारी तथा कापूस कृषि विद्यावेत्ता डॉ.अशोक जाधव, प्रकल्प समन्वयक तथा सहाय्यक किटकशास्त्रज्ञ डॉ.दिंगबर पटाईत यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास श्री.रुखमानंद लव्हाळे, श्री.सुदामती रणेर, श्री.संतोष ठोंबरे, श्री.लक्ष्मण गिरी, श्री.स्वराज गिराम, श्री.दिपक महिपाल, श्री.माऊली फुन्ने, श्री.राजेभाऊ तायनाक, श्री.रमेश फुके, श्री.मुंजाभाऊ धर्मे, श्री.कैलाश चामनूर, श्री.दत्ता गिराम यांच्यासह तीनही गावातील शेतकरी उपस्थित होते. यावेळी प्रगतशील शेतकरी श्री.रुखमानंद लव्हाळे यांच्या कापूस प्रक्षेत्रास भेट देण्यात आली.

१५. वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ अंतर्गत अखिल भारतीय ज्वार सुधार प्रकल्प-ज्वार संशोधन केंद्र, परभणी मार्फत आद्यरेषिय पीक प्रात्यक्षिक योजने अंतर्गत जांब ता.जि.परभणी येथे दिनांक १३ ऑक्टोबर, २०२३ रोजी रब्बी ज्वारीचे विविध सुधारीत वाणाचे बियाणे, निविष्ठा, घडीपुस्तिकाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संशोधन संचालक डॉ.दत्तप्रसाद वासकर हे होते तर कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणुन गावातील प्रतिष्ठीत शेतकरी श्री.बालासाहेब रेंगे, ज्वार पैदासकार डॉ.एल.एन.जावळे, ज्वार रोगशास्त्रज्ञ डॉ.के.डी.नवगीरे, अभास कृषिरत महिला प्रकल्पाच्या केंद्र समन्वयक डॉ.सुनिता काळे, सहाय्यक ज्वार कृषिविद्यावेत्ता श्रीमती प्रितम भुतडा आदींची उपस्थिती होती. यावेळी उपस्थितीत शेतकरी बांधवांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमास जांब गावातील शेतकरी बांधव उपस्थित होते.



१६. वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठातील अखिल भारतीय समन्वयीत कोरडवाहु शेती संशोधन प्रकल्प येथील हवामान बदलानुरूप राष्ट्रीय कृषि उपक्रमातंर्गत (निक्रा प्रकल्प) दिनांक १८ ऑक्टोबर, २०२३ रोजी रबी हंगामाचे नियोजन यावर चर्चासत्र आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास उजळांबा, बाभुळगाव व सोन्ना या गावामधील शेतकऱ्यांनी सहभाग घेतला होता. यावेळी विद्यापीठ विकसित करडईचे पीबएनएस-१२, ज्वारीचे परभणी ज्योती, हरभरा पिकाचे आकाश या सुधारीत वाणाच्या बियाणे शेतकऱ्यांना प्रात्यक्षिकाकरीता वितरीत करण्यात आले. यावेळी मुख्यशास्त्रज्ञ डॉ.वा.नि.नारखेडे, कृषि अभियंता डॉ.एम.एस.पेंडके, वरिष्ठ शास्त्रज्ञ (कृषिविद्या) डॉ. अे. के. गोरे यांनी शेतकरी बांधवांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमास श्रीमती सपना रामदास दळवे सरपंच, बाभुळगाव, श्री विठ्ठलराव धोतरे सरपंच, उजळांबा व श्री.बाळासाहेब देशमुख, सरपंच, सोन्ना, मृदशास्त्रज्ञ डॉ.पी.एच.गौरखेडे आदीसह गावातील शेतकरी उपस्थित होते.

१७. वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठातील सेंद्रीय शेती संशोधन आणि प्रशिक्षण केंद्र आणि राष्ट्रीय कर्तव्य अभियान व ग्राम विकास गतिविधी (महाराष्ट्र राज्य) यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ४ डिसेंबर, २०२३ रोजी एक दिवसीय नैसर्गिक शेती ते आत्मनिर्भर ग्राम अभ्यास सत्राचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू मा.डॉ.इन्द्र मणि हे होते तर विशेष अतिथी म्हणुन ग्राम विकास गतिविधीचे क्षेत्र प्रमुख मा.श्री. विनय कानडे उपस्थित होते. व्यासपीठावर संशोधन संचालक डॉ.दत्तप्रसाद वासकर, विस्तार शिक्षण संचालक डॉ.धर्मराज गोखले, सेंद्रीय शेती प्रकल्पाचे प्रमुख अन्वेषक डॉ.आनंद गोरे, परभणी आत्माचे प्रकल्प संचालक श्री.दौलत चव्हाण, देआसरा फाउंडेशन, पुणेचे श्री.प्रकाश आगाशे, मुख्य विस्तार शिक्षण अधिकारी डॉ.प्रशांत देशमुख राष्ट्रीय कर्तव्य अभियानाचे संयोजक श्री.विजय वरूडकर, गोसंवर्धन विभाग प्रमुख श्री.रमाकांत जोशी, कृषि यंत्र व शक्ती विभागाच्या विभाग प्रमुख डॉ.स्मिता सोलंकी आदींच उपस्थिती होती. तांत्रिक सत्रात डॉ.आनंद गोरे,

श्री. दौलत चव्हाण, डॉ.एल.एन.जावळे, डॉ.पी.व्ही.पडघन, श्री.विकास कदम, श्री.परमेश्वर स्वामी, श्री. अजगांवकर, श्री.शिवप्रसाद कोरे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास प्रगतशील शेतकरी कृषिभुषण श्री.कांतरावजी देशमुख झरीकर, श्री.नरेश शिंदे, श्री.कमल किशोर अग्रवाल आदी उपस्थित होते. शेतकरी बंधु-भगिनी, शेतकरी उत्पादक कंपनीचे प्रतिनीधी, सरपंच, स्वयंसेवी संस्थाचे सदस्य, कृषि शास्त्रज्ञ, कृषि विभागाचे अधिकारी, विद्यार्थी, कृषि विद्यापीठाचे अधिकारी/कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

१८. विस्तार शिक्षण संचालनालय, वनामकृवि, परभणी, कृषि विज्ञान केंद्र, तुळजापुर, महिला आर्थिक विकास महामंडळ, वॉटर ऑर्गनाझेशन ट्रस्ट आणि स्वयंम शिक्षण प्रयोग, धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त दिनांक ३ जानेवारी, २०२४ रोजी कृषी महाविद्यालय, धाराशिव येथे महिला शेतकरी मेळावा आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. कुलगुरू प्रा.(डॉ.) इन्द्र मणि हे होते. व्यासपीठावर अटारी पुणेचे संचालक डॉ. सुब्रतो रॉय, विस्तार शिक्षण संचालक डॉ धर्मराज गोखले, विभागीय सहसंचालक श्री साहेबराव दिवेकर, कृषी विभागाचे श्री अभिमन्यू काशीद, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एम. बी. पाटील, कृषी विज्ञान केंद्राच्या कार्यक्रम समन्वयक श्रीमती वर्षा मरवाळीकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. शेती कामात महिलांचा मोठा वाटा आहे, परंतु महिला आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. ग्रामीण भागातील प्रत्येक महिलांनी कुटुंबासोबत स्वतःच्या स्वास्थ्याकडे लक्ष देणे अत्यंत गरजेचे आहे. जर महिला निरोगी झाली तर संपूर्ण पर राहील, घर निरोगी राहिले तर समाज निरोगी होईल आणि समाज निरोगी झाला तर संपूर्ण देश निरोगी होईल, असे प्रतिपादन मा. कुलगुरु यांनी याप्रसंगी केले. याप्रसंगी डॉ. धर्मराज गोखले, डॉ. सुब्रतो राय, श्री साहेबराव दिवेकर यांनी विविध विषयावर मार्गदर्शन केले. सदरील महिला मेळाव्या दरम्यान जिल्ह्यातील यशस्वी शेतकरी महिला श्रीमती मनीषा गायकवाड, उमा कराड, सारिका बोरगावकर कृषी विज्ञान केंद्राकडून सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला. मेळाव्यात तांत्रिक सत्रात विविध विषयावर शास्त्रज्ञ व तज्ञांना मार्गदर्शन केले. मेळाव्यात मोठया प्रमाणात महिलांचा सहभाग होता.

१९. जर्मन एजन्सी जीआय झेड, सन सीड प्रायव्हेट लिमिटेड आणि वनामकृवि यांच्यात झालेल्या सामंजस्य करारानुसार या संस्थाच्या संयुक्त विद्यमाने ॲग्री-फोटोव्होल्टेईक तंत्रज्ञान विकास व संशोधना करिता परभणी जिल्ह्यामध्ये मानवत जवळ ॲग्री-फोटोव्होल्टेईक संशोधन प्रकल्प राबविण्यात येत आहे. या संशोधन प्रकल्पाचे उद्घाटन दिनांक १९ मार्च, २०२४ रोजी करण्यात आला.अध्यक्षस्थानी कुलगुरु प्रा.(डॉ.) इन्द्र मणि हे होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून जीआयझेडच्या इंडो जर्मन एनर्जी फोरमचे संचालक श्री. टोबीयस विन्टर, भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या माजी मुख्य शास्त्रज्ञा डॉ. रेणु खन्ना चोप्रा, नॅशनल सोलार एनर्जी, फेडरेशन ऑफ इंडियाचे श्री. मनू बिश्नोई हे होते. याप्रसंगी संचालक शिक्षण डॉ. उदय खोडके, संचालक संशोधन डॉ. जगदीश जहागीरदार, संचालक विस्तार शिक्षण डॉ. धर्मराज गोखले, कुलसचिव श्री. पी के काळे यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षीय भाषणात प्रा.(डॉ.)इन्द्र मणि म्हणाले की, ॲग्री-फोटोव्होल्टेईक तंत्रज्ञानाच्या माध्यमातुन शेतजमिनीवर सौर ऊर्जा निर्मिती आणि पिक लागवड हे दोन्ही बाबी शक्य होणार आहे. भारतात मोठया प्रमाणात सौर ऊर्जा निर्मितीस वाव असुन ॲग्रीपीव्ही हे पर्यावरण पुरक तंत्रज्ञानाद्वारे शेतजमीनीचा कार्यक्षम वापर करून हरित ऊर्जा निर्मिती शक्य होणार आहे. प्रकल्पाच्या उद्घाटन समारंभामध्ये जीआयझेड या संस्थेद्वारे मोठी गुंतवणूक करुन उभारण्यात आलेले संशोधन साहित्य व उपकरणे विद्यापीठास कराराद्वारे कायमस्वरूपी हस्तांतरित करण्यात आले. यामुळे विद्यापीठाद्वारे ॲग्री-फोटोव्होल्टेईक हा प्रकल्प कायमस्वरूपी कार्यान्वित ठेवण्यासाठी मोठी मदत होणार आहे. मार्गदर्शनात जीआयझेडचे संचालक श्री टोबियास वीन्टर यांनी ॲग्रीपीव्ही तंत्रज्ञान संशोधनात पुढाकार घेतल्या बाबत विद्यापीठाचे अभिनंदन केले. नॅशनल सोलर एनर्जी, फेडरेशन ऑफ इंडियाचे श्री. मनू बिश्नोई यांनी ॲग्री- फोटोव्होल्टेईक प्रकल्पातील गुंतवणूक आणि कार्य नमूद केले तसेच आयएआरआयच्या माजी मुख्य शास्त्रज्ञ डॉ. रेणु खन्ना चोप्रा यांनी जागतिक तापमान वाढीमुळे उद्भवणाऱ्या उष्णता आणि दुष्काळाचा परिणामामध्ये ताण सहन करणारे संशोधन शास्त्रज्ञांनी विकसित करावेत, यासाठी ॲग्री-फोटोव्होल्टेईक तंत्रज्ञानाचा उपयोग करावा असे सांगितले. उद्घाटन समारंभास सन सीड प्रायव्हेट लिमिटेड चे संचालक श्री विवेक सराफ हे आभासी माध्यमाद्वारे सहभागी झाले होते. प्रकल्पाच्या मुख्य शास्त्रज्ञा डॉ. गोदावरी पवार यांनी प्रास्ताविक केले. विद्यापीठातील पदव्युत्तर पदवीचे विद्यार्थी ॲग्रीपीव्ही तंत्रज्ञानावर संशोधन करत असल्याचे सांगितले. या कार्यक्रमासाठी जीआयझेडचे फ्लोरियन पोस्टल, एलिना टेट्जलफ, तात्जेना, मुख्य शास्त्रज्ञ डॉ. गोदावरी पवार, उपमुख्य शास्त्रज्ञ डॉ. राहुल रामटेके, डॉ. आर. व्ही. चव्हाण, डॉ. विक्रम घोळवे, डॉ. बसलींगप्पा कलालबंडी, डॉ. सुदाम शिराळे, डॉ. विशाल इंगळे डॉ. सुनीता पवार आणि विद्यापीठातील विविध महाविद्यालयांचे सहयोगी अधिष्ठाता, विभाग प्रमुख, प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

२०. वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठतील सिंचन पाणी व्यवस्थापन प्रकल्पाद्वारे जागतिक जल दिनानिमित्त जलपूजन व जल जागृती कार्यक्रमाचे आयोजन दिनांक २२ मार्च, २०२४ रोजी करण्यात आले. कार्यक्रमासाठी संचालक शिक्षण डॉ. उदय खोडके हे अध्यक्षस्थानी होते तर संचालक संशोधन डॉ.जगदीश जहागीरदार, मुख्य शास्त्रज्ञ डॉ. हरीश आवारी, डॉ. चंद्रकांत लटपटे, डॉ. मदन पेंडके, डॉ. सुमंत जाधव, डॉ. विशाल इंगळे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमामध्ये मान्यवरांच्या हस्ते जलपूजन करण्यात आले. याप्रसंगी अध्यक्षीय भाषणात डॉ. उदय खोडके यांनी आधुनिक शेती फायदेशीर करण्यासाठी पावसाचे वाहून जाणारे पाणी शेततळयात साठवून वापरणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन केले. तद्नंतर संचालक संशोधन डॉ. जगदीश जहागीरदार यांनी आधुनिक सिंचन प्रणालीचा अवलंब करून दैनंदिन जीवनात पाण्याचा काटकसरीने वापर करण्यावर भर देणे आवश्यक असल्याचे नमूद केले. कार्यक्रमात डॉ. मदन पेंडके, डॉ. सुमंत जाधव यांनी पाणी बचती बद्दल मार्गदर्शन केले. कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय, परभणी आणि कृषि महाविद्यालय, उदगीर येथील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

२१. वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठातील अखिल भारतीय समन्वयीत संशोधन प्रकल्प पशु शक्तीचा योग्य वापर विभागाच्या वतीने अनुसूचित जाती उपयोजने अंतर्गत कृषि यांत्रिकीकरण व मूल्यवर्धन दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम व सुधारित शेती अवजाराचे हस्तांतरण कार्यक्रम दि. २७ मार्च, २०२४ रोजी आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष वनामकृविचे माननीय कुलगुरु प्रा.(डॉ.) इन्द्र मणि हे होते. आणि प्रमुख अतिथी म्हणून संचालक संशोधन डॉ. जगदीश जहागीरदार, संचालक शिक्षण डॉ. उदय खोडके, हे होते. कार्यक्रमासाठी विद्यापीठ अभियंता श्री. दिपक कशाळकर, डॉ. राहुल रामटेके, डॉ. स्मिता सोळंकी, डॉ. चंद्रकांत लटपटे यांची उपस्थिती होती. अध्यक्षीय भाषणात बोलताना प्रा.(डॉ.) इन्द्र मणि म्हणाले की, योजनेद्वारे हस्तांतरीत सुधारित शेती अवजारांचा शेतकऱ्यांनी आपल्या शेतावर प्रत्यक्ष वापर करून कृषि निविष्ठांचा वापर आणि वेळेमध्ये बचत करावी. डॉ. स्मिता सोळंकी यांनी उपस्थित शेतकऱ्यांना सुधारित अवजारे तंत्रज्ञानाबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी अन्नदाता पुरुष बचत गट, प्रकाशवाट शेतकरी उत्पादक कंपनी, आजेगाव, यशोधरा बचत गट, शिंदेफळ, सावित्रीबाई फुले महिला बचत गट, भिमक्रांती महिला बचत गट, पळशी तसेच वाघजडी ता.शेनगाव जि. हिंगोली येथील महिला व पुरुष शेतकऱ्यांची उपस्थिती होती.






**जागतिक जल दिवस**






**कृषि अभियांत्रिकीकरण व मुल्यवर्धन प्रशिक्षण कार्यक्रम**

## कार्यक्रमांचे आयोजन




तण नियंत्रण प्रशिक्षण



तुती प्रशिक्षण कार्यक्रम

### बांबु शेती कार्यशाळा आयोजन

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठात बांबु शेती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास विद्यापीठाचे सन्माननीय कुलगुरु, डॉ. इन्द्र मणि तसेच श्री. पाशा पटेल अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कृषिमुल्य आयोग यांची विशेष उपस्थिती होती. या कार्यक्रमात बांबु शेती, मुल्यवर्धन तसेच बांबु शेतीसाठी बाह्य संस्थेकडून अर्थसहाय्य मिळणेबाबत चर्चा झाली.



बांबु शेती प्रशिक्षण कार्यक्रम

### केंद्रीय कोरडवाहू संशोधन संस्था, हैद्राबाद येथील शास्त्रज्ञांच्या परभणी तालुक्यातील हवामान बदलानुरुप राष्ट्रीय कृषि उपक्रम योजने अंतर्गत शेतकऱ्यांच्या शेतावर आयोजित केलेल्या उपक्रमास भेटी





## महीला सक्षमीकरण कार्यक्रम

विद्यापीठात आदिवासी योजनेअंतर्गत महिला सक्षमीकरण कार्यक्रम अन्नतंत्र महाविद्यालय तसेच कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय यांच्या तर्फे आयोजित करण्यात आला. यात भरडधान्य उपयुक्तता आणि मुल्यवर्धन यावर प्रशिक्षण कार्य्रकम आयोजित करुन प्रात्यक्षिके देण्यात आले.







## राष्ट्रीय बियाणे परिषदेचे आयोजन दिनांक ११-१३ डिसेंबर, २०२३






छत्रपती संभाजीनगर येथे वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी आणि इंडीयन सोसायटी टेक्नॉलॉजी, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच नॅशनल सीड रिसर्च अँड ट्रेनिंग सेंटर, वाराणसी, कृषि व शेतकरी कल्याण विभाग, भारत सरकार यांच्या सहकार्याने बाराव्या राष्ट्रीय बियाणे परिषदेचे आयोजन दिनांक ११-१३ डिसेंबर, २०२३ दरम्यान करण्यात आले होते. यावेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणुन भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे माजी महासंचालक डॉ.मंगला राय, पद्मश्री राहीबाई पोपेरे, पद्मश्री श्री.कंवलसींग चौहाण, डॉ.सी.डी.मायी माजी कुलगुरू, श्री.राजू बारवाले आदी उपस्थित होते. दिनांक १३ डिसेंबर रोजी सदर परिषदेच्या समारोप कार्यक्रमास प्रमुख पाहुणे भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे माजी महासंचालक पद्मभुषण मा.डॉ.आर.एस.परोडा होते तर अध्यक्षस्थानी कुलगुरू मा.डॉ.इन्द्र मणि हे होते. व्यासपीठावर आयएसएसटीचे अध्यक्ष डॉ. एच.एस.गुप्ता, संशोधन संचालक डॉ.दत्तप्रसाद वासकर, आयोजन सचिव डॉ. के.एस. बेग, आयएआरआय विभाग प्रमुख डॉ.शिव के यादव आदींची प्रमुख उपस्थिती होती. परिषदेत उत्तम सादरीकरण करणाऱ्या स्पर्धकांना यावेळी गौरविण्यात आले. तीन दिवसीय सदर परिषदेस देशभरातील शास्त्रज्ञासह आंतरराष्ट्रीय पातळीवरील संशोधक, बियाणे उद्योजक, प्रगतशील शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपन्याचे प्रतिनिधी, संशोधक विद्यार्थी आदींनी सहभाग नोंदविला होता. परिषदेमध्ये एकुण सहा तांत्रिक सत्रांमध्ये व तीन समुह चर्चा सत्रांमध्ये बियाणे विषयक विविध विषयांवर संशोधन व तंत्रज्ञाना संबंधी शास्त्रज्ञांचे सादरीकरण व चर्चा झाली.



## विद्यापीठ शास्त्रज्ञाची कार्यशाळा, सभा इत्यादी कार्यक्रमास उपस्थित राहिल्याचे विवरण २०२३

| अ. क्र. | नांव | कार्यशाळा/सभा/प्रशिक्षण | ठिकाण | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | डॉ. एस. बी. बोरगांवकर | वार्षिक बैठक | लुधियाना | ६-७ एप्रिल, २०२३ |
| २ | डॉ. के. के. डाखोरे | बैठक | आनंद | १० एप्रिल, २०२३ |
| ३ | डॉ. के. के. डाखोरे | सभा | हैद्राबाद | १२ एप्रिल, २०२३ |
| ४ | डॉ. एस. एम. उमाटे | वार्षिक बैठक | पंतनगर | १२-१४ एप्रिल, २०२३ |
| ५ | डॉ. ए. के. गोरे | परिसंवाद | नाशिक | २७ एप्रिल, २०२३ |
| ६ | डॉ. पी. एच. गौरखेडे | परिसंवाद | नाशिक | २७ एप्रिल, २०२३ |
| ७ | डॉ. एम. जी. पाटील | परिसंवाद | नाशिक | २७ एप्रिल, २०२३ |
| ८ | डॉ. के. एस. बेग | वार्षिक बैठक | कोईंबतुर | ०९-१० मे, २०२३ |
| ९ | डॉ. ए. एम. मिसाळ | वार्षिक बैठक | कोईंबतुर | ०९-१० मे, २०२३ |
| १० | डॉ. आर. आर. धुतमल | वार्षिक बैठक | कोईंबतुर | ०९-१० मे, २०२३ |
| १ | डॉ. एम. जी. पाटील | वार्षिक बैठक | कोईंबतुर | ०९-१० मे, २०२३ |
| १२ | डॉ. एम. पी. वानखेडे | वार्षिक बैठक | कोईंबतुर | ०९-१० मे, २०२३ |
| १३ | डॉ. एस. पी. म्हेत्रे | वार्षिक बैठक | ग्वाल्हेर | १६-१७ मे, २०२३ |
| १४ | डॉ. के. के. डाखोरे | प्रशिक्षण | नवी दिल्ली | २२-२५ मे, २०२३ |
| १५ | डॉ. एम. व्ही. धुप्पे | वार्षिक बैठक | जुनागड | २४-२६ मे, २०२३ |
| १६ | डॉ. के. डी. दहिफळे | वार्षिक बैठक | जुनागड | २४-२६ मे, २०२३ |
| १७ | डॉ. डी. पी. देशपांडे | वार्षिक बैठक | जुनागड | २४-२६ मे, २०२३ |
| १८ | डॉ. के. के. डाखोरे | परिसंवाद | मुंबई | २६-२७ मे, २०२३ |
| १९ | डॉ. एम. व्ही. धुप्पे | वार्षिक बैठक | जोधपूर | ३१ मे - ०३ जुन, २०२३ |
| २० | डॉ. एस. पी. पोले | वार्षिक बैठक | जोधपूर | ३१ मे - ०३ जुन, २०२३ |
| २१ | डॉ. ए. के. घोटमुकळे | वार्षिक बैठक | जोधपूर | ३१ मे - ०३ जुन, २०२३ |
| २२ | डॉ. के. डी. दहिफळे | वार्षिक बैठक | जोधपूर | ३१ मे - ०३ जुन, २०२३ |
| २३ | डॉ. एस. व्ही. वाघमारे | वार्षिक बैठक | जोधपूर | ३१ मे - ०३ जुन, २०२३ |
| २४ | डॉ. व्ही. एस. खंदारे | वार्षिक बैठक | श्रीनगर | ०३-०५ जुन, २०२३ |
| २५ | डॉ. ए. टी. दौंडे | वार्षिक बैठक | श्रीनगर | ०३-०५ जुन, २०२३ |
| २६ | डॉ. सी. बी. लटपटे | परिसंवाद | श्रीनगर | ०९-१० जुन, २०२३ |
| २७ | डॉ. डी. एन. मोहोड | परिसंवाद | श्रीनगर | ०९-१० जुन, २०२३ |
| २८ | डॉ. एस. सी. बोकन | परिसंवाद | श्रीनगर | ०९-१० जुन, २०२३ |
| २९ | डॉ. डी. डी. पटाईत | परिसंवाद | श्रीनगर | ०९-१० जुन, २०२३ |
| ३० | डॉ. एस. एस. धुरगुडे | परिसंवाद | श्रीनगर | ०९-१० जुन, २०२३ |
| ३१ | डॉ. एम. जी. पाटील | परिसंवाद | श्रीनगर | ०९-१० जुन, २०२३ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३२ | डॉ. एल.एन. जावळे | वार्षीक बैठक | हैद्राबाद | १०-११ जुलै, २०२३ |
| ३३ | डॉ. मोहम्मद ईलीयास | वार्षीक बैठक | हैद्राबाद | १०-११ जुलै, २०२३ |
| ३४ | डॉ. के.डी. नवगीरे | वार्षीक बैठक | हैद्राबाद | १०-११ जुलै, २०२३ |
| ३५ | डॉ. पी.ओ.भुतडा | वार्षीक बैठक | हैद्राबाद | १०-११ जुलै, २०२३ |
| ३६ | डॉ. ए.बी. बागडे | वार्षीक बैठक | हैद्राबाद | १०-११ जुलै, २०२३ |
| ३७ | डॉ. एस. बी. पवार | वार्षीक बैठक | हैद्राबाद | १०-११ जुलै, २०२३ |
| ३८ | डॉ. एच. एच. भदर्गे | वार्षीक बैठक | हैद्राबाद | १०-११ जुलै, २०२३ |
| ३९ | डॉ. सी. बी. पाटील | वार्षीक बैठक | हैद्राबाद | १०-११ जुलै, २०२३ |
| ४० | डॉ. डी. जी. हिंगोले | वार्षीक बैठक | हैद्राबाद | १०-११ जुलै, २०२३ |
| ४१ | डॉ. एस. बी. पवार | कार्यशाळा | परभणी | ०७-०८ ऑगस्ट, २०२३ |
| ४२ | डॉ. के. एस. बेग | कार्यशाळा | परभणी | ०७-०८ ऑगस्ट, २०२३ |
| ४३ | डॉ. डब्ल्यु. एन. नारखेडे | कार्यशाळा | परभणी | ०७-०८ ऑगस्ट, २०२३ |
| ४४ | डॉ. एस. एन. सोलंकी | कार्यशाळा | परभणी | ०७-०८ ऑगस्ट, २०२३ |
| ४५ | डॉ. एस. पी. म्हेत्रे | कार्यशाळा | परभणी | ०७-०८ ऑगस्ट, २०२३ |
| ४६ | डॉ. एस. बी. घुगे | कार्यशाळा | परभणी | ०७-०८ ऑगस्ट, २०२३ |
| ४७ | डॉ. व्ही. एस. खंदारे | कार्यशाळा | परभणी | ०७-०८ ऑगस्ट, २०२३ |
| ४८ | डॉ. डी. के. पाटील | कार्यशाळा | परभणी | ०७-०८ ऑगस्ट, २०२३ |
| ४९ | डॉ. एल.एन. जावळे | कार्यशाळा | परभणी | ०७-०८ ऑगस्ट, २०२३ |
| ५० | डॉ. एम.व्ही. धुप्पे | कार्यशाळा | परभणी | ०७-०८ ऑगस्ट, २०२३ |
| ५१ | डॉ. एस. एम उमाटे | कार्यशाळा | परभणी | ०७-०८ ऑगस्ट, २०२३ |
| ५२ | डॉ. एच. डब्ल्यु. आवारी | कार्यशाळा | परभणी | ०७-०८ ऑगस्ट, २०२३ |
| ५३ | डॉ. एम. एस. पेंडेके | कार्यशाळा | परभणी | ०७-०८ ऑगस्ट, २०२३ |
| ५४ | डॉ. पी. एच. गौरखेडे | कार्यशाळा | परभणी | ०७-०८ ऑगस्ट, २०२३ |
| ५५ | डॉ. जी. के. गायकवाड | कार्यशाळा | परभणी | ०७-०८ ऑगस्ट, २०२३ |
| ५६ | डॉ. एस. जी. पाटील | कार्यशाळा | परभणी | ०७-०८ ऑगस्ट, २०२३ |
| ५७ | डॉ. ए.बी. बागडे | कार्यशाळा | परभणी | ०७-०८ ऑगस्ट, २०२३ |
| ५८ | डॉ. आर. आर. धुतमल | कार्यशाळा | परभणी | ०७-०८ ऑगस्ट, २०२३ |
| ५९ | डॉ. पी. व्ही. पडघन | कार्यशाळा | परभणी | ०७-०८ ऑगस्ट, २०२३ |
| ६० | डॉ. बी. व्ही. भेदे | कार्यशाळा | परभणी | ०७-०८ ऑगस्ट, २०२३ |
| ६१ | डॉ. सुजाता पवार | प्रशिक्षण | मिरत | १०-३० ऑगस्ट, २०२३ |
| ६२ | डॉ. पी. एच. गौरखेडे | परिसंवाद | बारामती | २२-२३ ऑगस्ट, २०२३ |
| ६३ | डॉ. एल.एन. जावळे | परिसंवाद | बारामती | २२-२३ ऑगस्ट, २०२३ |
| ६४ | डॉ. पी.ओ.भुतडा | परिसंवाद | बारामती | २२-२३ ऑगस्ट, २०२३ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६५ | डॉ. एस. एम उमाटे | वार्षीक बैठक | उदयपूर | २८-३० ऑगस्ट, २०२३ |
| ६६ | डॉ. के. टी. जाधव | वार्षीक बैठक | राहुरी | ०१-०३ सप्टेंबर, २०२३ |
| ६७ | डॉ. डी. के. पाटील | वार्षीक बैठक | राहुरी | ०१-०३ सप्टेंबर, २०२३ |
| ६८ | डॉ. पी. एल. सोनटक्के | वार्षीक बैठक | राहुरी | ०१-०३ सप्टेंबर, २०२३ |
| ६९ | डॉ. एस. बी. घुगे | वार्षीक बैठक | रायपूर | ०४-०६ सप्टेंबर, २०२३ |
| ७० | डॉ. सी. व्ही. अंबाडकर | वार्षीक बैठक | रायपूर | ०४-०६ सप्टेंबर, २०२३ |
| ७१ | डॉ. एस. ए. शिंदे | वार्षीक बैठक | रायपूर | ०४-०६ सप्टेंबर, २०२३ |
| ७२ | डॉ. व्ही. आर. घुगे | वार्षीक बैठक | रायपूर | ०४-०६ सप्टेंबर, २०२३ |
| ७३ | डॉ. ए.बी. बागडे | प्रशिक्षण | हैद्राबाद | ०७-२७ सप्टेंबर, २०२३ |
| ७४ | डॉ. एम. पी. वानखडे | प्रशिक्षण | नवी दिल्ली | १८-३० सप्टेंबर, २०२३ |
| ७५ | डॉ.एच.डब्ल्यु.आवारी | परिसंवाद | औरंगाबाद | ०२-०३ ऑक्टोबर, २०२३ |
| ७६ | डॉ.के.के.डाखोरे | परिसंवाद | औरंगाबाद | ०२-०३ ऑक्टोबर, २०२३ |
| ७७ | डॉ.एस.टी.शिराळे | सभा | भोपाळ | ०३-०६ ऑक्टोबर, २०२३ |
| ७८ | डॉ.आर.एन.खंदारे | सभा | भोपाळ | ०३-०६ ऑक्टोबर, २०२३ |
| ७९ | डॉ.एस.ए.शिंदे | सभा | सापुतारा, डांग | १२-१४ ऑक्टोबर, २०२३ |
| ८० | डॉ.एस.एन.सोळंकी | परिसंवाद | रायचुर | ०६-०८ नोव्हेंबर, २०२३ |
| ८१ | डॉ.के.के.डाखोरे | वार्षिक बैठक | पालमपूर | १९-२२ नोव्हेंबर, २०२३ |
| ८२ | डॉ.पी.ए.पगार | परिसंवाद | गोवा | २२-२४ नोव्हेंबर, २०२३ |
| ८३ | डॉ.के.एस.बेग | बैठक | मुंबई | ०६-०८ डिसेंबर, २०२३ |
| ८४ | डॉ.व्ही.एन.चिंचाणे | बैठक | मुंबई | ०६-०८ डिसेंबर, २०२३ |
| ८५ | डॉ.ए.डी.पांडागळे | बैठक | मुंबई | ०६-०८ डिसेंबर, २०२३ |
| ८६ | डॉ.व्ही.आर.घुगे | सभा | औरंगाबाद | ११-१३ डिसेंबर, २०२३ |
| ८७ | डॉ.पी.ए.पगार | सभा | औरंगाबाद | ११-१३ डिसेंबर, २०२३ |
| ८८ | डॉ.आर.व्ही.नैनवाड | सभा | औरंगाबाद | ११-१३ डिसेंबर, २०२३ |
| ८९ | डॉ.पी.एल.सोनटक्के | सभा | औरंगाबाद | ११-१३ डिसेंबर, २०२३ |
| ९० | डॉ.आर.एस.जाधव | सभा | औरंगाबाद | ११-१३ डिसेंबर, २०२३ |
| ९१ | डॉ.आर.एल.चव्हाण | सभा | औरंगाबाद | ११-१३ डिसेंबर, २०२३ |
| ९२ | डॉ.व्ही.आर.हिंगे | सभा | औरंगाबाद | ११-१३ डिसेंबर, २०२३ |
| ९३ | डॉ.वाय.एस.भगत | सभा | औरंगाबाद | ११-१३ डिसेंबर, २०२३ |
| ९४ | डॉ.एल.एन.जावळे | सभा | औरंगाबाद | ११-१३ डिसेंबर, २०२३ |
| ९५ | डॉ.पी.ओ.भुतडा | सभा | औरंगाबाद | ११-१३ डिसेंबर, २०२३ |
| ९६ | डॉ.के.के.डाखोरे | सभा | औरंगाबाद | ११-१३ डिसेंबर, २०२३ |
| ९७ | डॉ.जी.के.गायकवाड | परिसंवाद | परभणी | २१-२२ डिसेंबर, २०२३ |
| ९८ | डॉ.एस.व्ही.धुतराज | परिसंवाद | परभणी | २१-२२ डिसेंबर, २०२३ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९९ | डॉ.एस.टी.शिराळे | परिसंवाद | परभणी | २१-२२ डिसेंबर, २०२३ |
| १०० | डॉ.ए.एल.धमक | परिसंवाद | परभणी | २१-२२ डिसेंबर, २०२३ |
| १०१ | डॉ.आर.एन.खंदारे | परिसंवाद | परभणी | २१-२२ डिसेंबर, २०२३ |
| १०२ | डॉ. के. डी. दहिफळे | प्रशिक्षण | हिसार | २४ जाने. - १३ फेब्रु. २०२४ |
| १०३ | डॉ. एम. ए. राऊत | प्रशिक्षण | आनंद | १८ जाने. ०७ फेब्रु. २०२४ |
| १०४ | डॉ. डी. के. पाटील | प्रक्षेत्र दिन | हैद्राबाद | ३०-३१ जानेवारी, २०२४ |
| १०५ | डॉ. व्ही. के. गीते | प्रक्षेत्र दिन | हैद्राबाद | ३०-३१ जानेवारी, २०२४ |
| १०६ | डॉ. एस. पी. कौसल्ये | वार्षिक बैठक | कर्जत | ०६-०७ फेब्रुवारी, २०२४ |
| १०७ | डॉ. ए. एच. राठोड | प्रशिक्षण | नवी दिल्ली | ०७-२७ फेब्रुवारी, २०२४ |
| १०८ | डॉ. के. के. डाखोरे | सभा | वाराणसी | ०८-१० फेब्रुवारी, २०२४ |
| १०९ | डॉ. व्ही. के. गीते | बैठक | भुवनेश्वर | १५-१६ फेब्रुवारी, २०२४ |
| ११० | डॉ. व्ही. एस. खंदारे | वार्षिक बैठक | अयोध्या | २२-२४ फेब्रुवारी, २०२४ |
| १११ | डॉ. ए. टी. दौंडे | वार्षिक बैठक | अयोध्या | २२-२४ फेब्रुवारी, २०२४ |
| ११२ | डॉ. के. के. डाखोरे | परिसंवाद | हैद्राबाद | २२ फेब्रु. - ०३ मार्च, २०२४ |
| ११३ | डॉ. डब्ल्यु. एन. नारखेडे | कार्यशाळा | जम्मु | ०४-०७ मार्च, २०२४ |
| ११४ | डॉ. अे. के. गोरे | कार्यशाळा | जम्मु | ०४-०७ मार्च, २०२४ |
| ११५ | डॉ. जी. आर. हनवते | कार्यशाळा | जम्मु | ०४-०७ मार्च, २०२४ |
| ११६ | डॉ. एस. एन. सोलंकी | सभा | अकोला | ०७-०८ मार्च, २०२४ |
| ११७ | डॉ. एस. पी. म्हेत्रे | वार्षिक बैठक | धारवाड | १३-१४ मार्च, २०२४ |
| ११८ | डॉ. आर. एस. जाधव | वार्षिक बैठक | धारवाड | १३-१४ मार्च, २०२४ |

## राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कार

### आंतरराष्ट्रीय पुरस्कार

- आंतरराष्ट्रीय हरित विद्यापीठ पुरस्कार २०२३, १५ सप्टेंबर २०२३ रोजी न्यूयॉर्कमध्ये
- डॉ. इंद्र मणी, मा. कुलगुरु यांना क्योटो, जपान येथे सीआयजीआर आंतरराष्ट्रीय परिषदेत आयएएबीई (यूएसए) ची फेलोशिप
- ISO १४००१ : २०१५ पर्यावरण व्यवस्थापन प्रणाली
- ISO २१००१:२०१८ प्रमाणित शैक्षणिक संस्था - व्यवस्थापन प्रणाली मानक
- ISO ५०००१ : २०१८ ऊर्जा बचत आणि खर्च प्रभावी विद्युत उपकरणे आणि उपकरणे

### राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त संशोधन केंद्रे

- अखिल भारतीय समन्वयीत बाजरा संशोधन प्रकल्प छ. संभाजीनगर यांना सर्वोत्तम संशोधन कार्य करणारे संशोधन केंद्र पुरस्कार प्राप्त.
- अखिल भारतीय समन्वयीत करडई संशोधन प्रकल्प, परभणी यांना सर्वोत्तम संशोधन कार्य करणारे संशोधन केंद्र पुरस्कार प्राप्त.
- अखिल भारतीय समन्वयीत तेलबिया संशोधन प्रकल्प, लातूर यांना सर्वोत्तम संशोधन कार्य करणारे संशोधन केंद्र पुरस्कार प्राप्त.
- कापूस संशोधन केंद्र, नांदेड यांना पीपीपी पुरस्कार प्राप्त झाला. कापूस संशोधन आणि देव असो., उदयपूर यांनी दिला.

# राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कार

## आंतरराष्ट्रीय पुरस्कार




आंतरराष्ट्रीय हरीत विद्यापीठ पुरस्कार - २०२३
न्युयॉर्क १५ सप्टेंबर, २०२३



जपान येथील आंतरराष्ट्रीय परीषदेत डॉ. इन्द्र मणि
मा.कुलगुरु यांना फेलोशिप

## राष्ट्रीय पुरस्कार




उत्कृष्ठ संशोधन केंद्र - करडई संशोधन केंद्र, परभणी




उत्कृष्ठ संशोधन केंद्र - गळीतधान्य संशोधन केंद्र, लातूर




एन.के. प्रोटीन पुरस्कार - कापूस संशोधन केंद्र, नांदेड




पाणी फाउंडशेन पुरस्कार - कापूस संशोधन केंद्र, नांदेड

# राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कार


















**राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त शास्त्रज्ञ**

- डॉ. के.एस.बेग यांना व्यावसायिक उत्कृष्टता पुरस्कार मिळाला. कापूस संशोधन आणि देव यांचा असोसिएशन, टडछत्रद्ध, उदयपूर
- डॉ.के.के.डाखोरे यांचा जिल्हा दंडाधिकारी, परभणी यांनी खरीप हंगामाच्या मध्यभागी झालेल्या नुकसानीचे विश्लेषण आणि प्रधानमंत्री विमा योजना योजनेंतर्गत शेतकऱ्यांना मोबदला मिळण्यासाठी उपयुक्त असलेल्या प्रॉक्सी इंडिकेटरची गणना केल्याबद्दल सत्कार व कौतुक केले.
- स्प्रिंगर नेचर ९णढ सर्वोत्कृष्ट पेपर पुरस्कार २०२३: ''कॉटन लीफ कर्ल मुलतान व्हायरसचे रीकॉम्बिनंट व्हेरियंट वायव्य भारतातील कॉटनमधील लीफ कर्ल रेझिस्टन्सच्या विघटनाशी संबंधित आहे'' या शीर्षकाच्या सर्वोत्कृष्ट पेपर प्रकाशनासाठी प्राप्त झाला आहे, सह-लेखक पी.के. चक्रवर्ती, आर.एल. चव्हाण, व्ही. कौंडल, डी. मोंगा, एच.आर. पप्पू, अनिर्बन रॉय आणि बी. मंडल यांनी ण९ड्टकटगट २०२३, डिसेंबर १-३, २०२३ दरम्यान जर्नल व्हायरस डिसीजमध्ये प्रकाशित केले.
- आर.एल. चव्हाण, व्ही.आर. यांनी सादर केलेल्या ''सीआरआयएसपीआर/कॅस बेस्ड डायग्नोसिस ऑफ सीड-बोर्न पॅथोजेन्सद्वारे बीज आरोग्याची खात्री'' या पेपरसाठी सर्वोत्कृष्ट पोस्टर सादरीकरण पुरस्कार. हिंगे, वाय.एस. भगत, एस. जायभाये, ए.एस. देशमुख, जे.ई.जहागीरदार आणि एच.बी. ११-१३ डिसेंबर २०२३ दरम्यान वनामकृवी, परभणी आणि इंडियन सोसायटी ऑफ सीड टेक्नॉलॉजी, नवी दिल्ली यांनी आयोजित केलेल्या ''बदलत्या हवामानात गुणवत्ता बियाणे उपलब्धतेतील नवकल्पना आणि आव्हाने'' या विषयावर १२ व्या राष्ट्रीय बियाणे काँग्रेस-२०२३ मध्ये पाटील.
- वाय.एस. भगत यांनी सादर केलेल्या ''शाश्वत शेतीसाठी पारंपारिक बियाणे वनस्पतींची ओळख, संकलन आणि संवर्धन'' या पेपरसाठी सर्वोत्कृष्ट पोस्टर सादरीकरण पुरस्कार. भगत, आर.एल.चव्हाण, व्ही.आर. हिंगे, एस.बी. जतुरे, ए. देशमुख, जे.ई. जहागीरदार आणि एच.बी. ११-१३ डिसेंबर २०२३ दरम्यान वनामकृवी, परभणी आणि इंडियन सोसायटी ऑफ सीड टेक्नॉलॉजी, नवी दिल्ली यांनी आयोजित केलेल्या ''बदलत्या हवामानात गुणवत्ता बियाणे उपलब्धतेतील नवकल्पना आणि आव्हाने'' या विषयावर १२ व्या राष्ट्रीय बियाणे काँग्रेस-२०२३ मध्ये पाटील.
- एस.बी. जटूरे, पी.के. यांनी सादर केलेल्या ''जेनेटिक डायव्हर्सिटीचे मूल्यांकन आणि डाळिंबातील तांदूळ बॅक्टेरियल ब्लाइट रेझिस्टन्स जीन ॲनालॉग (प्युनिका ग्रॅनॅटम एल) या विषयावरील पेपरसाठी सर्वोत्कृष्ट पोस्टर सादरीकरण पुरस्कार. जाधव, ए.एस. १९-२० ऑक्टोबर २०२३ दरम्यान जैवतंत्रज्ञान विभाग, कटकढ९ढ, लातूर द्वारे आयोजित ''शाश्वत शेती आणि आरोग्यासाठी कार्यात्मक उत्पादनांच्या जैव-उत्पादनातील प्रगती'' या विषयावरील राष्ट्रीय परिषदेत देशमुख, आर.एल. चव्हाण आणि व्ही.आर. हिंगे.
- पी.के. जाधव यांनी सादर केलेल्या ''नॅचरल इन्सिडेन्स ऑफ मुंग बीन येलो मोझॅक व्हायरस (टज्ञऑटण) ट्रिगरिंग एपिडेमिक ऑफ यलो मोझॅक डिसीज ऑफ सोयाबीन मराठवाडा रिजन ऑफ महाराष्ट्र या शीर्षकाच्या पेपरसाठी द्वितीय सर्वोत्कृष्ट पोस्टर सादरीकरण पुरस्कार. जाधव, एस.बी. जुटूरे, डी.जे. वानखडे, आर.एल. चव्हाण आणि व्ही.आर. हिंगे ''शाश्वत शेती आणि आरोग्यासाठी कार्यात्मक उत्पादनांच्या जैव-उत्पादनातील प्रगती'' या विषयावरील राष्ट्रीय परिषदेत, जैवतंत्रज्ञान विभाग, कटकढ९ढ, लातूर यांनी १९-२०२० ऑक्टोबर २०२३ दरम्यान आयोजित केले होते.
- डॉ. रणजित चव्हाण यांना कृषी आणि पर्यावरण विकास सोसायटी, उत्तराखंड, भारत कडून २०२३ चा सर्वोत्कृष्ट शिक्षक पुरस्कार मिळाला.
- डॉ.रणजीत चव्हाण यांना कृषी महाविद्यालय पुणे येथे आविष्कार मेंटॉर २०२३ हा पुरस्कार मिळाला.
- डॉ. ज्योती झिरमिरे यांना १९ मे २०२३ रोजी सर्वोत्कृष्ट पोस्टर सादरीकरण (प्रथम क्रमांक) प्रवरा ग्रामीण अभियांत्रिकी महाविद्यालय लोणी, महाराष्ट्र आणि चेसा (केमिकल अभियांत्रिकी विद्यार्थी संघटना) मिळाले.
- आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या पूर्वसंध्येला, डॉ. एस.एन. सोळंकी, ड९, छऋक, णगटटण परभणी यांचा माननीय कुलगुरू डॉ. इंद्रा मणी, वनामकृवी, परभणी आणि जि. जिल्हाधिकारी माननीय श्रीमती. आंचल गोयल यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.
- डॉ. स्मिता सोलंकी यांना इनस्पिरेशन पुरस्कार-२०२३ प्राप्त झाला.
- डॉ. स्मिता सोलंकी यांना प्राणी मित्र पुरस्कार - २०२२ प्राप्त झाला.
- डॉ. सी. व्ही. अंबाडकर यांना राज्यस्तरीय उत्कृष्ट शिक्षक-२०२३ पुरस्कार प्राप्त झाला.

- डॉ. एम. जी. पाटील यांना पर्यावरण सुरक्षा पुरस्कार-२०२३ श्रीनगर येथे प्राप्त झाला.
- डॉ. एस. ए. शिंदे यांना उत्कृष्ट भित्ती पत्रक सादरीकरण पुरस्कार- २०२३ प्राप्त झाला.
- श्री. डी. एन. मोहोड यांना तरुण कृषि किटक शास्त्रज्ञ पुरस्कार-२०२३ प्राप्त झाला.
- डॉ. एस. सी. बोकण यांना तरुण शास्त्रज्ञ पुरस्कार-२०२३ प्राप्त झाला.
- डॉ. ए. एल. धमक यांना उत्कृष्ट शास्त्रज्ञ पुरस्कार-२०२ प्राप्त झाला.
- डॉ. एस. पी. झाडे यांना तरुण महिला शास्त्रज्ञ पुरस्कार-२०२३ प्राप्त झाला.
- डॉ. एस. बी. जाधव यांना उत्कृष्ट संशोधन प्रबंध पुरस्कार-२०२३ प्राप्त झाला.
- डॉ. व्ही. के. इंगळे यांना उत्कृष्ट सादरीकरण पुरस्कार - २०२३ प्राप्त झाला.
- डॉ. एच.डब्ल्यु. अवारी यांना उत्कृष्ट सादरीकरण पुरस्कार - २०२३ प्राप्त झाला.
- डॉ. जी. यु. शिंदे यांना आंतरराष्ट्रीय हरित शिक्षक पुरस्कार - २०२३ प्राप्त झाला.
- डॉ. जी. यु. शिंदे यांना उत्कृष्ट भित्ती पत्रक सादरीकरण पुरस्कार प्राप्त झाला.

## सामंजस्य करार

१. वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी आणि महिको प्रा. लि. यांच्यात दिनांक २६ जून, २०२३ रोजी सामंजस्य करार संपन्न झाला. करारावर मा. कुलगुरू डॉ. इन्द्र मणि व महिकोचे अध्यक्ष श्री. राजेंद्र बारवाले यांच्या प्रमुख उपस्थितीत स्वाक्षरी करण्यात आली. यावेळी संशोधन संचालक डॉ. दत्तप्रसाद वासकर, डॉ. चंद्रशेखर चापोरकर, डॉ. भारत चार, डॉ. खिजर बेग, डॉ. गजेंद्र लोंढे, डॉ. मदन पेंडके, डॉ. माधवी आदींची उपस्थिती होती. सामंजस्य कराराच्या माध्यमातुन पिकांचे विविध वाण, भाजीपाला, फळपिके व इतर कृषि संशोधनाकरिता एकत्रितरित्या कार्य करण्यात येणार आहे. मार्गदर्शनात मा. कुलगुरु म्हणाले की, कृषि विकासाकरिता शासन, कृषि विद्यापीठ आणि कृषि उद्योग यांनी एकत्रित कार्य करण्याची गरज आहे. कृषि उद्योगास लागणारे मनुष्यबळ कृषि विद्यापीठात निर्माण होते, त्यामुळे कृषि उद्योग क्षेत्राच्या कुशल मनुष्यबळाची गरज लक्षात घेऊन विद्यार्थी दशेतच त्यांना प्रशिक्षीत करता येईल, त्या दृष्टीने हा सामंजस्य करार महत्वाचा आहे. श्री. राजेंद्र बारवाले म्हणाले की, परभणी कृषि विद्यापीठ कृषि उद्योजकांना सोबत घेऊन कार्य करत आहे, ही एक चांगली बाब असुन शेतकरी बांधवाच्या शेतीचे उत्पादन वाढीकरिता एकत्रित कार्य करण्यात येणार आहे. संशोधन संचालक डॉ. दत्तप्रसाद वासकर म्हणाले की, जनुकीय परावर्तीत पिकांचे वाणांचे प्रयोग महिको कंपनीच्या माध्यमातुन घेतले असुन परभणी कृषी विद्यापीठाने नवीन तंत्रज्ञान विकसित करण्याकरिता पुढाकार घेतला आहे.



२. वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ आणि ग्लोबल विकास ट्रस्ट, सिरसाळा, परळी, यांच्यात दिनांक १४ जुलै, २०२३ रोजी मा.कुलगुरू डॉ.इन्द्र मणि आणि ट्रस्टचे मुख्य विश्वस्थ मा. श्री. मयंक गांधी यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार झाला. यावेळी शिक्षण संचालक डॉ. धर्मराज गोखले, संशोधन संचालक डॉ. दत्तप्रसाद वासकर, विस्तार शिक्षण संचालक डॉ. देवराव देवसरकर, प्राचार्य डॉ. सय्यद इस्माईल, डॉ. डी एस मिश्रा, श्री. श्याम पम्मी, श्रीमती मिनल गांधी, ट्रस्टचे विश्वस्थ डॉ. हरिश्चंद्र वांगे, डॉ. हिराकांत काळपांडे आदींची उपस्थिती होती. मार्गदर्शनात मा. कुलगुरू म्हणाले की, माती व जल संवर्धन अत्यंत आवश्यक असुन रासायनिक किटकनाशके व खतांचा अनियंत्रित वापर टाळुन शेतीत अधिकाधिक उत्पादनापेक्षा शाश्वत उत्पादन प्राप्त करण्यावर भर देण आवश्यक आहे. मा. श्री. मयंक गांधी म्हणाले की, महाराष्ट्रातील नैराश्यग्रस्त शेतकरी बांधवाना प्रेरणा देऊन त्यांच्या आर्थिक उन्नतीकरीता ग्लोबल विकास ट्रस्ट कार्य करीत आहे. ट्रस्टच्या प्रयत्नामुळे आज अनेक शेतकऱ्यांच्या उत्पन्नात दुप्पटीने वाढ झाल्याचे दिसुन येत आहे. हे कार्य विद्यापीठाच्या तांत्रिक पाठबळाने पुढे नेण्यास मदत होणार आहे. सदर ट्रस्टचे कृषिकुल केंद्रात माती विश्लेषण प्रयोगशाळा, वनस्पती रोगशास्त्र प्रयोगशाळा, मायक्रोबियल कल्चरल प्रयोगशाळा, अन्न प्रक्रिया केंद्र, रेशीम उत्पादन केंद्र इत्यादींच्या स्थापनेसाठी तांत्रिक मार्गदर्शन विद्यापीठ तज्ञ करणार आहे. ट्रस्टच्या माध्यमातुन फळबाग लागवडीची माहिम राबवण्यात येत असुन याला संशोधनाची जोड देण्याचे कार्य विद्यापीठ करणारआहे.

३. वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी आणि नाशिक येथील मे. इनव्हेंटीव्ह सोल्युशन, नाशिक यांच्यात दिनांक २ सप्टेंबर, २०२३ रोजी सामंजस्य करार करण्यात आला. पशुशक्तीचा योग्य वापर योजनेच्या वतीने अल्प व मध्यम भुधारक शेतकरी बांधवाकरीता विकसित करण्यात आलेल्या कृषि अवाजारांच्या मोठया प्रमाणात मागणीचा विचार करून विद्यापीठ विकसित २३ कृषि अवजारे निर्मितीचे अधिकार मे. इनव्हेंटीव्ह सोल्युशन नाशिक यांना देण्यात आले आहेत. सामंजस्य कराराचा कार्यक्रम मा. कुलगुरू डॉ. इन्द्र मणि यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. याप्रसंगी संचालक संशोधन डॉ. दत्तप्रसाद वासकर, शिक्षण संचालक डॉ. धर्मराज गोखले, योजनेच्या प्रमुख डॉ. स्मिता सोळंकी, विभाग प्रमुख डॉ. राहुल रामटेके, इंजि.अजय वाघमारे, कृषि उद्योजक मे. इनव्हेंटीव्ह सोल्युशन नाशिकचे श्री. प्रशांत पवार व श्री. पवन राजेंद्र खर्डे, प्राचार्य डॉ. जया बंगाळे, प्राचार्य डॉ. राजेश क्षीरसागर, विभाग प्रमुख डॉ. दिगंबर पेरके आदींची उपस्थिती होती.

४. वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ आणि नवी दिल्ली येथील भारतीय कृषी संशोधन संस्था यांच्यात दिनांक २२ फेब्रुवारी, २०२४ रोजी कृषी शिक्षण, संशोधन आणि विस्तार शिक्षण कार्याकरिता सामजंस्य करार करण्यात आला. या करारावर भारतीय कृषी संशोधन संस्थेचे मा. संचालक डॉ. ए. के. सिंग आणि विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा.(डॉ.) इन्द्र मणि यांनी स्वाक्षरी केली. यावेळी डॉ. ए .के. सिंग म्हणाले की, परभणी कृषी विद्यापीठ निर्मित तुर, सोयाबीन, ज्वारी, बाजरी पिकांच्या अनेक वाण अत्यंत उपयुक्त आहेत. या सामंजस्य करारामुळे दोन्ही संस्थेतील संशोधनास मदत होणार आहे. यावेळी प्रा.(डॉ.) इन्द्र मणि म्हणाले की, भारतीय कृषी संशोधन संस्था ही देशातील एक अग्रगण्य संस्था असुन या करारामुळे परभणी कृषी विद्यापीठातील विद्यार्थी त्यांच्या संशोधनास मदत होणार आहे. दोन्ही संस्थेच्या माध्यमातुन अद्ययावत विषयावर विविध प्रकारचे अभ्यासक्रम एकत्रित राबविले जातील. शेतकऱ्यांच्या हितासाठी विविध तंत्रज्ञान व बियाणे यांचे देवाणघेवाण सोपे होईल. नाविन्यपूर्ण संशोधन प्रकल्प सुरू करण्याचा विद्यापीठाचा मानस असल्याचे ते म्हणाले. याप्रसंगी शिक्षण संचालक, डॉ. उदय खोडके, विस्तार शिक्षण संचालक, डॉ. धर्मराज गोखले, कुलसचिव, श्री. पी. के. काळे, प्राचार्य, डॉ राकेश आहिरे, डॉ. डी. के. पाटील, डॉ. एच. व्ही. काळपांडे, डॉ. डी. एस. पेरके, डॉ. किरण जाधव, डॉ. गोदावरी पवार आदींची उपस्थिती होती.



MoU with ICAR - IARI, New Delhi for PG, Ph.D. Education



PANI Foundation, Mumbai



ICAR-NBSS LUB, Nagpur

# सामंजस्य करार



ICAR - IISR, Lucknow




ICAR- IISS, MAU



CIRCOT, Mumbai



NDUAT, Ayodhya



MoU with GIZ Germany for Agri - PV Project



MGM, University



Wow Green, New Delhi

**प्रस्तावना :**

कृषि विद्यापीठात होणारे नविन संशोधन शेतक-यांपर्यंत पोंचविण्याचे कार्य विस्तार शिक्षण संचालनालयामार्फत विभागीय कृषि विस्तार शिक्षण केंद्र, कृषि विज्ञान  केद्र, विस्तार शिक्षण योजना व कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राद्वार करण्यात येते. विद्यापीठातील महाविद्यालये आणि संशोधन केंद्र ही विविध विस्तार उपक्रमाचे आयोजन करतात. तसेच या संचालनालयामार्फत आयोजित करण्यात आलेल्या विस्तार उपक्रमात सक्रिय सहभाग घेतात. शेतक-यांच्या शेतावर विद्यापीठाचे कृषि तंत्रज्ञान पोहचविणे व त्याबबातचे प्रत्याभरण जमा करणे हा यामागील प्रमुख उद्येश आहे.  छ.संभाजी नगर, लातूर, परभणी व अंबेजोगाई येथे असे एकूण ०४ विभागीय कृषि विस्तार शिक्षण केंद्रे कार्यरतआहेत. प्रत्येक विभागीय विस्तार शिक्षण केंद्राच्या कार्यक्षेत्रात मराठवाडा विभागातील दोन जिल्ह्याचा समावेश होतो. विस्तार शिक्षण योजना व कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र या योजना विद्यापीठ मुख्यालयी परभणी येथे कार्यरत आहेत. कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राच्या स्थापनेमुळे विद्यापीठ विकसित तंत्रज्ञाना बाबत माहिती व सल्ला सेवा, बी-बीयाणे, रोपे व कलमे, प्रकाशने, पीकांवरील कीड व रोगनिदान व इत्यादी सुविधा शेतक-यांसाठी एकाच छत्राखाली उपलब्ध झाल्या आहेत.

मराठवाडा विभागात १२ कृषि विज्ञान केंद्र कार्यरत असून त्यापैकी छ.संभाजी नगर, तुळजापूर जि.धाराशीव, खामगांव जि.बीड व बदनापूर जि.जालना येथील ४ कृषि विज्ञान केंद्र विद्यापीठामार्फत चालविली जातात तर उर्वरीत ८ कृषि विज्ञान केंद्र बिगर सरकारी संस्थामार्फत चालविली जातात. कृषि विज्ञानकेंद्र ही मुलभुत व्यवसायीक प्रशिक्षण संस्था असूनत्याचा मुळ उद्येश उपलब्ध असलेले आधुनीक तंत्रज्ञान व शेती उत्पादन वाढीसाठी त्याचा अवलंब यामधीलदरी भरूनकाढणे हा होय.  या केंद्रामार्फत विविध विस्तार उपक्रम आयोजीत केल्या जातात. जसेकृषि विकासा संबंधीत  विभाग आणि  सेवाभावी संस्थातील अधिकारी, कर्मचारीव विस्तार कर्मचा-यांना प्रशिक्षण, जिल्हा मासिकचर्चासत्र, शेतक-यांच्या शेतावर प्रक्षेत्र भेटी आणिनिदान चमुच्या भेटी, शेतकरी मेळावे, कृषि प्रदर्शने, शेतीदिन, पीक परिसंवाद, कार्यशाळा, गटचर्चा, पीक प्रात्यक्षिके, गुलाबी बोंड अळी नियंत्रण मोहिम, मक्यावरील लष्करी अळी नियंत्रण मोहिम,विद्यापीठ आपल्या दारी तंत्रज्ञान शेतावरी इत्यादी विस्तार उपक्रम आयोजीत केल्या जातात. कृषि विज्ञान केंद्रामार्फत शेतकरी, युवक, युवतीकरिता कौशल्याधारीत तसेच कृषि आधारीत जोडधंद्यांवर प्रशिक्षण कार्यक्रम आयोजीत केले जातात.

कृषि शास्त्रज्ञांनी पिकांच्यां तंत्रज्ञानाबाबत ध्वनीफिती, चलचित्रफिती, संदेश, पॉवर पॉइंट प्रझेन्टेशन तयार करुन ते युटयुब, फेसबुक, टिवटर, वॉटस ॲप, आकाशवाणी, दुरदर्शन इत्यादी माध्यमाद्वारे प्रसारीत करण्यात आले. फेसबुक, युटयुब, झुम, वेबेक्स, गुगलमीट या सामाजिक माध्यमांचा वापरकरून मोठया प्रमाणात ऑनलाईन (आभासी) प्रशिक्षण, शेतकरी मेळावे, गटचर्चा, परीसंवाद आयोजीतकरण्यात आले.

**उपलब्धी**

**१. प्रक्षेत्र भेटी/निदान चमू भेटी :** सन २०२३-२४ या वर्षातशेतक-यांचे प्रश्न सोडविण्यासाठी शेतक-यांच्या शेतावर शास्त्रज्ञ आणि विस्तार कार्यकर्ते यांच्या २९७४ प्रक्षेत्र भेटी, निदान चमू भेटी आयोजीत करण्यात आल्या. या भेटीमध्ये ३०५०० शेतक-यांच्या समस्यांचे निरसन करण्यात आले.

**२. शेतकरी मेळावे :** विद्यापीठ वर्धापनदिनानिमित्त दि.१८ मे, २०२३ रोजी खरीप पीक परिसंवाद, मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त दि.१७ सप्टेंबर, २०२३ रोजीरबी पीक परिसंवाद व सावित्रिबाई फुलेजयंतीनिमित्त दि.०३ जानेवारी, २०२४



रोजीमहिला शेतकरी मेळाव्याचे आयोजनकरण्यात आले. या परिसंवाद / मेळाव्यात ८७०० शेतकरी, महिला शेतकरी, उद्योजक आणि विस्तार कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदवीला. तसेच सन २०२३-२४ यावर्षात विद्यापीठांतर्गत विस्तार/संशोधन केंद्र, एकूण १३२ शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले/ सहभाग नोंदवीला.या मेळाव्यात ६५१४५शेतक-यांनी सहभाग नोंदविला.

**३. प्रशिक्षण :** सन २०२३-२४ या वर्षातकृषि विभागातील अधिकारी, शेतकरी, महिला शेतकरी, युवक-युवती, ग्रामीण कारागीर, उद्योजक, महिला बचतगट, बिगर संस्थांचे विस्तार कार्यकर्ते यांच्यासाठी गरजेनुरूप शेतीतंत्रज्ञान व शेतीवर आधारीतइतर पुरक व्यवसायावर ५०४ प्रशिक्षण आयोजीत करण्यात आले. यात १७६५० शेतकरी, महिला शेतकरी, युवक-युवती, उद्योजक, महिला बचतगट, यांना प्रशिक्षीत करण्यात आले.

**४. कृषि प्रदर्शन :** आधुनिक कृषि तंत्रज्ञान शेतक-यांपर्यंत पोहचविण्यासाठी विद्यापीठामार्फत कार्यक्षेत्रात कृषि प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. ही कृषि प्रदर्शने प्रामुख्याने विविध कार्यक्रम जसे, शेतकरी मेळावे, यात्रा, परीसंवाद इ.च्या निमित्ताने आयोजीत केली. विद्यापीठाच्या महाविद्यालये, संशोधन केंद्रे आणि विस्तार शिक्षण केंद्रांनी सन २०२३-२४ या वर्षातविविध संस्थामार्फत राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर आयोजीत केलेल्या एकूण ५१ कृषि प्रदर्शनात सहभाग नोंदविला. ६५५९०० शेतक-यांनी या कृषि प्रदर्शनाचा लाभ घेतला.

**५ जिल्हा मासीक चर्चासत्र :** सन २०२३-२४ या वर्षात ९६ जिल्हा मासीकचर्चासत्र आयोजीत करण्यात आले.यात६९७५अधिका-यांनी सहभाग नोंदविला.या चर्चासत्रात पुढील महिण्यासाठी कृषि विस्तार विषयीचे उपयुक्त संदेशतयारकरण्यात आले. सर्व कर्मचा-यासमवेत ६८८ शेतक-यांच्या शेतावर प्रक्षेत्र भेटी आयोजीतकरण्यात आल्या.

**६. कृषि संजीवनी सप्ताह :** महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा हरीतक्रांतीचे प्रणेते स्व.वसंतराव नाईक यांचा जन्मदिवस १ जुलै २०२३ कृषिदिन म्हणून साजराकरण्यात आला. या निमित्तानेमहाराष्ट्र शासनाने२५ जुनते १ जुलै २०२३ हा आठवडा ''कृषि संजिवनी सप्ताह'' म्हणून साजरा केला. कृषि तंत्रज्ञान शेतक-यांच्या थेट बांधावर पोहचविणे हा या सप्ताहाचा प्रमुख उद्येश होता. विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी कृषि विभागाच्या सहकार्याने शेतक-यांच्या शेतावर भेटी आयोजित करून शेतक-यांना मार्गदर्शन केले. विद्यापीठातील महाविद्यालये, संशोधन केंद्रे, विस्तार शिक्षण केंद्रे आणि कृषि विज्ञान केंद्रांनी सक्रिय सहभाग नोंदवून या आठवडयात एकूण १९५ कार्यक्रमाचे आयोजन केले. या उपक्रमाचा १७६५० शेतक-यांनी लाभ घेतला.




**खरीप पीक परिसंवाद - १८ मे २०२३**







**रबी पीक परिसंवाद - १७ सप्टेंबर २०२३**






**महिला शेतकरी मेळावा - ३ जानेवारी २०२४**

**७. गट चर्चा :** समान प्रश्नघेवून येणा-या शेतक-यांच्या गटासाठीसन २०२३-२४ या वर्षात ५४८ गटचर्चा आयोजीत करण्यात आल्या. गटचर्चेमध्ये ७८१५ शेतक-यांच्या समस्यांवर चर्चा करून शंका समाधान करण्यात आले.

**८. विद्यापीठ आपल्या दारी तंत्रज्ञान शेतावरी :** विस्तार शिक्षण संचालनालयाच्या वतीने सन २०२३-२४ या वर्षात विद्यापीठ आपल्या दारी तंत्रज्ञान शेतावरी हे अभियान राबविण्यात आले. आधुनिक कृषि तंत्रज्ञान सर्व शेतक-यांपर्यंत पोचंविणे हा या अभियानाचा प्रमुख उद्येश होता.  अभियान यशस्वीपणे राबविण्यासाठी व शेतक-यांना तांत्रिक माहिती देण्यासाठी विद्यापीठातील शास्त्रज्ञांचे चमू गठीत करण्यात आले. शास्त्रज्ञ आणि विस्तार कार्यकर्ते यांच्या १६० खेडेगावात भेटी आयोजीत करण्यात आल्या. या भेटीमध्ये ८२०० शेतक-यांच्या समस्याचे निरसन करण्यात आले.

**९. पीक संरक्षण अभियान :** गुलाबी बोंड अळी, मक्यावरील लष्करी अळी, हुमणी, शंखी गोगलगाय आणि सोयाबीनवरील पिवळा करपा रोग अशा महत्वाच्या  किड व रोगाच्या नियंत्रणाकरिता पीक संरक्षण अभियान राबविण्यातआले. मोहिमेत या कीडी व रोगाचा प्रार्दुर्भाव व त्यावरील उपाययोजना या बाबत शेतक-यांना अवगत करण्यासाठी विशेष विस्तार कार्यक्रम राबवण्यात आले. तसेच किटकनाशक फवारणी वेळी घ्यावयाच्या काळजीबाबत मार्गदर्शन करण्यात आले. सन २०२३-२४ यावर्षात १८०प्रक्षेत्र भेटी आयोजीत करण्यात आल्या. याचा ७७८२ शेतक-यांना लाभ झाला.

**१०. माझा एक दिवस माझ्या बळीराजासाठी उपक्रम :** कृषि व पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स व्यवसाय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे प्राप्त निर्देशानुसार मराठवाडा विभागात वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीच्या वतीने संपूर्ण मराठवाड्यात 'माझा एक दिवस माझ्या बळीराजासाठी' हा उपक्रम राबविण्यात आला. त्यानुषंगाने मा. कुलगुरू, वनामकृवि, परभणी यांच्या निर्देशानुसार हा कार्यक्रम विद्यापीठ स्तरावर प्रत्येक महिन्याच्या दुस-या बुधवारी नियमीतपणे राबविण्यात येत आहे. या मोहिमात विद्यापीठाच्या सन २०२३-२४ या वर्षात विद्यापीठ शास्त्रज्ञांनी वेगवेगळ्या ४९५ गावांना भेटी देऊन ६४०० शेतक-यांना मार्गदर्शन केले. या भेटी दरम्यान विद्यापीठाच्या तंत्रज्ञान प्रसारासोबतच शेतक-यांना भेडसावणा-या निरनिराळया अडचणीबाबत विचारणा करण्यात आली. मराठवाड्यातील विद्यापीठ अंतर्गत कृषी विज्ञान केंद्रे, संशोधन केंद्रे, कृषी महाविद्यालय यांच्या समन्वयाने हाउपक्रम राबविण्यात आला.






**११. कृषि विज्ञान केंद्रांची कार्यशाळा :** महाराष्ट्र, गुजरात आणि गोवा या राज्यातील कृषि विज्ञान केंद्रांची विभागीय कार्यशाळा दि.२३-२४ जूलै, २०२३ रोजी कृषि विज्ञान केंद्र, छ.संभाजी नगर येथे आयोजीत करण्यात आली.तसेच मराठवाडा विभागातील कृषि विज्ञान केंद्रांची कृती आराखडा कार्यशाळा दि.०७ मार्च, २०२४ रोजी विस्तार शिक्षण संचालनालय, परभणी येथे आयोजीत करण्यात आली. या कार्यशाळेत कृषि विज्ञान केंद्रांनी गत वर्षात राबविलेल्या विस्तार उपक्रमांचा अहवाल तसेच येणा-या वर्षात राबविण्यात येणा-या विस्तार उपक्रांचा कृति आराखडा सादर केला.



**१२. पश्चिम विभागीय कृषि मेळावा व प्रदर्शन २०२४ :** कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांच्या सहकार्यातून वनामकृवि, परभणी व कृषि विभाग, महाराष्ट्र शासन आणि आत्मा यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२१ ते २३ फेब्रुवारी, २०२४ या कालावधीत परभणी येथे पश्चिम विभागीय कृषि महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या महोत्सवात देशाच्या पश्चिम विभागातील महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, मध्यप्रदेश, छत्तीसगढ आणि गोवा ही सहा राज्य व दादरा नगर हवेली आणि दिव व दमन ही दोन केंद्रशासीत प्रदेश सहभागी झाले होते.



महोत्सवाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे कृषि मंत्री मा.धनंजय मुंढे यांच्या हस्ते दि.२१ फेब्रुवारी, २०२४ रोजी झाले. या प्रसंगी मा.श्री.पाशा पटेल, अध्यक्ष, महाराट्र कृषि मुल्य आयोग, श्रीमती फौजीया खान, राज्यसभा सदस्या, मा.सुरेशराव वडपुडकर, विधानसभा सदस्य, डॉ.व्ही.व्ही.सदामते, माजी सदस्य निती आयोग, मा.श्री.सुनिल मानसिंगका, मा.श्री.उपेंद्र लिमये, श्री.गिरीष कुलकर्णी, श्री.दादा लाड, श्री.राजीव मराठे, डॉ.विजय महाजन, डॉ.वाय.आर.मीना, डॉ.व्ही.एन. काळे आणि डॉ.आर.सी.गुप्ता हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगरु मा.डॉ.इंन्द्र मणि हे होते.




महोत्सवातील तीनही दिवशी तांत्रिक सत्रात विविध विषयावरील व्याखानाचे आयोजन करण्यात आले. या कृषि महोत्सवात भाकृअप परिषदेच्या संस्था, कृषि विद्यापीठे, कृषि विभाग, कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा, शासनाचे विकासात्मक विभाग, कृषि विज्ञान केंद्रे, कृषि विषयक निविष्ठा उत्पादक व वितरक कंपन्या, बचतगट, शेतकरी उत्पादक कंपन्या ईत्यांदींनी सहभाग नोंदविला. कृषि विषयक निविष्ठा, तंत्रज्ञान, कृषि अवजारे, अन्नप्रकिया, पशुधन यांच्या प्रदर्शन मांडणीकरिता ३०० दालनांची उभारणी करण्यात आली होती.







कार्यक्रमाचा समारोप दि.२३ फेब्रवारी, २०२४ रोजी मा.डॉ.इंन्द्र मणि, कुलगुरु, वनामकृवि, परभणी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. परभणी जिल्हयाचे जिल्हाधिकारी मा.श्री.रघुनाथ गावडे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.या प्रसंगी श्री.श्रीपाद खळीकर, सहसंचालक, कृषि विस्तार, श्री.भागवत देवसरकर, कार्यकारी परिषद सदस्य, डॉ.डी.एन.गोखले, संचालक, विस्तार शिक्षण, डॉ.यु.एम.खोडके, संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि), डॉ.डी.पी.वासकर, संचालक संशोधन, डॉ.डी.बी.देवसरकर, संचालक (बियाणे) हे उपस्थित होते. या महोत्सवात महाराष्ट्र राज्यातील व राज्याबाहेरील एक लाखाहून अधिक शेतक-यांनी लाभ घेतला.

**१३. शेतीदिन :** प्रगतशिल शेतक-यांच्या शेतावर, पीक प्रात्यक्षिके आयोजन केलेल्या ठिकाणी तसेच संशोधन केंद्राच्या प्रक्षेत्रावरसन २०२३-२४ या वर्षात ६८ शेतीदिन आयोजीत करण्यात आले.यात८७००शेतक-यांनी सहभाग नोंदविला.

**१४. पीक प्रात्यक्षीक :** वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाने विकसीत केलेल्या वाणांची गुणवत्ता दर्शविण्यासाठी पीक प्रात्यक्षिकंचे आयोजन करण्यात आले. ही पीक प्रात्यक्षिके विद्यापीठाच्या प्रक्षेत्रावर तसेच शेतक-यांच्या शेतावर आयोजीत करण्यात आल्या. सन २०२३-२४ या वर्षात एकूण १७९ पीक प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात आले. या पीक प्रात्यक्षिकांना १२५० शेतक-यांनी भेटी दिल्या.

**१५. आकाशवाणी/ दुरदर्शन कार्यक्रम :** सन२०२३-२४ या वर्षात शेती विषयक माहिती संकलीत करून ती १५८ आकाशवाणीच्या कार्यक्रमातून व ४९ दुरदर्शन व खाजगी केबल वाहिणीच्या माध्यमातून प्रसारीत करण्यात आली.

**१६. कृषि माहिती वाहिणी :** शेतक-यांनी विचारलेल्या प्रश्नांची कृषि माहिती वाहिणी मार्फत तात्काळ उत्तरे दुरध्वणीवरून दिली गेली. सन२०२३-२४ या वर्षात ३५०० हून अधिक शेतक-यांनी विचारलेल्या कृषि विषयक प्रश्नांची उत्तरे दुरध्वणीवरून दिली गेली.

**१७. कृषि प्रकाशने :** सन २०२३-२४ या वर्षात विद्यापीठामार्फत कृषि दैनंदिनी (३००० प्रती), कृषि दिनदर्शिका (१५०० प्रती), विविध विषयांवरील माहिती पुस्तीका (०५ प्रकाशने) व घडी पत्रिका (५२) प्रकाशित करण्यात आल्या आहेत. शेतीभाती हे मासीक (१२ मासीक) प्रकाशीत केले.

**१८. वर्तमानपत्रातून लेख प्रसिद्ध करणे :** विद्यापीठ शास्त्रज्ञाने विविध पिकांच्या तंत्रज्ञानावर आधारीत लिहिलेले लेख, संदेश, बातम्या यांना वर्तमानपत्रातून प्रसिद्धी देण्यात आली आहे.

**१९. शेतकरी-शास्त्रज्ञ मंच :** विस्तार शिक्षण संचालनालया अंतर्गत कृषि विज्ञान केंद्राद्वारे पीक पद्धती आणि पीक निहाय शेतकरी-शास्त्रज्ञ मंचाची प्रत्येक जिल्हयात स्थापना केली आहे. त्यात डाळींब उत्पादक गट, मोसंबी उत्पादक गट, केशर आंबा निर्यात गट, पुष्प उत्पादन गट, कापुस उत्पादन समुह, उस उत्पादन समुह, भाजीपाला उत्पादन समुह, सिताफळ उत्पादक गट यांचा समावेश आहे. या मंचाच्या माध्यमातुन शेतक-यांना शेतमाल विक्री, बाजारपेठा काढणी पश्चात तंत्रज्ञान मुल्यवर्धी या विषयी मार्गदर्शन करण्यात आले. तसेच शेतक-यांच्या संशोधन नियोजनात सहभाग घेतला गेला.

**२०. समाजमाध्यमे आणि माहिती तंत्रज्ञानाचा वापर :** कृषि तंत्रज्ञानाच्या प्रचारासाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर ही आवश्यक बाबत बनली आहे. कृषि तंत्रज्ञान विषयक चलचित्र फिती तयार करुन त्या युटयूब आणि फेसबुकवर उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. तसेच झुम, गुगल मीट, वेबेक्स, युटयुब आणि फेसबुक या समाजमाध्यमाचा प्रशिक्षण आणि परिसंवाद आयोजनाकरिता मोठया प्रमाणावर वापर करण्यात आला. तसेच व्हॉटस ॲपद्वारे संदेश पाठवून तंत्रज्ञान प्रसार करण्यात आला.विस्तार शिक्षण संचालनाअंतर्गत विस्तार केंद्रांनी झुम, वेबेक्स, गुगलमिट, युटयुब  आणि फेसबुकवर विविध विषयावरील वेबीनारचे आयोजन केले.

**२१. जिल्हा कृषि मौसम केंद्र :** विद्यापीठांतर्गत कृषि विज्ञानकेंद्र छ.संभाजी नगर व तुळजापूर येथे सन २०१९ पासून जिल्हा कृषि मौसम केंद्र कार्यरत आहेत. या कृषि विज्ञान केंद्रामार्फत दर मंगळवार व शुक्रवार रोजी शेतक-यांकरिता पोर्टल आणि व्हॉट्स ॲपद्वार हवामानाचा अंदाज प्रसारीत करण्यात येतो.४ लाखाहून अधिक शेतक-यांना हे संदेश नियमितपणे पाठविण्यात येतात.

**२२. जागतीक मृदा दिन :** विद्यापीठ व कृषि विज्ञान केंद्रामार्फत दि.०५ डिसेंबर, २०२३ रोजी जागतीक मृदा दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी जमीनीच्या आरोग्याबाबत जनजागृती कार्यक्रम आयोजीत करण्यात आले. या प्रसंगी शेतक-यांना त्यांच्या जमिनीचे मृदा आरोग्य पत्रिका वाटप करण्यात आल्या.

**२३. मोबाईल ॲप :** विविध पिकांच्या तंत्रज्ञानावर आधारीत ११ मोबाईल ॲप विकसीत करण्यात आलेले आहेत. सद्यस्थितीत कापूस, हळद, ज्वार, मोसबी, पिक संरक्षण, कोरडवाहू शेती तंत्रज्ञान, मुलद्रव्य व्यवस्थापन लिंबुवर्गीय फळपिके, तण व्यवस्थापन, कृषि दैनंदिनी आणि महिलांसाठी कृषि तंत्रज्ञान या विषयावर मोबाईल ॲप विकसीत करण्यात आले आहेत.

**२४. आंतरराष्ट्रीय भरडधान्य वर्ष :** सन २०२३ हे  वर्ष आंतरराष्ट्रीय भरडधान्य वर्ष म्हणून साजरे करण्यात आले. भरडधान्याचे उत्पादन आणि त्याचा मानवी आहारातील प्रमाण वाढविण्याच्या अनुषंगाने वर्षभर विविध उपक्रमाचे आयोजन करण्याचा आराखडा तयार करण्यात आला आहे. सन २०२३ या वर्षात एकूण १६५उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. यात १७५०० शेतकरी आणि महिलांनी सहभाग नोंदविला.












## गोगलगाय नियंत्रण अभियान

- मराठवाडा विभागात गोगलगाय नियंत्रण अभियान ७२,४९१ हे. क्षेत्रावर राबविण्यात आला.











**महाराष्ट्र, गुजरात आणि गोवा या राज्यातील कृषि विज्ञान केंद्रांची विभागीय कार्यशाळा**
**दि.२३-२४ जूलै, २०२३ रोजी कृषि विज्ञान केंद्र, छ.संभाजी नगर**














सीएनएच अंतर्गत उन्नत कौशल विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन




ॲडराईज इंडिया यांचेसोबत डिजीटल कृषि विस्तार कार्यक्रमासाठी सामंजस्य करार

# विद्यापीठ प्रशासन

## १. विद्यापीठ अधिकारी :

महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परिनियम, १९८३ मधील कलम १४ व परिनियम, १९९० नुसार वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी मधील सन २०२२-२३ या वर्षामध्ये कार्यकारी, विद्याविषयक व इतर अधिकारी खालीलप्रमाणे होते.

### १. कार्यकारी अधिकारी :

| | | |
|---|---|---|
| कुलपती | : | मा. श्री. रमेशजी बैस |
| प्रतिकुलपती | : | मा. श्री. धनंजय मुंढे |
| कुलगुरु | : | मा. डॉ. इन्द्र मणि |

### २ विद्याविषयक अधिकारी :

| अ.क्र. | पद | नाव |
|---|---|---|
| १ | संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि) | डॉ. उ. म. खोडके |
| २ | संचालक संशोधन | डॉ. जे. ई. जहागिरदार |
| ३ | संचालक विस्तार शिक्षण | डॉ. ध. नि. गोखले |
| ४ | कुलसचिव | डॉ. पु. को. काळे |
| ५ | नियंत्रक | श्री.प्र. धो. निर्मल |
| ६ | विद्यापीठ अभियंता | श्री. दिपक काशाळकर |

| सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य | | |
|---|---|---|
| १ | कृषि महाविद्यालय, परभणी | डॉ. सय्यद ईस्माईल |
| २ | अन्नतंत्र महाविद्यालय, परभणी | डॉ. आर.बी. क्षीरसागर |
| ३ | कृषि महाविद्यालय, लातूर | डॉ. बी.एम. ठोंबरे |
| ४ | कृषि महाविद्यालय, अंबाजोगाई | डॉ. एस.डी. बंटेवाड |
| ५ | कृषि महाविद्यालय, बदनापूर | डॉ. आर.डी. अहिरे |
| ६ | कृषि महाविद्यालय, उस्मानाबाद | डॉ. एम. बी. पाटील |
| ७ | कृषि महाविद्यालय, गोळेगांव | डॉ. बी.व्ही. आसेवार |
| ८ | कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, परभणी | डॉ. यु.एम. खोडके |
| ९ | सामुदायिक विज्ञान महाविद्यालय, परभणी | डॉ. जया बंगाळे |
| १० | कृषि जैवतंत्र महाविद्यालय, लातूर | प्रा. जे.ई. जहागीरदार |
| ११ | उद्यानविद्या, महाविद्यालय, परभणी | डॉ. व्हि. एस. खंदारे |
| १२ | कृषि विपणन व व्यवस्थापन संस्था, चाकूर | प्रा. आर. व्ही. चव्हाण |
| १३ | सहयोगी अधिष्ठाता, निम्न शिक्षण | डॉ. जी.के. लोंढे |

| विभाग प्रमुख - कृषि विद्या | | |
|---|---|---|
| १ | कृषि विद्या | डॉ. डब्ल्यु.एन. नारखेडे |
| २ | मृद विज्ञान व कृषि रसायन | डॉ. पी.एच. वैद्य |
| ३ | कृषीवनस्पती रोगशास्त्र | डॉ. एस. एल. बडगुजर |
| ४ | कृषि विस्तार शिक्षण | डॉ. आर.पी. कदम |
| ५ | कृषि वनस्पतीशास्त्र | डॉ. एच.व्ही. काळपांडे |
| ६ | कृषि कीटकशास्त्र | डॉ. पी.एस. नेहरकर |
| ७ | कृषि अर्थशास्त्र | डॉ. डी.एस. पेरके |
| ८ | उद्यानविद्या | डॉ. व्हि. एस. खंदारे |
| ९ | पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय | डॉ. जी.के. लोंढे |
| १० | कृषि अभियांत्रिकी | डॉ. आर.जी. भाग्यवंत |
| ११ | प्रभारी अधिकारी हवामान शास्त्र | डॉ. एम.जी. जाधव |
| **अन्नतंत्र शाखा** | | |
| १ | अन्न व औद्योगिक सुक्ष्मजीवशास्त्र विभाग | प्रा. हे.बा. देशपांडे |
| २ | अन्न अभियांत्रिकी शास्त्र | डॉ. रा.व.क्षीरसागर |
| ३ | अन्न व्यापार व व्यवसाय व्यवस्थापन विभाग | प्रा. व्ही.डी. सुर्वे |
| ४ | अन्न विज्ञान व तंत्रज्ञान विभाग | डॉ.विजया पवार |
| ५ | अन्न जीव रसायन व पोषणशास्त्र विभाग | डॉ. कै.स. गाढे |
| **सामुदायिक विज्ञान शाखा** | | |
| १ | मानव विकास व कौटुंबिक अभ्यास | डॉ. जया बंगाळे |
| २ | वस्त्र व परिधान अभिकल्पना विभाग | डॉ.सुनिता काळे |
| ३ | कौटुंबिक साधन संपत्ती व्यवस्थापन विभाग | डॉ. जयश्री रोडगे |
| ४ | अन्न विज्ञान व पोषण विभाग | डॉ. विना भालेराव |
| ५ | सामुदायीक विस्तार व संदेशवहन व्यवस्थापन विभाग | डॉ. एस. जी. पुरी |
| **कृषि अभियांत्रिकी शाखा** | | |
| १ | सिंचन व निचरा | डॉ. एच. डब्ल्यु. आवारी |
| २ | कृषि यंत्र व शक्ती | डॉ. स्मिता सोळंकी |
| ३ | मृद व जलसंधारण | प्रा. भा.वा. भुईभार |
| ४ | विद्युत यांत्रिकी आणि ऊर्जा | डॉ. रा.ता. रामटेके |
| ५ | काढणी पश्चात तंत्रज्ञान | डॉ.स्मिता खोडके |
| **इतर अधिकारी :** | | |
| १ | विद्यापीठ कल्याण अधिकारी | डॉ. पी. आर. झंवर |
| २ | उप कुलसचिव (परीक्षा) | डॉ. ग.अ. भालेराव |
| ३ | उप कुलसचिव (आस्था) | श्री. पु.कों. काळे |
| ४ | सहायक कुलसचिव (आस्था) | श्री. आर.व्ही. खोबे |
| ५ | विद्यापीठ ग्रथंपाल | डॉ. एस.डी. कदम |

## दिनांक ३१.३.२०२४ रोजीची संवर्ग निहाय मंजूर पदे, भरलेली पदे व रिक्त पदांची माहिती

### गोषवारा

| अ. क्र. | गट | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | अ | ५७५ | ३०० | २७५ |
| २ | ब | १९५ | १२२ | ७३ |
| ०२ पदे (कक्ष अधिकरी) शासन प्रतिनियुक्तीने भरलेली आहे. | | ०२ | ०२ | ०० |
| ३ | क | ७२९ | ३६७ | ३६२ |
| ४ | ड | १३८६ | ४१९ | ९६७ |
| एकूण | | २८८५ | १२०८ | १६७७ |

### गट अ

| अ.क्र. | पदाचे नाव | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | कुलगुरु | ०१ | ०१ | ०० |
| २ | संचालक | ०३ | ०० | ०३ |
| ३ | सहयोगी अधिष्ठाता | १२ | ०० | १२ |
| ४ | विभागप्रमुख | १० | ०३ | ०७ |
| ५ | प्राध्यापक | ४४ | २० | २४ |
| ६ | सहयोगी प्राध्यापक | १८३ | १०० | ८३ |
| ७ | कार्यक्रम समन्वयक | ०४ | ०२ | ०२ |
| ८ | सहाय्यक प्राध्यापक | २८४ | १४६ | १३८ |
| ९ | विषय विशेषज्ञ | २४ | २३ | ०१ |
| १० | कुलसचिव | ०१ | ०० | ०१ |
| ११ | नियंत्रक | ०१ | ०१ | ०० |
| १२ | विद्यापीठ अभियंता | ०१ | ०१ | ०० |
| १३ | उप- विद्यापीठ अभियंता | ०३ | ०० | ०३ |
| १४ | वैद्यकीय अधिकारी | ०१ | ०१ | ०० |
| १५ | विद्यार्थी कल्याण अधिकारी | ०१ | ०० | ०१ |
| १६ | उपकुलसचिव | ०२ | ०२ | ०० |
| | एकूण | ५७५ | ३०० | २७५ |

## गट ब

| अ.क्र. | संवर्ग | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | सुरक्षा व निगराणी अधिकारी | ०१ | ०१ | ०० |
| २ | सहाय्यक कुलसचिव/सहाय्यक नियंत्रक | १८ | १० | ०८ |
| ३ | सहाय्यक नियंत्रक शासन प्रतिनियुक्तीने | ०२ | ०२ | ०० |
| ४ | मा.कुलगुरु यांचे खाजगी सचिव/स्वीय सहाय्यक | ०२ | ०१ | ०१ |
| ५ | वरिष्ठ संशोधन सहाय्यक-कृषि | ६७ | ५० | १७ |
| ६ | वरिष्ठ संशोधन सहाय्यक-अन्नतंत्र | ०६ | ०१ | ०५ |
| ७ | वरिष्ठ संशोधन सहाय्यक जैवतंत्रज्ञान | ०४ | ०० | ०४ |
| ८ | वरिष्ठ संशोधन सहाय्यक-कृषि अभियांत्रीकी | ०१ | ०१ | ०० |
| ९ | पशुवैद्यकीय अधिकारी | ०१ | ०० | ०१ |
| १० | कार्यक्रम सहा-प्रयोगशाळा तंत्रज्ञ | ०४ | ०३ | ०१ |
| ११ | कार्यक्रम सहा-संगणक | ०४ | ०३ | ०१ |
| १२ | कार्यक्रम सहा-प्रक्षेत्र व्यवस्थापक | ०४ | ०३ | ०१ |
| १३ | कक्ष अधिकारी | २५ | १९ | ०६ |
| १४ | कक्ष अधिकारी शासन प्रतिनियुक्तीने | ०२ | ०० | ०२ |
| १५ | सहाय्यक कक्ष अधिकारी | २५ | १९ | ०६ |
| १६ | सहाय्यक अधिक्षक | ०४ | ०३ | ०१ |
| १७ | लघुलेखक | २१ | ०४ | १७ |
| १८ | तांत्रीक सहाय्यक | ०४ | ०२ | ०२ |
| एकूण | | १९५१२२७३ | | |

## गट क

| अ.क्र. | संवर्गाचे नाव | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ पशुवैद्यकीय अधिकारी | ०१ | ०० | ०१ |
| २ | कनिष्ठ संशोधन सहा.-कृषि | ७४ | ३९ | ३५ |
| ३ | कनिष्ठ अभियंता | ०६ | ०२ | ०४ |
| ४ | कार्यदेशक पर्यवेक्षक | ०१ | ०० | ०१ |
| ५ | पर्यवेक्षक गृहविज्ञान | ०१ | ०० | ०१ |
| ६ | आरेखक | ०१ | ०१ | ०० |
| ७ | वरिष्ठ यांत्रीक | ०२ | ०१ | ०१ |
| ८ | कनिष्ठ यांत्रीक | ०१ | ०० | ०१ |
| ९ | ट्रॅक्टर चालक | ०५ | ०० | ०५ |
| १० | वाहन चालक | ४२ | १३ | २९ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११ | ट्रक चालक | ०४ | ०२ | ०२ |
| १२ | के.व्ही.के.वाहन चालक | ०८ | ०५ | ०३ |
| १३ | कृषि सहाय्यक/तत्सम पदे | २८१ | १५० | १३१ |
| १४ | कृषि सहाय्यक (अभियांत्रिकी) | ०२३१ | ०० | ०२ |
| १५ | कृषि सहाय्यक (जैवतंत्रज्ञान) | ०२ | ०० | ०२ |
| १६ | प्रयोगशाळा सहाय्यक | १५ | ०० | १५ |
| १७ | फिल्डमन/तांत्रीक प्रशिक्षक | ०१ | ०१ | ०० |
| १८ | विजतंत्री | ०८ | ०० | ०८ |
| १९ | सुतार | ०३ | ०२ | ०१ |
| २० | कलाकार | ०२ | ०२ | ० |
| २१ | उप-आवेक्षक/तांत्रीक सहाय्यक | ५ | ०१ | ०४ |
| २२ | कॉप्युटर | ०१ | ०० | ०१ |
| २३ | प्रशिक्षित मॉन्टेसरी शिक्षक | ०१ | ०० | ०१ |
| २४ | प्रयोगशाळा सहाय्यक (गृह विज्ञान) | ०५ | ०० | ०५ |
| २५ | दुरध्वनी चालक | ०२ | ०० | ०२ |
| २६ | नळकारागीर | ०४ | ०२ | ०२ |
| २७ | मिस्त्री | ०१ | ०० | ०१ |
| २८ | बाष्पक सहाय्यक | ०१ | ०० | ०१ |
| २९ | संधाता | ०१ | ०१ | ०० |
| ३० | कातारी | ०१ | ०० | ०१ |
| ३१ | जोडारी | ०२ | ०० | ०२ |
| ३२ | दृकश्राव्य यंत्र चालक | ०२ | ०० | ०२ |
| ३३ | संगणक चालक/संगणक प्रोग्रामर | ०२ | ०१ | ०१ |
| ३४ | वरिष्ठ लिपीक | ६६ | ५७ | ०९ |
| ३५ | लघुटंकलेखक | ०४ | ०२ | ०२ |
| ३६ | लघुलेखक ग्रेड-३ | ०४ | ०१ | ०३ |
| ३७ | संगणक चालक | ०१ | ०० | ०१ |
| ३८ | कनिष्ठ लिपीक | १५७ | ८० | ७७ |
| ३९ | ग्रंथालय सहाय्यक | ०६ | ०३ | ०३ |
| ४० | रिप्रोग्राफीक सहायक | ०१ | ०० | ०१ |
| ४१ | मिश्रक | ०२ | ०१ | ०१ |
| | एकूण | ७२९ | ३६७ | ३६२ |

## गट ड

| अ.क्र. | संवर्गाचे नांव | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | प्रयोगशाळा सेवक | ५२ | १४ | ३८ |
| २ | मजुर | ९३८ | २९२ | ६४६ |
| ३ | पहारेकरी | १४९ | २९ | १२० |
| ४ | शिपाई | ११० | २६ | ८४ |
| ५ | गुराखी | ६ | ०० | ०६ |
| ६ | परिचर | ९ | १ | ८ |
| ७ | दोग्धा | ४ | १ | ३ |
| ८ | पुस्तक वाहक | १ | १ | ० |
| ९ | मिस्त्री | १ | ० | १ |
| १० | ड्रेसर | १ | ० | १ |
| ११ | फरास | १ | १ | ० |
| १२ | सफाई कामगार | २७ | ०८ | १९ |
| १३ | खानसामा | ३ | १ | २ |
| १४ | जमादार | १ | १ | ० |
| १५ | माळी | १९ | ०३ | १६ |
| १६ | रुखी/वाल्मीकी | ४ | २ | २ |
| १७ | पशुधन परिचर | १ | ० | १ |
| १८ | ग्रंथालय परिचर | ५ | १ | ४ |
| १९ | प्रयोगशाळा परिचर | ५४ | ३८ | १६ |
| | एकूण | १३८६ | ४१९ | ९६७ |

**विद्यापीठ प्राधिकरणे :** अहवाल कालावधीत विद्यापीठाची कार्यकारी परिषद, विद्या परिषद, संशोधन परिषद, विस्तार शिक्षण परिषद, विद्याशाखा व अभ्यास मंडळे या प्राधिकरणांच्या वेळोवेळी सभा घेण्यात आल्या.

**कार्यकारी परिषद :** अहवाल कालावधीत कार्यकारी परिषदेच्या एकूण ४ नियमित सभा झाल्या.

**विद्या परिषद :** अहवाल कालावधीत विद्या परिषदेच्या २ सभा झाल्या.

**कृषि संशोधन परिषद :** अहवाल कालावधीत कृषि संशोधन परिषदेची एक सभा घेण्यात आली.

**विस्तार शिक्षण परिषद :** अहवाल कालावधीत विस्तार शिक्षण परिषदेची एक सभा घेण्यात आली.

**विद्या शाखा :** विद्यापीठांतर्गत कृषि, मत्स्य आणि कृषि अभियांत्रिकी या तीन विद्याशाखा अहवालाच्या काळात कार्यरत होत्या.

**अभ्यास मंडळे :** अहवाल कालावधीत सर्व अभ्यास मंडळांच्या सभा नियमितपणे घेण्यात आल्या.

## Important Decisions taken by Executive Council of the University during 2023-24

### वनामकृवि, परभणी कार्यकारी परिषदेची २१० वी सभा दिनांक २३.५.२०२३

**पदव्युत्तर कृषि व्यवसाय व्यवस्थापन संस्था, चाकुर, जि.लातूर**

**विषय क्रमांक ३ :**

वनामकृवि, परभणी अंतर्गत विविध कार्यालयातील बिजोत्पादक कार्यक्रमाकरिता नवीन १५ नग ट्रॅक्टर GeM Portal वरून खरेदी करण्यास (प्रति ट्रॅक्टर दर रु. १०.०० लक्ष) प्रमाणे एकुण रक्कम रु. १.५० कोटी खर्चास प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत.
वनामकृवि, परभणी अंतर्गत विविध कार्यालयातील बिजोत्पादक कार्यक्रमाकरिता नवीन १५ नग ट्रॅक्टर क्र-ॽ घ्दृद्धद्यठ्ठथ वरून खरेदी करण्यास (प्रति ट्रॅक्टर दर रु. १०.०० लक्ष) प्रमाणे एकुण रक्कम रु. १.५० कोटी खर्चास प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव सचिवांनी सभेत सादर केला. सदर प्रस्तावावर चर्चा करुन कार्यकारी परिषदेने खालील ठराव पारीत केला.

**ठराव क्र.का-५०/२१०/२३.५.२०२३**

सूचक : डॉ. द.प्र.वासकर

अनुमोदक : मा.आ.श्री.अभिमन्यू पवार

ठराव करण्यात येतो की, विद्यापीठ सारसंग्रह दि. ०१.०७.२०१७ मधील अ.क्र. ०२ नुसार नवीन १५ नग ट्रॅक्टर खरेदीकरिता व (प्रति ट्रॅक्टर दर रु. १०.०० लक्ष प्रमाणे) येणारा अंदाजे अपेक्षित खर्च रक्कम रु. १.५० कोटीस कार्यकारी परिषद प्रशासकीय मान्यता देते.

तसेच, प्रशासकीय मंजूरी प्राप्त झाल्यानंतर सदरहू खरेदी GeM (Government E Market portal) वरुन करण्यात यावी व त्याकरिता GFR (General Financial Rules २०१७) मधील नियम क्र. १४९, केंद्रीय वित्त मंत्रालय, भारत सरकार सुधारणा (Amendment) क्र.एफ.१/२६/२०१८ -पीपीडी; दि. ९.०८.२०२१ अंतर्गत नियमावलीच्या अधीन राहून सर्व विहित कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात यावा. गठीत केलेल्या समितीद्वारे ट्रॅक्टर खरेदीचा खर्च आर्थिक वर्ष २०२३-२४ करिता मंजूर मेगा बीज परिभ्रमणकोष निधीमधून १.५० कोटीच्या मर्यादेत जेवढे ट्रॅक्टर येतील तेवढे खरेदी करण्यास कार्यकारी परिषद मान्यता देते व पुढील मान्यतेस्तव कृषि परिषदेस शिफारस करते.

ठराव सर्वानुमते मंजूर.

**विषय क्रमांक ४ :**

वनामकृवि, परभणी अंतर्गत विविध कार्यालयातील बिजोत्पादक कार्यक्रमाकरिता नवीन ४ नग कंबाएंड हार्वेस्टर (सयुंक्त कापणी व मळणी यंत्र) GeM Portal वरून खरेदी करण्यास एकुण रक्कम रु. १.५० कोटी खर्चास प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत.

वनामकृवि, परभणी अंतर्गत विविध कार्यालयातील बिजोत्पादक कार्यक्रमाकरिता नवीन ४ नग कंबाएंड हार्वेस्टर (संयुक्त कापणी व मळणी यंत्र) क्र GeM Portal वरून खरेदी करण्यास एकुण रक्कम रु.१.५० कोटी खर्चास प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव सचिवांनी सभेत सादर केला. सदर प्रस्तावावर सांगोपांग चर्चा होवून कार्यकारी परिषदेने खालील ठराव पारीत केला.

ठराव क्र.का-५१/२१०/२३.५.२०२३

सूचक : डॉ. द.प्र.वासकर

अनुमोदक : मा.आ.श्री.रमेश कराड

ठराव करण्यात येतो की, विद्यापीठ सारसंग्रह दि. ०१.०७.२०१७ मधील अ. क्र. ०२ नुसार नवीन ०४ नग कंबाएंड हार्वेस्टर खरेदी करण्याकरिता त्यास येणारा अंदाजे अपेक्षित खर्च रक्कम रु. १.५० कोटीस कार्यकारी परिषद प्रशासकीय मंजूरी देते.

तसेच, सदरहू खरेदी GeM ( Government E Market portal) वरुन करण्यात यावी. त्याकरिता GFR (General Financial Rules 2017)2017) मधील नियम क्र. १४९, केंद्रीय वित्त मंत्रालय, भारत सरकार सुधारणा (Amendment) क्र. एफ- १/२६/२०१८

पीपीडी; दि. ०९.०८.२०२१ अंतर्गत नियमावलीच्या अधीन राहून सर्व विहित कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात यावा. गठीत केलेल्या खरेदी समितीद्वारे कंबाएंड हार्वेस्टर खरेदीचा खर्च आर्थिक वर्ष २०२३-२४ करिता मंजूर मेगा बीज परिभ्रमणकोष निधीमधून करण्यास कार्यकारी परिषद मान्यता देते व पुढील मान्यतेस्तव कृषि परिषदेस शिफारस करते.

ठराव सर्वानुमते मंजूर.

**विषय क्रमांक ९ :**

मध्यवर्ती प्रक्षेत्र विभागाच्या अंशत : सीमावर्ती परिसरात ४ किलो मीटर x १०० मीटरचे क्षेत्र वन-विभागास घनवन लागवडीसाठी आवंटीत करण्यास प्रशासकीय मंजूरी मिळण्याबाबत. सचिवांनी सभेत नमूद केले की, विद्यापीठाच्या मध्यवर्ती प्रक्षेत्र विभागांतर्गत नव्याने १००० एकर लागवड योग्य शेतजमीन तयार करण्यात येत आहे. तसेच आगामी काळात प्रति वर्षी ५००-७०० एकर लागवड योग्य शेतजमीन तयार करावयाची आहे. सदरहू नवीन लागवड योग्य तयार करण्यात आलेल्या शेत जमिनी ह्या विद्यापीठाच्या सीमावर्ती परिघापर्यंत असून ह्या क्षेत्राला लागुनच शेंद्रा, इटलापूर, टाकळगव्हाण, परळगव्हाण, रायपुर, जुने बलसा इत्यादी गावांच्या सीमा आहेत. तरी उक्त नमूद गावांना लागून असलेल्या विद्यापीठ क्षेत्राचा सीमावर्ती परिसर अतिक्रमण व इतर संभाव्य समस्यांपासून सुरक्षित करण्यासाठी व वन विभागाच्या मागणी नुसार ४ किलो मीटर x १०० मीटरचे क्षेत्र वन विभागास देण्याचे प्रस्तावित आहे. सदर घनवन लागवड करण्यासाठी व घनवन पूर्णपणे विकसित होईपर्यंत त्याची सर्व देखभाल, ठिबक सिंचन, पहारा देणे इत्यादी सर्व कामे व अनुषंगिक खर्च वन विभाग करणार असून विद्यापीठाकडे कोणतेही दायित्व असणार नाही. घनवन लागवडी विविध फळ पिके व औषधी वनस्पती तसेच औद्योगिक दृष्ट्या महत्वाच्या वृक्षापासून विद्यापीठास महसूल उत्पन्न प्राप्त होईल.

सदर प्रस्तावावर चर्चा होवून कार्यकारी परिषदेने खालील ठराव पारीत केला.

ठराव क्र.का-५६/२१०/२३.५.२०२३

सूचक : डॉ. द.प्र.वासकर

अनुमोदक : मा.श्री.प्रविण देशमुख

ठराव करण्यात येतो की, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठांतर्गतमध्यवर्ती प्रक्षेत्र विभागाच्या अंशत: सीमावर्ती परिसरात ४ किलो मीटर x ५० मीटरचे क्षेत्र वन विभागास घनवन लागवडीसाठी देण्यात यावे. घनवन पूर्णपणे विकसित होईपर्यंत त्याची सर्व देखभाल, ठिबक सिंचन, पहारा देणे इत्यादी सर्व कामे व अनुषंगिक खर्च वन विभाग करणार असून विद्यापीठाकडे कोणतेही दायित्व असणार नाही. घनवन लागवडीखाली विविध फळ पिके व औषधी वनस्पती यांचा अंतर्भाव करुन आवंटीत करण्यास दोन्ही बाजुने साखळी कुंपण (Chain Fencing) करुन देण्यास कार्यकारी परिषद प्रशासकीय मान्यता देते व पुढील मान्यतेस्तव कृषि परिषदेस शिफारस करते.

ठराव सर्वानुमते मंजूर.

**विषय क्रमांक १० :**

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी व जिल्हा क्रीडा संकुल समिती यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या जमिनीवर क्रीडा संकुल तयार करण्याबाबत.

सचिवांनी सभेत नमूद केले की, विद्यापीठाच्या जमिनीवर २५ एकर जागा जिल्हा क्रीडा संकुल, समिती परभणी यांना देण्यासाठी वनामकृवि, परभणी व जिल्हा क्रीडा संकुल समिती यांच्यात करारनामा करण्यासाठी वरिष्ठांचे निर्देशान्वये करारनाम्यातील महत्वाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

१. विद्यापीठ, क्रीडा संकुल उभारण्याकरिता विद्यापीठाची सर्वे नं. २०७ व २०८ मधील २५ एकर जागा जिल्हा क्रीडा संकुल समिती परभणी यांना अटी व शर्तीच्या अधिन राहून विनामूल्य देईल.
२. सदरील क्रीडा संकुल हा महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभागातर्फे जिल्हा क्रीडा संकुल समिती परभणी व वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांचा संयुक्त प्रकल्प समजला जाईल.

३. जिल्हा क्रीडा संकुल समिती मध्ये वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी तर्फे विद्यापीठाचे मा.कुलगुरु, संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता कृषि, कुलसचिव, विद्यार्थी कल्याण अधिकारी हे प्रतिनिधित्व करतील.
४. प्रस्तावित क्रीडा संकुलाच्या जागेवर विद्यापीठाचा कायमस्वरूपी मूळ हक्क राहील.
५. भविष्यात सदरील क्रीडा संकुल बंद पडल्यास क्रीडा संकुलातील सर्व सोयी सुविधा, मालमत्ता ही वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांच्याकडे हस्तांतरित होईल.
६. क्रीडा संकुलातील सर्व सोयी सुविधा विद्यापीठाच्या अधिकारी व कर्मचारी आणि विद्यार्थी यांना विनामूल्य राहतील.

सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा होवून कार्यकारी परिषदेने खालील ठराव पारीत केला.

ठराव क्र.का-५७/२१०/२३.५.२०२३

सूचक : मा.आ.डॉ. राहुल पाटील

अनुमोदक : मा.आ.श्री.अभिमन्यू पवार

ठराव करण्यात येतो की, जिल्हा क्रीडा संकुल, समिती परभणी यांना विद्यापीठाच्या गट क्र. २०७ व २०८ मधील २५ एकर जागा उपलब्ध करून देण्याकरिता वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी व जिल्हा क्रीडा संकुल समिती यांच्यात करण्यात येणा-या करारनाम्याच्या उपरोक्त अटी व शर्तीच्या अधिन राहून कार्यकारी परिषद मान्यता देते व पुढील मान्यतेस्तव कृषि परिषदेस शिफारस करते.

ठराव सर्वानुमते मंजूर.

**विषय क्रमांक १२ :**

वनामकृवि, परभणी अंतर्गत कृषि महाविद्यालय, गोळेगाव येथील विस्तार शिक्षण विभागासाठी कायमस्वरूपी मल्टीमेडीया लॅब स्थापन करण्याकरिता अंदाजे रु. १८,५०,०००/- खर्चास मान्यता मिळण्याबाबत.

सचिवांनी सभेत नमूद केले की, वनामकृवि, परभणी अंतर्गत कृषि महाविद्यालय, गोळेगाव येथील विस्तार शिक्षण विभागासाठी कायमस्वरूपी मल्टीमेडीया लॅब स्थापन करण्यासाठी त्यावर होणारा अंदाजे खर्च रु. १८,५०,०००/- च्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. त्याअनुषंगाने सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा होवून कार्यकारी परिषदेने खालील ठराव पारीत केला.

ठराव क्र.का-५९/२१०/२३.५.२०२३

सूचक : डॉ.ध.नि.गोखले

अनुमोदक : मा.डॉ.आदिती सारडा

ठराव करण्यात येतो की, विद्यापीठ सारसंग्रह दि. ०१.०१.२०१७ मधील नियम क्र. १ : Power to purchase of machinery and equipment and communication means & any other nonrecurring items नुसार कृषि महाविद्यालय, गोळेगाव अंतर्गत विस्तार शिक्षण विभागासाठी कायमस्वरूपी मल्टीमेडीया लॅब स्थापन करण्याकरिता होणारा खर्च अंदाजे रु. १८,५०,०००/- ला कार्यकारी परिषद मान्यता देते व पुढील मान्यतेस्तव कृषि परिषदेस शिफारस करते.

तसेच, शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. भांखस- २०१४/प्र.क्र.८२/उद्योग -४ दि. ३०.१०.२०१५ मधील नियम क्र. ३.१.१.२ मधील प्रशासकीय मान्यतेच्या संदर्भात सक्षम प्राधिका-याचे प्रशासकीय मान्यतेचे आदेश एक वर्षापर्यंतच ग्राहय राहतील. सदरील कामी होणारा खर्च हा कृषि महाविद्यालय, गोळेगाव करिता सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील प्राप्त आकस्मिक अनुदानामधून करण्यात यावा.

ठराव सर्वानुमते मंजूर.

.

**विषय क्रमांक १३ :**

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीच्या मालकीचे Agritech Extension Centre Cum पेट्रोल पंप उभारणीस मान्यता देण्याबाबत.

सचिवांनी सभेत नमूद केले की, विद्यापीठ कार्यकारी परिषद ठराव क्र. का-६९/२.९.२०२२ अन्वये इंडियन ऑइल, हिंदुस्तान पेट्रोलियम कंपनी आणि वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ यांच्यात एक सामंजस्य करार करून खालील १० पेट्रोल पंप उभारणीस कार्यकारी परिषदेने मान्यता दिली आहे

| अ.क्र. | ठिकाण | जागेचा तपशील |
|---|---|---|
| १ | परभणी | माहिती व तंत्रज्ञान केंद्राच्या बाजूस, वसमत रोड, परभणी |
| २ | औरंगाबाद | कृषि तंत्र विद्यालय, कृषि विज्ञान केंद्राच्या लगतच्या जमिनीवर औरंगाबाद |
| ३ | अंबाजोगाई | मुख्य रस्त्यालगत विद्यापीठाच्या जमिनीवर अंबाजोगाई |
| ४ | लातूर | कृषि महाविद्यालयाच्या रस्त्यालगतच्या जमिनीवर लातूर |
| ५ | तुळजापूर | कृषि संशोधन केंद्राच्या रस्त्यालगतच्या जमिनीवर, तुळजापूर |
| ६ | नांदेड | कापूस संशोधन केंद्राच्या रस्त्यालगतच्या जमिनीवर, नांदेड |
| ७ | नांदेड | कृषि तंत्र विद्यालयाच्या मुख्य रस्त्याच्या बाजूस, नांदेड |
| ८ | बदनापुर | कृषि संशोधन केंद्र, मुख्य रस्त्याच्या बाजूस, बदनापुर |
| ९ | गोळेगाव | मुख्य रस्त्याच्या बाजूस, गोळेगाव |
| १० | उस्मानाबाद | कृषि महाविद्यालय, मुख्य रस्त्याच्या बाजूस, उस्मानाबाद |

सबब, इंडियन ऑइल पेट्रोलियम कंपनीकडून व हिंदुस्तान पेट्रोलियम कंपनीने विद्यापीठांतर्गत विविध ठिकाणांची पेट्रोल पंप स्थापन करण्यासाठी सर्व्हे करून व्यवहार्य स्थळांच्या यादीवर सखोल चर्चा होवून कार्यकारी परिषदेने खालील ठराव पारीत केला.

ठराव क्र.का-६०/२१०/२३.५.२०२३

सूचक : मा.आ.डॉ. राहुल पाटील

अनुमोदक : मा.आ.श्री.अभिमन्यू पवार

ठराव करण्यात येतो की, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या मालकीचे खालील पेट्रोल पंप उभारणीस तसेच २०० sq .ft चे Extension Centre कंपनी बांधुन देईल या अटीवर सदरील प्रस्तावास कार्यकारी परिषद मान्यता देते व पुढील मान्यतेस्तव कृषि परिषदेस शिफारस करते.

इंडियन ऑईल कंपनीने स्थळ पाहणी करून व्यवहार्य ठिकाणांची दिलेली यादी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क. | ठिकाण | जिल्हा |
|---|---|---|
| १ | कृषि महाविद्यालय, वनामकृवि, परभणी | परभणी |
| २ | कृषि तंत्र विद्यालय, गायत्री नगर, जालना | जालना |
| ३ | कन्हैया नगर, जालना | जालना |
| ४ | फळ संशोधन केंद्र, छत्रपती संभाजीनगर | छत्रपती संभाजीनगर |
| ५ | कापूस संशोधन केंद्र, नांदेड | नांदेड |
| ६ | केळी संशोधन केंद्र, नांदेड | नांदेड |

| | | |
|---|---|---|
| ७ | कृषि तंत्र विद्यालय, नांदेड | नांदेड |
| ८ | कृषि महाविद्यालय, लातूर | लातूर |
| ९ | कृषि संशोधन केंद्र, सोमनाथपूर, ता.उदगीर जि.लातूर | लातूर |
| १० | कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, चाकूर | लातूर |
| ११ | कृषि महाविद्यालय, गोळेगाव जि.हिंगोली | हिंगोली |
| १२ | प्रादेशकि उस संशोधन केंद्र, वसमत जि.हिंगोली | हिंगोली |
| १३ | सिताफळ संशोधन केंद्र, अंबाजोगाई जि.बीड | बीड |
| १४ | गळितधान्य संशोधन उपकेंद्र, अंबाजोगाई जि.बीड | बीड |
| १५ | कृषि तंत्र विद्यालय, अंबाजोगाई | बीड |
| १६ | कृषि महाविद्यालय, अंबाजोगाइ | बीड |

हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड स्थळ पाहणी करून व्यवहार्य ठिकाणांची दिलेली यादी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | ठिकाण | जिल्हा |
|---|---|---|
| १ | कृषि तंत्र विद्यालय, औरंगाबाद ईटखेडा, बनेवाडी | छत्रपती संभाजीनगर |
| २ | फळ संशोधन केंद्र, औरंगाबाद | छत्रपती संभाजीनगर |
| ३ | बाजरा संशोधन केंद्र, वैजापूर रोटेगाव | छत्रपती संभाजीनगर |
| ४ | कृषि संशोधन केंद्र, बदनापूर | जालना |
| ५ | कृषि तंत्र विद्यालय, जालना गायत्री नगर | जालना |
| ६ | उद्यानविद्या संशोधन, खानापूर | परभणी |
| ७ | सिंचन व्यवस्थापन, खानापूर | परभणी |
| ८ | बीएसपी खानापूर | परभणी |
| ९ | कृषि महाविद्यालय, परभणी | परभणी |
| १० | कापूस संशोधन नांदेड | नांदेड |
| ११ | कापूस संशोधन, धनेगाव नांदेड | नांदेड |
| १२ | कृषि तंत्र विद्यालय, लातूर महाराणाप्रताप नगर | लातूर |
| १३ | विलासराव देशमुख जैवतंत्र महाविद्यालय, महाराणा प्रताप | लातूर |
| १४ | कृषि संशोधन केंद्र, सोमनाथपूर | सोमनाथपूर |
| १५ | महाराणाप्रताप नगर | लातूर |
| १६ | कृषि पदव्युत्तर व्यवस्थापन महाविद्यालय, चाकूर | लातूर |
| १७ | कृषि महाविद्यालय, लातूर | लातूर |
| १८ | कृषि महाविद्यालय, गोळेगाव | हिंगोली |
| १९ | प्रादेशकि उस संशोधन केंद्र, वसमत | हिंगोली |
| २० | कृषि महाविद्यालय, उस्मानाबाद | उस्मानाबाद |
| २१ | तालुका बीज गुणन केंद्र, अंबाजोगाई | बीड |

| | | |
|---|---|---|
| २२ | कृषि तंत्र विद्यालय, अंबाजोगाई | बीड |
| २३ | कृषि महाविद्यालय, अंबाजोगाई | बीड |
| २४ | कृषि विज्ञान केंद्र, खामगाव गेवराई | बीड |

**विषय क्रमांक १७ :**

विद्यापीठातील सरळसेवेचे रिक्त पदे ऑनलाईन पध्दतीने भरण्यासाठी टाटा कन्सल्टंन्सी सर्व्हिसेस लिमिटेड (टि.सी.एस) एजन्सी यांचे समवेत सामंजस्य कराराबाबत.

सचिवांनी सभेत सादर केले की, शासन निर्णय क्रमांक पदनि-२०२२/ प्र.क्र.२/ २०२२/ आ.पु.क दिनांक ३१.१०.२०२२ अन्वये दिनांक ३०.९.२०२२ रोजीच्या शासन निर्णयामधील पदभरतीवरील निर्बंधामध्ये शिथिलता देऊन ज्या विभागांचा /कार्यालयाचा सुधारित आकृतीबंध अंतिम झालेला आहे, अशा विभागास/ कार्यालयास सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदे १०० टक्के तसेच ज्या विभागांचा /कार्यालयाचा सुधारित आकृतीबंध अद्याप अंतिम झालेला नाही, अशा विभागास/कार्यालयातील गट-अ, गट-ब व गट-क मधील (वाहनचालक व गट-ड संर्गातील पदे वगळून) सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदे ८० टक्के मर्यादेपर्यंतची रिक्त पदे भरण्यास मुभा देण्यात आलेली आहे.

तदअनुषंगाने सरळसेवेतील रिक्त पदे ही संपूर्ण ऑनलाईन प्रक्रियेव्दारे भरण्याकरीता महाराष्ट्र शासन निर्णय दि.२१.११.२०२२ अन्वये भुतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळाच्या कक्षेतील (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील) नामनिर्देशनाच्या कोट्यातील गट-ब (अराजपत्रीत), गट-क व गट-ड संवर्गातील पदे सरळसेवेने भरताना यापुढील स्पर्धा परिक्षा टि.सी.एस.आयओएन (टाटा कन्सल्टंन्सी सर्व्हिसेस लिमिटेड) व आय.बी.पी.एस. (इंस्टीटयूट ऑफ बँकींग पर्सोनेल सिलेक्शन) या कंपन्यांमार्फत ऑनलाईन पध्दतीने (Computer Programme Based test/Examination) यांचे मार्फत भरती करण्याचे प्रस्तावित आहे. सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा होवून कार्यकारी परिषदेने खालील ठराव पारीत केला.

ठराव क्र.का-६३/२१०/२३.५.२०२३

सूचक : डॉ.धिरजकुमार रा.कदम

अनुमोदक : मा.आ.डॉ.राहुल पाटील

ठराव करण्यात येतो की, विद्यापीठातील भरती प्रक्रिया टि.सी.एस. एजन्सीमार्फत गट-अ ते गट-क संवर्गातील सरळसेवेच्या रिक्त पदांपैकी ८० टक्के पदाची भरती करण्याकरिता टाटा कन्सल्टंन्सी सर्व्हिसेस लिमिटेड (टि.सी.एस.आयओएन) या कंपनी /एजन्सी मार्फत ऑनलाईन पध्दतीने (COMPUTER PROGRAMME BASED TEST/EXAMINATION) भरती प्रक्रिया राबविण्यासाठी (टि.सी.एस.आयओएन) या कंपनी /एजन्सी सोबत सामंजस्य करार करण्यास कार्यकारी परिषद मान्यता देते व पुढील मान्यतेस्तव कृषि परिषदेस शिफारस करते.

ठराव सर्वानुमते मंजूर.

**शिफारस क्रमांक २ :**

पदव्युत्तर अभ्यासक्रम (कृषि जैवतंत्रज्ञान) चे नामांकन मॉलिक्युलर बॉयोलॉजी आणि बायोटेक्नॉलॉजी असे करण्याबाबत.

